ISSN 2230-7745

# समाजशास्त्र संशोधन पत्रिका

मराठी समाजशास्त्र परिषदेचे मुखपत्र

वर्ष - ३२ वे अंक - १९ वा मार्च - २०१५ किंमत रु. ५०/-





विशेषांक

# शिक्षण आणि समाज

* अतिथी संपादक *

प्रा. संदीप चौधरी डॉ. सरोज आगलावे डॉ. अशोक बोरकर

# मराठी समाजशास्त्र परिषद

( नोंदणी क्र. महाराष्ट्र/२७-८३ औरंगाबाद )

** द्वारा **

समाजशास्त्र विभाग,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

** कार्यकारी मंडळ **


| | | |
|---|---|---|
| अध्यक्ष | : | डॉ. स्मिता अवचार |
| सचिव | : | प्रा. बालासाहेब शेंडगे |
| खजिनदार | : | डॉ. बी. एन. कावळे |
| सदस्य | : | डॉ. डी. डी. घोडगे |
| | | प्रा. सरोज आगलावे |
| | | प्रा. एम. एस. शिंदे |
| | | डॉ. गजानन वेल्हे |
| | | प्रा. विकास शेवाळे |
| | | डॉ. सुधाकर जाधव |
| | | डॉ. धनराज पाटील |
| | | डॉ. अमोल पाटील |
| | | प्रा. प्रवीण घोडेस्वार |
| | | प्रा. शिवाजी उकरंडे |
| | | प्रा. डी. एच. उराडे |

ISSN 2230-7745

# समाजशास्त्र संशोधन पत्रिका

मराठी समाजशास्त्र परिषदेचे मुखपत्र

वर्ष - ३२ वे अंक - १९ वा मार्च - २०१५ किंमत रु. ५०/-

मुख्य संपादक : डॉ. स्मिता अवचार
कार्यकारी संपादक : प्रा. बालासाहेब शेंडगे
डॉ. बी. एन. कावळे
अतिथी संपादक : प्रा. संदीप चौधरी
डॉ. सरोज आगलावे
डॉ. अशोक बोरकर

संपादक समिती सदस्य :
डॉ. अशोक बोरकर डॉ. दीपक पवार,
प्रा. संदीप चौधरी डॉ. राहुल भगत,
डॉ. राजेंद्र पेंडसे डॉ. राजेंद्र कांबळे

संपादकीय सल्लागार मंडळ :
डॉ. उत्तमराव भोईटे डॉ. द. ना. धनागरे
डॉ. प्रदिप आगलावे डॉ. बी. के. स्वाईं

संपर्क पत्ता :
अध्यक्ष, मराठी समाजशास्त्र परिषद,
व्दारा : समाजशास्त्र विभाग, डॉ.बा.आं.म.वि.,औरंगाबाद
www.msp-maha.com
E mail : sanshodhanpatrika@gmail.com

टंकण व मांडणी :
के. दत्ता कॉम्प्यु आर्ट, दत्ता कोल्हारे ०९८६०६७८४५८

मुद्रीत शोधक :
प्रदीप तत्सत

टीप : या अंकातील लेखकांनी व्यक्त केलेल्या मतांशी संपादक, संपादक मंडळ तसेच प्रकाशक, मुद्रक सहमत असतीलच असे नाही.

**ग्रामीण कुटुंबप्रमुखांचा शिक्षणासंबंधी दृष्टीकोन**
डॉ. साळोक लक्ष्मणसिंग हिलालसिंग ... ७
**अनुसूचित जमातींच्या मुलींची शैक्षणिक स्थिती**
डॉ. कालिदास मारुती भांगे ... १२
**शैक्षणिक गळती : एक समाजशास्त्रीय अध्ययन**
वैशाली अशोक जाधव ... १६
**शैक्षणिक धोरणांत बाबासाहेबांच्या विचारांची गरज**
प्रा. डॉ. प्रदीप एच. गजभिये ... २१
**डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शैक्षणिक विचार**
डॉ. राजेंद्र कांबळे ... २४
**भारतापुढील शैक्षणिक आव्हाने**
प्रा. डॉ. सरोज आगलावे ... २७
**महाराष्ट्रातील उच्च शिक्षण आणि बेरोजगारीचा प्रश्न**
डॉ. नारायण तु. कांबळे ... ३२
**रॅगिंग : उच्च शिक्षणातील अमानुषता**
प्रा. संदीप चौधरी ... ३७
**शिक्षणाचे खासगीकरण आणि दारिद्र्य**
प्रा. शेषराव राठोड ... ४१
**ग्रामीण महाराष्ट्रातील स्त्री शिक्षणाची समस्या**
डॉ. हनुमंत मिसाळ ... ४५
**ग्रामीण महिला आणि पाणी प्रश्न**
डॉ .मंजुषा नळगीरकर ... ४९
**असंघटित क्षेत्रातील कृषी व कृषी संबंधित श्रमिकांचे समाजशास्त्रीय अध्ययन**
प्रा.डॉ.भगवान डोंगरे ... ५४
**पुस्तक परीक्षण**
राजेंद्र फकीरराव बगाटे ... ५९

संपादकीय

# शिक्षण आणि समाज

शिक्षण ही समाजाची एक उपव्यवस्था असून समाजातील सदस्यांना समाजाभिमुख करण्याचे तसेच त्यांच्यात कौशल्य निर्माण करण्याचे कार्य करते. शिक्षण हा मनुष्यबळ विकासाचा एक महत्त्वपूर्ण घटक देखील आहे. शिक्षण हे सामाजिक परिवर्तनाचे एक साधन आहे. शिक्षणाद्वारे समाजात सकारात्मक बदल घडवून आणता येऊ शकतात. शिक्षण आणि समाज यांचे अन्योन्य असे नाते आहे. समाजात विविध प्रकारांनी शिक्षण दिले जाते. त्याचे वर्गीकरण अनौपचारिक शिक्षण, औपचारिक शिक्षण आणि सहज शिक्षण असे केले जाते. देशाचा विचार करता प्राथमिक शिक्षणापासून तर उच्च शिक्षणापर्यंत मोठे जाळे निर्माण करण्यात आले आहे. तसं पाहिले तर शिक्षण ही एक व्यापक अशी संकल्पना असून दर्जेदार आणि राष्ट्रीय मूल्यांचे शिक्षण प्रभावीपणे राबविल्यास एक कुशल मनुष्यबळ असलेला, मूल्याभिमुखता जोपासणारा समाज निर्माण होत असतो. हाच धागा पकडून मराठी समाजशास्त्र परिषदेच्या 'समाजशास्त्र संशोधन पत्रिके'चा हा विशेषांक 'शिक्षण आणि समाज' यातील सहसंबंध स्पष्ट करणाऱ्या विषयावर हा विशेषांक तयार करण्यात आला आहे. या विशेषांकामध्ये 'शिक्षण आणि समाज' या मुख्य विषयांतर्गत अनेक अनुभविक, संकल्पनात्मक शोध निबंधांचा समावेश करण्यात आला आहे. त्यातील तीन शोध निबंध हे ग्रामीण भागातील शिक्षणासंबंधी असून दोन डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या शैक्षणिक विचारांवर आधारित आहेत. त्याचप्रमाणे पाच शोध निबंध हे उच्च शिक्षणातील समस्यांचे स्वरूप स्पष्ट करणारे आहेत. याशिवाय समकालीन ज्वलंत विषयांवरील दोन शोध-निबंधांचा समावेश शेवटच्या विभागात करण्यात आला आहे.

पहिल्या विभागात डॉ. लक्ष्मणसिंग साळोक यांनी 'ग्रामीण कुटुंबप्रमुखांचा शिक्षणासंबंधी दृष्टिकोन : एक अध्ययन' या शोध निबंधात भारतातील ग्रामीण समाज व्यवस्थेचा आढावा घेतला असून माहोरा गावातील कुटुंबप्रमुखांची शैक्षणिक स्थिती व त्यांच्या मुला मुलींसंबंधीचा शिक्षणविषयक दृष्टिकोन स्पष्ट केला आहे. ग्रामीण भागात मुला-मुलींना शिक्षण देताना भेदभाव केला जात असल्याचे निरीक्षण त्यांनी नोंदविले आहे. उच्च शिक्षणासाठी देखील केवळ मुलांना प्रोत्साहन दिले जाते असा निष्कर्ष त्यांनी मांडला आहे.

प्रा. डॉ. कालिदास भांगे यांनी 'अनुसूचित जमातीच्या मुलींची शैक्षणिक स्थिती' या शोध निबंधात औरंगाबाद जिल्ह्यातील अनुसूचित जमातीच्या मुलींची शैक्षणिक स्थिती अभ्यासली आहे. अनुसूचित जमातीचे विद्यार्थी हे प्रामुख्याने सरकारी शाळांमध्ये प्रवेश घेतात. तसेच मोठ्या प्रमाणावर या विद्यार्थ्यांमध्ये गळती दिसून आल्याचे त्यांनी मांडले आहे. त्याचप्रमाणे प्राथमिक, माध्यममिक आणि उच्च माध्यमिक शाळांत प्रवेश घेण्याचे अनसूचित मुले आणि मुली यांच्या प्रमाणात मोठी तफावत आहे. असे निरीक्षण त्यांनी नोंदविले आहे.

'शैक्षणिक गळती : एक समाजशास्त्रीय अध्ययन' या शोध निबंधात वैशाली अशोक जाधव यांनी फुलंब्री तालुक्यातील शैक्षणिक गळती संदर्भातील कल याचे अध्ययन केले आहे. या शोध निबंधात त्यांनी विविध शैक्षणिक आयोगांचा आढावा घेऊन शैक्षणिक गळतीचे विश्लेषण केले आहे. तसेच गळतीची कारणे विशद करुन काही शिफारशी केल्या आहेत. त्यात अंशवेळ शाळेची व्यवस्था करणे, मोफत व सक्तीच्या शिक्षण कायद्याचे काटेकोर पालन करणे, व्यावसायिक शिक्षणाला प्रोत्साहन देणे आदी शिफारशींचा समावेश आहे.

विशेषांकाच्या दुसऱ्या विभागात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शैक्षणिक विचार या विषयातील शोध निबंधांचा समावेश करण्यात आला आहे. प्रा. डॉ. प्रदीप गजभिये यांनी 'शैक्षणिक धोरणात बाबासाहेबांच्या विचारांची गरज' या शोध निबंधात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या शैक्षणिक विचारांचा समावेश केल्यास आणि त्याची प्रामाणिकपणे अंमलबजावणी केल्यास देशातील सर्व मागासवर्गीय आणि अल्पसंख्याक समाजाचा विकास घडून येईल असा आशावाद व्यक्त केला आहे.

डॉ. राजेंद्र कांबळे यांनी 'डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शैक्षणिक विचार' या शोध निबंधात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या शैक्षणिक विचारांचे महत्त्व अधोरेखित केले आहे. शिक्षण हे समाज परिवर्तनाचे माध्यम असून व्यक्तिमत्त्व विकासाचे प्रभावी साधन आहे. या साधनांचा समाजाच्या विकासासाठी, शोषण मुक्तीसाठी वापर करावा असे आवाहन त्यांनी या शोध निबंधात केले आहे.

विशेषांकाच्या तिसऱ्या विभागात उच्च शिक्षणाचे स्वरूप स्पष्ट करणाऱ्या शोध निबंधांचा समावेश करण्यात आला आहे. 'भारतापुढील शैक्षणिक आव्हाने' या शोध निबंधात प्रा. डॉ. सरोज आगलावे यांनी भारतातील शिक्षणाची सद्यस्थिती, बदलती शैक्षणिक धोरणे आणि जागतिक स्तरावरील बदलत्या शैक्षणिक परिणामांचा भारतीय दृष्टिकोनातून आढावा घेतला आहे. शिक्षणाचे खासगीकरण, मूलभूत संशोधनाचा अभाव, 'ब्रेन ड्रेन'ची समस्या आणि शिक्षणाचे भगवेकरण आदी शैक्षणिक समस्यांवर प्रकाशझोत टाकला आहे.

डॉ. नारायण कांबळे यांनी 'महाराष्ट्रातील उच्च शिक्षण आणि बेरोजगारीचा प्रश्न' या शोध निबंधात राज्यातील उच्च शिक्षणातील सद्यस्थिती स्पष्ट केली आहे. त्याचप्रमाणे उच्च शिक्षण घेतलेल्यांच्या बेरोजगारीचा प्रश्न अभ्यासला आहे. उच्च शिक्षितांची बेरोजगारी कमी करुन मोठ्या प्रमाणावर रोजगारांच्या संधी महाराष्ट्र शासनातर्फे उपलब्ध करुन देण्यात येत असल्याचे निरीक्षण त्यांनी नोंदविले आहे.

प्रा. संदीप चौधरी यांनी 'रॅगिंग : उच्च शिक्षणातील अमानुषता' या शोधनिबंधात उच्च शिक्षणातील रॅगिंगच्या समस्येवर प्रकाश टाकला आहे. रॅगिंगची क्रूरता, विद्यार्थ्यांमधील मानसिक खच्चीकरण आणि रॅगिंगवरील कायदेशीर उपाय यांचे विश्लेषण त्यांनी केले आहे.

प्रा. शेषराव राठोड यांनी 'भारतातील शिक्षणाचे खाजगीकरण आणि दारिद्र्य' या शोधनिबंधात उच्च शिक्षणाचे स्वरुप स्पष्ट करुन दारिद्र्य निर्मूलनाचा उहापोह केला आहे. तर 'ग्रामीण महाराष्ट्रातील स्त्री शिक्षणाची समस्या' या शोधनिबंधात डॉ. हनुमंत मिसाळ यांनी ग्रामीण महाराष्ट्रातील स्त्री शिक्षणाची सद्यःस्थिती स्पष्ट केली आहे.

उपरोक्त 'शिक्षण आणि समाज' या मुख्य विषयाव्यतिरिक्त समकालीन सामाजिक प्रश्नांवरील दोन लेखांचा समावेश या अंकात करण्यात आला आहे. त्यात डॉ. मंजुषा नळगीकर यांच्या 'ग्रामीण महिला आणि पाणी प्रश्न' या शोध निबंधाचा समावेश आहे. मराठवाड्यातील दुष्काळी परिस्थितीमुळे ग्रामीण भागातील महिलांना भेडसावणाऱ्या पाणी प्रश्नांचा आढावा या शोध निबंधात घेण्यात आला आहे. तसेच पाणी प्रश्न सोडविण्यासाठी उपाय योजना सुचविण्यात आल्या आहेत. त्याचप्रमाणे प्रा. डॉ. भगवान डोंगरे यांनी 'असंघटित क्षेत्रातील कृषी संबंधित श्रमिकांचे समाजशास्त्रीय अध्ययन' या शोधनिबंधात स्वातंत्र्योत्तर कृषी धोरणाचा आढावा घेऊन कृषी क्षेत्रातील श्रमिक व रोजगाराची स्थिती स्पष्ट केली आहे. तसेच कृषी व कृषी संबंधित व्यवसायांमधील श्रमिकांची आरोग्यविषयक स्थिती चिंताजनक असल्याचे निरीक्षण नोंदविले आहे.

अशा एकूण बारा शोध निबंधांचा हा अंक वाचकांना सुपुर्द करताना विशेष आनंद होत आहे. समाजशास्त्राचे अभ्यासक या विशेषांकाचे निश्चितच स्वागत करतील ही अपेक्षा.

अतिथी संपादक
प्रा. संदीप चौधरी
डॉ. सरोज आगलावे
डॉ. अशोक बोरकर

# ग्रामीण कुटुंबप्रमुखांचा शिक्षणासंबंधी दृष्टिकोन

डॉ. साळोक लक्ष्मणसिंग हिलालसिंग

## प्रस्तावना :

भारतात ग्रामीण समाजाचे संशोधनात्मक मूल्य निश्चितपणे मोलाचे आहे. महाराष्ट्रासारख्या राज्यात राज्य निर्मितीनंतर म्हणजे १९६० नंतर खेड्यांमध्ये काय बदल होत गेले, खेडे कसे बदलते आहे, खेड्यांतील शेती व्यवसाय; कुटुंब व्यवस्था, रोजगार, उत्पन्न साधने, शिक्षण यातील बदलांचा सखोल अभ्यास होणे आवश्यक झाले आहे असे मत ज्येष्ठ समाजशास्त्रज्ञ डॉ. द.ना. धनागरे यांनी मराठी समाजशास्त्र परिषदेच्या अधिवेशनातील अध्यक्षीय भाषणात मांडले आहे. एक खेडे घेऊन त्याचा सखोल समाजशास्त्रीय अभ्यास ग्रंथरूपाने महाराष्ट्रात उपलब्ध नाही एस.सी. दुब्याचे शमीरपेठ, श्रीनिवासाचे रामपुरा, आन्द्रे बेत्ते यांचे श्रीपुरम, ऑस्कर लुईस यांचे रामगढी या प्रकारच्या खेड्यांचा अभ्यास महाराष्ट्रातील खेड्यासंदर्भात कुठे आहे? या समाजशास्त्रज्ञ हा डॉ. धनागरे यांच्या अध्ययनानुसार हे स्पष्ट होते की, महाराष्ट्रातील खेड्यांचा समग्रतेने अभ्यास अजूनही पुरेशा प्रमाणात झालेला नाही, यातूनच या अध्ययनाची आवश्यकता स्पष्ट होते. भारतामध्ये अनेक समाजशास्त्रज्ञांनी गावांचे अध्ययन केले आहे. त्यामध्ये एस.सी. दुबे यांचे Indian Village(१९६७), एम.एन. श्रीनिवास यांचे 'रामपुरा' (१९९६), मैकीम मेरियट यांचे 'किशनगढी' (१९७३), बी.आर चौहान यांचे A Rajasthan Village या सारखे गावांचे अध्ययन झालेले आहे. महाराष्ट्रातील जालना जिल्ह्यातील माहोरा गावातील कुटुंबांची शैक्षणिक स्थिती व कुटुंबप्रमुखांच्या मुला-मुलींच्या शिक्षणासंबंधीचा दृष्टिकोन अभ्यासण्याचा प्रयत्न या शोध निबंधातून केला आहे.

प्रस्तुत शोधनिबंधासाठी- महाराष्ट्रातील जालना जिल्ह्यातील माहोरा गावाची निवड केली आहे, प्रस्तुत शोध निबंधाची उद्दिष्टे खालीलप्रमाणे.

१) माहोरा गावातील कुटुंबप्रमुखांच्या शैक्षणिक स्थितीचा आढावा घेणे.

२) माहोरा गावातील कुटुंबप्रमुखांच्या मुला-मुलींच्या शिक्षणासंबंधीच्या दृष्टिकोनाचे अध्ययन करणे.

वरील उदिष्टे समोर ठेवून अध्ययनात काही गृहीत कृत्यांची मांडणी केली होती - ती पुढीलप्रमाणे.

१) माहोरा गावातील कुटुंब प्रमुखाची शैक्षणिक स्थिती निम्न दर्जाची आहे.

२) माहोरा गावामध्ये मुला-मुलीच्या शिक्षणासंबंधी निर्णय घेताना लिंगभेद केला जातो.

यासाठी संशोधकाने माहोरा गाव या समग्रातून १०० उत्तरदात्यांची निवड नमुना म्हणून केली आहे. ही निवड करताना सर्व जाती-धर्मांना प्रतिनिधित्व मिळेल तसेच माहोरा गावातील मूळचे रहिवासी असलेले अशाच कुटुंबप्रमुखांची निवड साधा यादृच्छिक नमुना पद्धतीत, नियमित अंकनप्रणाली - तसेच उद्देशपूर्ण व संस्तरित नमुना पद्धतीचा उपयोग करण्यात आला. तसेच १०० कुटुंबप्रमुखांची मुलाखत अनुसूचीच्या साहय्याने घेऊन तथ्य संकलन केले आहे.

### माहोरा गावाची सर्वसाधारण माहिती :

माहोरा गाव हे भोकरदन धाड, जाफ्राबाद, भोरखेडा चौफुलीवर वसलेले आहे. या गावामध्ये २४० व्यावसायिकांकडे दुकाने आहेत. त्यामध्ये बाहेरुन स्थलांतरित झालेल्या व्यक्तींची १६३ दुकाने आहे, मूळच्या माहोरा गावातील ७७ व्यक्तींनी व्यवसायासाठी विविध

सहायक प्राध्यापक, समाजशास्त्र विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.
ई मेल: salok.laxman@gmail.com

वस्तूंत विक्रीची दुकाने टाकली आहेत. या गावामध्ये बौद्ध, हिन्दू, इस्लाम, ख्रिश्चन या चार धर्मांचे लोक राहतात. ख्रिश्चन हे पूर्वाश्रमीचे मातंग जातीचे आहेत. २००६ च्या अंगणवाडी सेविकेने केलेल्या सर्वेक्षणानुसार या गावाची लोकसंख्या ४३२९ होती. त्यापैकी पुरुष २११७ (५०.७५ टक्के) आहेत. स्त्री-पुरुष प्रमाण ९७०. ४१ टक्के आहे. स्त्रिया २१३२ (४९.२४ टक्के) आहेत. गावामध्ये आठवड्याच्या दर शुक्रवारी आठवडी बाजार भरतो, आसपासच्या २० ते २५ गावांतून लोक बाजारासाठी येथे येतात. येथे एक प्राथमिक आरोग्य केंद्र असून बालवाडीपासून पदवीपर्यंत शिक्षणाची व्यवस्था उपलब्ध आहे.

तालिका क्र. ०१

**कुटुंबप्रमुखांच्या व त्यांच्या पत्नी व मुला मुलींची शैक्षणिक स्थिती दर्शविणारी तालिका**

| क्र. | शिक्षण | कुटुंब प्रमुख | | | कुटुंब प्रमुखाच्या पत्नीचे शिक्षण | मुलांचे शिक्षण | | मुलींचे शिक्षण | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | पुरूष | स्त्री | टक्केवारी | | कुटुंबाची संख्या | टक्केवारी | कुटुंबाची संख्या | टक्केवारी |
| १ | अशिक्षित | २६% | ७% | ३३% | ६८% | ०६ | ०६% | १२ | १२% |
| २ | १ ली ते ४ थी | २६% | ०१% | २७% | १३% | १७ | १७% | १८ | १८% |
| ३ | ५ वी ते ७ वी | ०५% | ०१% | ०६% | ०८% | १४ | १४% | ०७ | ०७% |
| ४ | ८ वी ते १२वी | २८% | ०१% | २९% | ०९% | ३५ | ३५% | ०५ | ०५% |
| ५ | पदवी | ०५% | – | ०५% | ०१% | १० | १०% | ०६ | ०६% |
| ६ | पदव्युत्तर | - | - | - | – | ०४ | ०४% | – | – |
| ७ | पती/पत्नी/ मुलगा/मुलगी नाही | ०१% | १०% | ११% | ०१% | १४ | १४% | ३२% | ३२% |
| ८ | एकूण | ९०% | १०% | १००% | १००% | १००% | १०० | १०० | १०० |

वरील तालिकेनुसार असे दिसून येते की, स्त्री-पुरुष कुटुंबप्रमुखांपैकी ३३ टक्के कुटुंबप्रमुख अशिक्षित आहेत, २७ टक्के कुटुंबप्रमुखांनी १ ली ते ४ थी दरम्यान शिक्षण घेतले आहे. तसेच ६ टक्के कुटुंबप्रमुखांनी ५ ते ७ वी पर्यंत शिक्षण घेतले आहे. ८ वी ते १२ वीपर्यंत शिक्षण घेणाऱ्या कुटुंबप्रमुखांचे प्रमाण २९ टक्के आहे. पदवीपर्यंत ५ टक्के उत्तरदात्यांनी शिक्षण घेतले आहे, ज्या १० टक्के स्त्री कुटुंब प्रमुख आहेत त्या पतीच्या निधनामुळे कुटुंब प्रमुख झाल्या आहेत.

कुटुंबप्रमुख आणि त्याच्या शिक्षणाची तुलना केली तर असे दिसून येते की, ६३ टक्के कुटुंबप्रमुखांच्या पत्नी अशिक्षित आहेत. १३ टक्के उत्तरदात्यांच्या पत्नीचे शिक्षण १ ली ते ४ थीपर्यंत झाले आहे, ५ वी ते ७ वी पर्यंत उत्तरदात्यांच्या पत्नीच्या शिक्षणाचे प्रमाण हे ०८ टक्के आहे. तर १२ वीपर्यंत ०९ टक्के उत्तरदात्यांच्या पत्नीचे शिक्षण झालेले आहे,

तसेच ६ टक्के कुटुंबप्रमुखांनी आपल्या मुलांना शिक्षण दिले नाही. १७ टक्के कुटुंबांमधील मुलांचे शिक्षण १ ली ते ४ थीपर्यंत झाले आहे. ५ वी ते ७ वीपर्यंत कुटुंबातील मुलांच्या शिक्षणाचे प्रमाण हे १४ टक्के आहे. ८ वी ते १२ वीपर्यंत कुटुंबातील शिक्षणाचे प्रमाण हे ०९ टक्के आहे, पदवीपर्यंत १० टक्के कुटुंबातील मुलांचे शिक्षण झालेले आहे. ०४ टक्के कुटुंबातील मुलांचे शिक्षण हे पदव्युत्तरपर्यंत झाले आहे. १४ टक्के कुटुंबप्रमुखांना मुलगा नाही.

त्याचप्रमाणे १२ टक्के कुटुंबातील मुली अशिक्षित आहेत, १८ टक्के कुटुंबांनी मुलींना १ ली ते ४ थीपर्यंत शिक्षण दिले आहे. ०७ टक्के कुटुंबातील मुलींनी ५ वी ते ७ वीपर्यंत शिक्षण घेतले आहे. तर १२ वीपर्यंत शिक्षण घेतलेल्या कुटुंबातील मुलींचे प्रमाण हे ०५ टक्के आहे. तर मुलींनी पदवीपर्यंतचे शिक्षण घेतलेल्या कुंटुंबांचे प्रमाण हे

०६ टक्के आहे, ३२ टक्के कुटुंबप्रमुखांना मुलगी नाही.

तालिका क्र. ०२

**माहोरा गावातील कुटुंबप्रमुखांचा मुला-मुलीच्या शिक्षणासंबंधीचा प्राधान्यक्रम दर्शविणारी तालिका**

| अं. क्र. | प्राधान्यक्रम | कुटुंब प्रमुखांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | मुलास प्राधान्य | ८२ | ८२% |
| २ | मुलीस प्राधान्य | १४ | १४% |
| ३ | अपत्य नाही | ०४ | ०४% |
| | एकूण | १०० | १०० |

वरील तालिकेवरुन एकुण १०० कुटुंबप्रमुखांना मुलगा व मुलगी यापैकी एकास शिक्षण देण्याची तुमची कुवत आहे तर कुणाच्या शिक्षणास प्राधान्य द्यायचा असा प्रश्न विचारण्यात आला होता. त्यापैकी ८२% कुटुंबप्रमुखांनी मुलास प्राधान्य देऊ तर १४% कुटूंबप्रमुखांनी मुलीस प्राधान्य देऊ तर ०४% कुटुंब प्रमुखांना आपणास मूलबाळ नसल्याचे दिसून आले आहे.

तालिका क्र. ०३

**माहोरा गावातील मुलीपेक्षा मुलांच्या शिक्षणास प्राधान्य देण्याची कारणे**

| अं. क्र. | मुलास प्राधान्य देण्याची कारणे | कुटुंबाची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | मुलगा म्हातारपणाचा आधार असतो. | ७६ | ९२.६८% |
| २ | वंशाचा दिवा असतो. | ३ | ३.६५% |
| ३ | मुलगी नाही. | ३ | ३.६५% |
| | एकूण | ८२ | ९९.९८ |

ज्या ८२ कुटुंबप्रमुखांनी मुलास प्राधान्य देऊ असे सांगितले. कारण ९२.६८ टक्के कुटुंबप्रमुखांनी मुलगा हा म्हातारपणाचा आधार असतो तर ३.६५टक्के कुटुंब प्रमुखाने मुलगा हा वंशाचा दिवा असतो. तर ३.६५ टक्के कुंटुंबप्रमुखांनी मुलगी नसल्याचे आढळून आले आहे.

तालिका क्र. ०४

**माहोरा गावातील मुलापेक्षा मुलीस शिक्षणात प्राधान्य न देण्याची कारणे**

| अं. क्र. | मुलीस प्राधान्य न देण्याची कारणे | कुटुंबांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | परक्याचे धन आहे. | ७३ | ८९.०२% |
| २ | शिकून उपयोग नाही. | ०३ | ३.६५% |
| ३ | लग्नात अडसर | ०१ | १.२१% |
| ४ | हुंडा जास्त द्यावा लागेल. | ०१ | १.२१% |
| ५ | मुलगी नाही म्हणून | ०४ | ४.७८% |
| | एकूण | ८२ | ९९.९६ |

ज्या ८२ कुटुंबप्रमुखांनी मुलास प्राधान्य देऊ असे सांगितले. त्यांनी मुलीस प्राधान्य न देण्याची कारणे सांगितली ती अशी, ८९.०२ टक्के कुटुंबप्रमुख मुलीस परक्याचे धन मानतात तर ३. ६५टक्के कुटुंबप्रमुख मुलीस शिक्षण देऊन काही उपयोग नाही असे मानतात तर १.२१टक्के कुटुंबप्रमुख लग्नात अडसर येईल असे मानतात. १.२१टक्के कुटुंबप्रमुखांना मुलगी शिकली तर जास्त हुंडा द्यावा लागेल म्हणून प्राधान्य देत नाही तर ४.८७ टक्के

कुटुंबप्रमुखांनी मुलगी नाही म्हणून प्राधान्य देण्यात प्रश्न येत नाही असे सांगितले.

तालिका क्र. ०५

**माहोरा गावातील मुलांपेक्षा मुलींच्या शिक्षणास प्राधान्य देण्याची कारणे**

| अं. क्र. | मुलास प्राधान्य देण्याची कारणे | कुटुंबांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | बुद्धिमान आहे म्हणून | ०३ | २१.४२% |
| २ | म्हातारपणाचा आधार | निरंक | निरंक |
| ३ | मुलगा नाही म्हणून | १० | ७१.४२% |
| ४ | स्वत:च्या पायावर उभी राहिल्यास काळजी करण्याचे कारण नाही. | ०१ | ७.१४% |
| | **एकूण** | **१४** | **९९.९८** |

तसेच ज्या १४टक्के कुटुंबप्रमुखांनी मुलीस प्राधान्य देऊ असे सांगितले. त्याची कारणे त्यांनी दिली त्यापैकी २१.४२ टक्के कुंटुंबामध्ये मुलापेक्षा मलगी बुद्धिमान आहे म्हणून प्राधान्य देऊ तसेच ७.१४ टक्के कुटुंबप्रमुख मुलगी स्वत:च्या पायावर उभी राहिल्यास काळजी करण्याचे काही कारण नाही असे मानतात. तर ७.१४टक्के कुटुंबप्रमुखांना मुलगा नाही म्हणून प्राधान्य हे मुलीस देण्याचे कारण सांगितले.

तालिका क्र. ०६

**माहोरा गावातील मुलीपेक्षा मुलाच्या शिक्षणास प्राधान्य न देण्याची कारणे**

| अं. क्र. | मुलास प्राधान्य न देण्याची कारणे | कुटुंबाची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | अल्पबुद्धी आहे म्हणून | निरंक | निरंक |
| २ | उपयोग नाही. | ०२ | १४.२८% |
| ३ | म्हातारपणी आधार देतील याची खात्री नाही. | ०१ | ७.१४% |
| ४ | अपंग आहे म्हणून | निरंक | निरंक |
| ५ | मुलगा शारीरिक श्रम करु शकतो | ०१ | ७.१४% |
| ६ | मुलगा नाही म्हणून | १० | ७१.४२% |
| | **एकूण** | **१४** | **९९.९८** |

वरील ज्या १४% कुटुंबप्रमुखांनी मुलीस प्राधान्य देऊ असे सांगितले. त्यांनी मुलास का प्राधान्य देणार नाही. याचीही कारणे सांगितली ती पुढील प्रमाणे, १४.२८% कुटुंबप्रमुखांनी मुलास शिकून काही उपयोग नाही तर ७.१४% कुटुंबप्रमुखांना मुलगा म्हातारपणी आधार देतील याची खात्री वाटत नाही असे सांगितले. ७.१४% कुटुंबप्रमुख मुलगा हा शारीरिक श्रम करु शकतो असे सांगितले तर ७१.४२% कुटुंबप्रमुखांना मुलगा नाही म्हणून त्यांनी मुलीस प्राधान्य देणार असे सांगितले.

**निष्कर्ष:**

माहोरा गावातील कुटुंबप्रमुखांमध्ये अशिक्षित उत्तरदात्या कुटुंबप्रमुखांचे प्रमाण अधिक आहे. ज्यांनी शिक्षण घेतले ते बहुतांश १२ वीपर्यंतच आहे स्त्री- कुटुंबप्रमुखामध्ये अशिक्षितांचे प्रमाण अधिक आहे. कुटुंबप्रमुखांपेक्षा कुटुंबप्रमुखांच्या पत्नी या अशिक्षित असण्याचे प्रमाण अधिक आहे. ज्या शिकल्या त्यामध्ये १ ते ७ वीपर्यंतचे प्रमाण

अधिक आहे. मात्र कुटुंबप्रमुखांनी मुला-मुलींच्या शिक्षणाकडे लक्ष दिल्याचे दिसून येते. त्यांच्यामध्ये शिक्षितांचे प्रमाण अधिक असून मुलांपेक्षा मुलींमध्ये अशिक्षितांचे प्रमाण अधिक आहे. पुढील शिक्षणाचे प्रमाण मुलांपेक्षा मुलींमध्ये कमी दिसून आले. तसेच १४ टक्के कुटुंबप्रमुखांना मुलगा नाही तर ३२ टक्के कुटुंबप्रमुखांना मुलगी नसल्याचे दिसते. यावरुन असे म्हणता येते, की माहोरा गावातील कुटुंबप्रमुखाची शैक्षणिक स्थिती निम्न दर्जाची आहे हे गृहीतक वैध ठरते.

तसेच माहोरा गावामध्ये पितृसत्ताक कुटुंब पद्धतीत मुलास महत्त्वाचे स्थान आहे, मुलगा हा म्हातारपणाची काठी होऊ शकतो. तर मुलगी लग्न झाल्यावर परक्याच्या घरी जाते. ती शिकून नौकरीला लागली तर पगारही सासरीच द्यावा लागेल म्हणून तिला मृत गुंतवणूक समजून पुढे शिकू दिले जात नाही. तिला परक्याचे धन मानले जाते. म्हणून पुढील शिक्षणासाठी मुलांच्या शिक्षणासाठी प्राधान्य दिले जाते. केवळ अत्यल्प कुटुंबप्रमुखच मनापासून मुलीच्या शिक्षणास प्राधान्य देतात. कारण मुलगी शिकली तर तिच्या भविष्याची काळजी राहणार नाही. मुलांकडे म्हातारपणाची सोय म्हणून बघितले जात असल्याचे दिसून येते, त्यामुळे माहोरा गावामध्ये मुला-मुलींच्या शिक्षणासंबंधी निर्णय घेतांना लिंगभेद केला जातो हे गृहीतक वैध ठरते.

संदर्भ सूची:

१) नागोराव कुंभार व अनभुले आनंद (१९९९) 'महाराष्ट्रातील चिंतन' या ग्रंथातील धनागरे सरांचे मराठी समाजशास्त्र परिषदेतील अध्यक्षीय भाषण, पृ. क्र. १०,११

२) दुबे एस.सी (१९६७) 'इंडियन व्हिलेज' हारर्प कॉलोफोन बुक्स न्यूयॉर्क पृ. क्र. २-१६.

३) श्री निवास एम. एन. (१९९६) 'व्हिलेज क्लास जेंडर अॅण्ड मेथड एसे इन इंडियन सोशल अॅन्थ्रॉपॉलॉजी (इन्ट्रोडक्शन)', नवी दिल्ली पृ.क्र. १ते १७.

४) सिंह योगेंद्र (१९७३) 'मॉडर्न यपेशन ऑफ इंडियन ट्रॅडिशन' थॉमसन प्रेस लि.दिल्ली पृ.क्र. १४

५) लवानिया एम एन व जैन शशी के (१९९९) 'ग्रामीण समाजशास्त्र' रिसर्च पब्लिकेशन जयपूर पृ.क्र. ७१

* * *

# अनुसूचित जमातीच्या मुलींची शैक्षणिक स्थिती *

डॉ. कालिदास मारुती भांगे

**प्रस्तावना :**

मानवाचा सर्वांगीण विकास घडवून आणण्याचे साधन म्हणून शिक्षणाकडे पाहिले जाते. शिक्षणामुळे मानव प्राण्याचे रूपांतर सामाजिक प्राण्यात होते. तसेच व्यक्तीचा व्यक्तिमत्त्व, आर्थिक आणि सामाजिक विकास होऊन तिची सारासार विचार करण्याची दृष्टी विकसित होत असते. शिक्षणाविषयी महात्मा जोतिराव फुले म्हणतात, 'ज्या शिक्षणामुळे माणसाला खरं काय खोटं काय कळतं ते शिक्षण' यावरुन शिक्षणामुळे माणसाला विचार करण्याची शक्ती येऊन त्याचे कार्य व त्या कार्याचा कार्यकारण संबंध लक्षात येईल आणि ते जो काम करतो त्याविषयी विचार करण्यास सक्षम राहील अशी अपेक्षा महात्मा जोतिराव फुले ठेवतात.

भारताची भौगोलिक, सांस्कृतिक आणि विकासाच्या अनुषंगाने तीन भागांत विभागणी होते. ज्यात शहरी, ग्रामीण आणि आदिम (आदिवासी) समूह यांचा समावेश होतो. स्वातंत्र्योत्तर ६७ वर्षात भारतातील कोणतेही सरकार देशातील सर्व समाज घटकांपर्यंत मूलभूत हक्क, आणि विकासात्मक योजना पोहचवू शकलेले नाही. एव्हाना ग्रामीण भागातील आणि तळागळातील व्यक्तीला शिक्षणाचा हक्क पोहचवण्याआधीच उच्च शिक्षणाची खासगीकरण, खासगी शिक्षण संस्था, विनाअनुदान धोरण आणि व्यावसायिक शिक्षण महागडे करुन आर्थिकदृष्ट्या दुर्बलांच्या शिक्षणाचा हक्कच हिरावून घेतला गेला आहे. भारतीय संविधानामध्ये ० ते १४ वर्षे वयोगटातील मुलांना शिक्षण मोफत आणि सक्तीचे केलेले असले तरी त्याची अंमलबजावणी होत नाही. निरक्षर आणि अर्ध साक्षरांची संख्या दिवसेंदिवस वाढत चाललेली दिसून येते. त्याला पोषक वातावरण आणि उच्च प्रतीचे शिक्षण देण्यास सरकार सक्षम नाही. स्वातंत्र्योत्तर काळातील भारतीय शिक्षण क्षेत्रात संख्यात्मक, गुणात्मक आणि विषमता या निकषांच्या आधारे अनुसूचित जमातींच्या मुलामुलींची शैक्षणिक स्थिती काय आहे याचा अभ्यास करण्याचे आणि वास्तव शोधण्याचा प्रयत्न प्रस्तुत शोध निबंधात केलेला आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे :**

१. अनुसूचित जमातींच्या मुला-मुलींचे शिक्षणातील प्रमाण तपासणे.

२. अनुसूचित जमातींच्या मुला-मुलींची शैक्षणिक गळतीची कारणे शोधणे.

३. अनुसूचित जमातींच्या शाळाबाह्य मुला-मुलींना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी काही उपाय सुचविणे.

**गृहीतकृत्ये :**

१. अनुसूचित जमातीच्या मुलां-मुलींची शैक्षणिक गळती अधिक आहे.

२. अनुसूचित जमातींचे मुले-मुली सरकारी शाळेत जातात.

३. अनुसूचित जमातीच्या लोकांची आर्थिक स्थिती कमकुवत असल्याने मुलींच्या शिक्षणावर परिणाम होतो.

**संशोधन पद्धती :**

संशोधनाचे स्वरूप व आशयाचे आकलन होण्यासाठी संशोधनात शास्त्रीय पद्धतीचा अवलंब करणे आवश्यक असते. म्हणून प्रस्तुत शोध निबंधात संशोधकाने

---

* डॉ. जी. एस. घुर्ये उत्कृष्ट शोधनिबंध पुरस्कार-२०१२
मराठी समाजशास्त्र परिषदेचे २४वे अधिवेशन, विवेकानंद महाविद्यालय, कोल्हापुर

सहायक प्राध्यापक, समाजशास्त्र विभाग, श्री आ. भां. महाविद्यालय, देवगाव (रं.), ता. कन्नड जि. औरंगाबाद
E Mail : drkalidasmbhage@gmail.com

वर्णनात्मक/अन्वेषणात्मक संशोधन पद्धतीचा, तसेच संशोधनासाठी दुय्यम सामग्रीचा अवलंब केला आहे.


**संशोधन क्षेत्र :**

प्रस्तुत शोधनिबंधात संशोधकाने औरंगाबाद जिल्ह्यातील अनुसूचित जमातींच्या मुला-मुलींची शैक्षणिक स्थिती जाणून घेण्यासाठी, औरंगाबाद जिल्ह्यातील औरंगाबादसह नऊ तालुक्यांतील ग्रामीण-नागरी भागांचा अभ्यास करुन तालुकानिहाय एकूण विद्यार्थ्यांशी अनुसूचित जमातीच्या संदर्भात मुलींचे प्रमाण काय आहे. त्याची कारण कोण-कोणती असावीत याचाही शोध घेतलेला आहे.

जगातील प्रत्येक राष्ट्राच्या विकासाचा केंदबिंदू हा त्या देशातील प्राथमिक ते उच्च शिक्षण हाच असतो. कारण प्राथमिक शिक्षणातून उच्च शिक्षणाची प्रेरणा मिळत असते. त्यातून संशोधन साहित्य विकसित होते आणि राष्ट्राच्या विकासास मदत होते. त्यामुळे विकसित राष्ट्रे शिक्षणावरील खर्च ही गुंतवणूक म्हणून विचारात घेतात. त्यांच्या राष्ट्रात वैज्ञानिक, औद्योगिक क्रांतीत भर पडते आणि देशाचा विकास घडून येतो. भारताला जागतिक महासत्ता व्हायचे असेल तर त्या देशातील प्राथमिक ते उच्च शिक्षणाकडे दुर्लक्ष करुन चालणार नाही. परंतु तसेच देशातील तळातल्या व्यक्तींचाही विचार होणे आवश्यक आहे. परंतु भारतात याउलट परिस्थिती असतानाही भारत जागतिक महासत्ता बनण्याचे स्वप्न पाहात आहे. देशातील प्रत्येक नागरिकाला निकोप प्राथमिक आणि उच्च शिक्षण उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. भारतात शिक्षणविषयक स्थिती चिंताजनक आहे. शिक्षण हे प्रत्येक व्यक्तीची प्रगती घडविण्याबरोबरच जीवनात आदर्श मूल्ये व तत्त्वे स्वीकारण्यास मदत करते. त्यात मोठ्यांचा आदर व लहानांवर प्रेम करणे ही सामाजिक मूल्ये असून, आपल्या देशाच्या इतिहासाचे भौगोलिक आणि सामाजिक परिस्थितीचे ज्ञान, जीवनाचे तत्वज्ञान, विज्ञान, तंत्रज्ञान, गणित इत्यादीचे ज्ञान देशातील तळागळातील आदिवासी समुदायापर्यंत पोहचले पाहिजे.


प्राथमिक शिक्षणाचा प्रसार आणि प्रचार असमानतेशी, संख्यात्मक व गुणात्मक घटकाशी निगडित आहे. सरकारी शाळांमधील शिक्षणाचा दर्जा हा कमी असल्यामुळे तसेच त्या इंग्रजी माध्यमातून किंवा इंग्रजीचा शिक्षक नसल्यामुळे पालक आणि मुलांना इंग्रजी माध्यमांच्या खासगी शाळांमध्ये पाठवतात. अलीकडे प्राथमिक शाळांतही इंग्रजीसारखा विषय, तसेच सेमी इंग्रजी वर्गाची सुरुवात झालेली असली तरी दर्जेदार शिक्षक नेमण्यासाठीची व्यवस्था करण्यात आलेली नसते. तर खासगी शाळांत त्याच्या विरुद्ध परिस्थिती असते. त्याहून कायमविना अनुदान तत्त्वाच्या शाळांमुळे तर सर्वसामान्य कुटुंबातील विद्यार्थ्यांचे पुरते वाटोळे केल्याचे चित्र दिसून येते. प्राथमिक शिक्षणाची ही दुरवस्था साक्षरतेविषयी पुढील आकडेवारीत स्पष्ट होते. खास करुन १९९१ ते २००१ दरम्यान साक्षरतेमध्ये मोठी प्रगती झाली. उदा. भारतात साक्षरतेचे प्रमाण (१९५१ मध्ये ५ वर्षांखालील मुले आणि १९१४ व २००१ मध्ये ७ वर्षांखालील मुले वगळून) साक्षरता प्रमाण १९५१ मध्ये १६.६ टक्क्यांवुन १९९१ मध्ये ५२.२ टक्के झाले. ते २००१ मध्ये ६५.४ टक्क्यांवर पोहचले आहे हे प्रमाण २०११ च्या जनगणनेमध्ये ७० टक्केपर्यंत पोहचण्याची शक्यता आहे. असे असले तरी यामध्ये अल्पशिक्षितांची संख्या अधिक आहे.

प्रस्तुत शोध निबंधामध्ये औरंगाबाद जिल्ह्यातील अनुसूचित जमातींच्या मुलामुलींचे प्राथमिक, माध्यमिक शाळेतील तसेच उच्च माध्यमिक व महाविद्यालयीन प्रामण तसेच अनुदानित, विनाअनुदानित आणि शासकीय शाळेतील प्रमाण कसे आहे, तसेच मुला-मुलींचे प्रमाणही शोधण्यात आले आहे. त्यासाठी काही तक्त्यांचा आधार घेण्यात आलेला आहे. तो पुढीलप्रमाणे –




टीप : सदरील मुलींची टक्केवारी एकूण मुलांच्या आकडेवारीच्या प्रमाणात दर्शविते.

औरंगाबाद जिल्ह्यातील अनुसूचित जमातींची लोकसंख्या डोंगराळ भागांत व काही ठरावीक तालुक्यांत अधिक आहे. त्यामध्ये कन्नड, सोयगाव, सिल्लोड, गंगापूर, वैजापूर या तालुक्यांत अधिक औरंगाबाद, खुलताबाद, फुलंब्री आणि पैठण या तालुक्यांत लोकसंख्या कमी आहे. तालुकावार अनसूचित जमातींची प्राथमिक, माध्यमिक शाळेतील, उच्च माध्यमिक आणि महाविद्यालयीन विद्यार्थी संख्या त्यामध्ये शासकीय, स्थानिक संस्था, अनुदानित, विनाअनुदानित असे वर्गीकरण करुन एकूण विद्यार्थ्यांपैकी मुलींचे शिक्षणातील प्रमाण काढण्यात आलेले आहे. तसेच प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक आणि महाविद्यालयीन विद्यार्थी संख्येवरुन शिक्षणातील गळतीचे प्रमाण या विषयी अभ्यास करण्यात आलेला आहे.




टीप : एकूण शाळेत दाखल झालेली विद्यार्थी यातील मुलींचे प्रमाण दर्शवीत आहे.

स्त्रोत : औरंगाबाद जिल्हा सामाजिक-आर्थिक समालोचन - २०११

औरंगाबाद जिल्ह्यातील औरंगाबादसह नऊ तालुक्यांतील प्राथमिक शाळेत शासकीय, स्थानिक संस्था, खासगी, अनुदानित, विना अनुदानित संस्थांत शैक्षणिक वर्ष २०१०-११ मध्ये एकूण १५३५३ विद्यार्थी आहेत. पैकी मुले १४८४९ (९६.७२ टक्के) असून, मुली ५०४ (३.२८ टक्के) आहेत. माध्यमिक शासकीय, स्थानिक संस्था, खासगी अनुदानित, विनाअनुदानित शाळांमधील २०११ या शैक्षणिक वर्षामध्ये एकूण ५८१४ विद्यार्थी शिक्षण घेत होते. पैकी मुले ५५९२ (९६.१८ टक्के) आणि मुली २२२ (३.८२ टक्के) असे प्रमाण आढळून आले. याच शैक्षणिक वर्षामध्ये उच्च माध्यमिक विभागात शासकीय, स्थानिक शिक्षण संस्था, खासगी अनुदानित आणि खासगी विनाअनुदानित, कनिष्ठ महाविद्यालय कला, वाणिज्य, विज्ञान आणि तत्सम समकक्ष विद्यालय प्रवेशित एकूण विद्यार्थी ३२७१ होते. त्यापैकी मुले २९५० (९०.१९ टक्के) आणि मुली ३२१ (९.८१ टक्के) प्रमाण आढळून आले. तसेच महाविद्यालयीन कला वाणिज्य आणि विज्ञान या शाखांत शासकीय, स्थानिक संस्था, खासगी अनुदानित, विनाअनुदानित महाविद्यालयांमध्ये २०१०-११ या शैक्षणिक वर्षामध्ये ९६२ विद्यार्थी प्रवेशित होते. त्यापैकी मुले ७१० (७३.८१ टक्के) आणि मुली २५२ (२६.२० टक्के) असे प्रमाण आढळून आले.

अनुसूचित जमातीचे विद्यार्थी कोणत्या प्रकारच्या शाळेत प्रवेशित होतात असे पाहिले असता औरंगाबाद जिल्ह्यातील सर्वच नऊ तालुक्यांतील सरासरी प्रमाण पाहिले असता पुढीलप्रमाणे दिसून आले. प्राथमिक विभागात एकूण ५६ विद्यार्थी असून, मुलींचे प्रमाण ०० आहे. स्थानिक संस्थांत एकूण ८५७४ विद्यार्थी असून ११६ (१.३५ टक्के) मुलींचे प्रमाण आढळून आले. खासगी अनुदानित शाळेत एकूण ५४१७ विद्यार्थी प्रवेशित होते, पैकी मुली ३८७ (७.१४ टक्के) आढळून आल्या. विनाअनुदानित शाळेत एकूण १३०६ विद्यार्थ्यांपैकी मुलींचे प्रमाण ०० टक्के होत असे आढळून आले.

माध्यमिक शिक्षण विभागात एकूण ५८१४ विद्यार्थी शिक्षण घेत होते, पैकी २२२ (३.८२ टक्के) मुलींचे प्रमाण आढळून आले. त्यापैकी शासकीय शाळेत ५२ विद्यार्थी आढळले, असून एकूण मुली ०० आढळून आल्या. स्थानिक संस्थांत १५१३ विद्यार्थी असून त्यापैकी ५६ (३.७० टक्के) मुलींचे प्रमाण आढळून आले. खासगी अनुदानित शाळेत ३४१९ एकूण शाळेमध्ये ८३१ विद्यार्थी होते. त्यापैकी १४८ (४.३९ टक्के) मुलींचे प्रमाण दिसून येते. खासगी विनाअनुदानित शाळेमध्ये ८३१ विद्यार्थी होते. त्यापैकी १७ (२.०४ टक्के) मुलींचे प्रमाण आढळून आले.

उच्च माध्यमिक (कनिष्ठ) महाविद्यालयीन स्तरावर शिक्षण घेणारे एकूण ३२१७ विद्यार्थी होते. त्यापैकी ३२१ (९.८१ टक्के) मुलींचे प्रमाण आढळून आले.

पैकी शासकीय संस्थांत १९ विद्यार्थी होते, त्यापैकी मुलींचे प्रमाण ०० टक्के आहे. स्थानिक संस्थांत १७५ विद्यार्थी प्रवेशित असून त्यापैकी १८ (१०.२८ टक्के) मुलींचे प्रमाण आढळून आले. अनुदानित खासगी विद्यालयांत एकूण १४१८ विद्यार्थी प्रवेशित होते. त्यापैकी २२५ (१५.८७ टक्के) प्रमाण मुलींचे प्रमाण आढळून आले. विनाअनुदानित उच्च माध्यमिक शाळेत एकूण १६५९ विद्यार्थी प्रवेशित होते. त्यापैकी ७८ (४.७० टक्के) मुलींची संख्या आढळली. महाविद्यालयीन स्तरावर एकूण ९६२ विद्यार्थी प्रवेशित होते. पैकी २५२ (२५.६८ टक्के) प्रमाण मुलींचे प्रमाण आढळून आहे. त्यापैकी कोण-कोणत्या शिक्षण संस्थांमध्ये प्रवेश घेतलेले आहेत ते पाहिले असता पुढील प्रमाणे स्थिती आढळून आली. शासकीय महाविद्यालयांत एकूण ३९ विद्यार्थी प्रवेशित होते. त्यापैकी १५ (३८.४६ टक्के) मुलींचे प्रमाण आढळून आले. स्थानिक आणि विनाअनुदानित महाविद्यालयात एकूण ९२६ विद्यार्थी होते. त्यापैकी २३७ (३४.५५ टक्के) मुलींचे प्रमाण आढळून आले. औरंगाबाद जिल्ह्यातील अनुसूचित जमातींची एकूणच शैक्षणिक स्थती पाहिली असता शैक्षणिक वर्ष २०१०-११ मध्ये २५४०० विद्यार्थी शिक्षण घेत होते. त्यापैकी १२९७ (५.११ टक्के) असे प्रमाण आढळून येते.

## निष्कर्ष :

औरंगाबाद जिल्ह्यातील अनुसूचित जमातींच्या मुलींचे शैक्षणिक स्थिती पाहत असताना काही ठळक बाबी निदर्शनास येतात. अनुसूचित जमातींचे विद्यार्थी, शासकीय शाळा पुरेशा उपलब्ध नसल्याने स्थानिक संस्थांच्या सरकारी शाळेत अधिक प्रवेशित होतात. त्यानंतर खासगी परंतु अनुदानित शाळांत अधिक प्रमाणात शिक्षण घेतात. विनाअनुदानित शाळांत प्रवेश अत्यंत कमी आढळून आले. प्राथमिक शाळांत प्रवेशित झाल्यानंतर २ १/३ विद्यार्थी प्राथमिक शाळेतून माध्यमिक शाळेपर्यंत जातानाच गळतात. तसेच उच्च माध्यमिक, महाविद्यालयीन शिक्षणात प्रवेशित होईपर्यंत प्रचंड मोठी तफावत आढळून येते.

आणखी एक अत्यंत महत्त्वाचा निष्कर्ष असा की, प्राथमिक, माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शाळांत प्रवेश घेण्याचे मुले-मुलींच्या प्रमाणात प्रचंड तफावत आहे. मात्र मुलींच्या तुलनेत मुलांची गळती लक्षणीय आहे. मुलींचा प्रवेश झाल्यास त्यांची गळती मात्र अत्यंत कमी आहे. यावरुन शहरी भागातीलच अनसूचित जमातीच्या मुलींना शाळेत व उच्च शिक्षणापर्यंत पाठवले जाते आणि त्या शेवटपर्यंत शिकतात असे दिसून आले. ग्रामीण, आदिवासी भागातील मुलींचे शिक्षणातील प्रमाण अत्यल्प आहे असे निदर्शनास येते. तालुकावार शिक्षणाचे प्रमाण पाहिले असता सर्वाधिक औरंगाबाद तालुक्यातून दिसून यते. त्यानंतर कन्नड, वैजापूर, पैठण, खुलताबाद, सिल्लोड, गंगापूर आणि सर्वांत कमी प्रमाण सोयगाव आणि फुलंब्री तालुक्यातून दिसून येते. वरील निष्कर्ष पाहता आदिवासी-ग्रामीण आणि नागरी सीमारेषा अधिक गडद होत आहेत.

आदिवासी मुलांच्या शिक्षणासाठी त्यांच्या वस्ती, पाड्यांवर शाळांची सोय करुन वस्तीगृहांची संख्या वाढवावी, दुर्गम भागातील लोकांना शिक्षणाचे महत्त्व पटवून देऊन विकासाच्या मुख्य प्रवाहात आणले पाहिजे. त्यामुळे त्यांची आर्थिक प्रगती होऊन आपल्या पाल्यांना शिक्षण देण्याकडे कल वाढेल. परिणामी देशाच्या विकासाचा वाटा तळागाळातील व्यक्तींपर्यंत पोहचेल. त्यामुळे देशाच्या सर्वांगीण विकासास चालना मिळेल. जो पर्यंत विकासाची फळे सर्वसामान्य आणि मागस घटकापर्यंत पोहचत नाहीत तो पर्यंत देशाचा सर्वांगीण विकास होऊ शकत नाही.

## संदर्भ :

१. डॉ. ओ. पी. वर्मा, शिक्षा का समाजशास्त्र
२. डॉ. ना. य. डोळे, उदारीकरणाचे नवे आर्थिक धोरण
३. औरंगाबाद जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन-२०११
४. महात्मा ज्योतिराव फुले, समग्र वाङ्मय
५. हरी नरके (संपादक), शोधाच्या नव्या वाटा
६. प्रा. बा. ह. कल्याणकर, महात्मा फुले विचार आणि संदर्भ
७. औरंगाबाद जिल्हा परिषद शैक्षणिक अहवाल २०११

* * *

# शैक्षणिक गळती : एक समाजशास्त्रीय अध्ययन

वैशाली अशोक जाधव

**प्रस्तावना:**

शिक्षण हे व्यक्तीच्या सर्वांगीण विकासासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. स्वातंत्र्यपूर्व काळात ब्रिटीशांचे साम्राज्य असल्याने ब्रिटिशांची भारतीय शिक्षणविषयक धोरणे, ब्रिटिशांना फायदेशीर होतील याच पध्दतीने आखलेली होती. काळानुरूप शिक्षण पध्दतीत विकास होत गेला. "स्वातंत्र्योत्तर काळात शैक्षणिक संस्थांनी सामाजिक प्रबोधनाचे कार्य शिक्षणाच्या माध्यमातून करताना सकारात्मक दृष्टिकोन जोपासण्यावर लक्ष केंद्रित केले पाहिजे, हा विचार रुजविताना स्वातंत्र्य, समता, बंधुता या पायाभूत तत्त्वांचा विचार भारतीय संविधानाने केला आहे."[१]

आज जगातील प्रत्येक देश विकसित देशांच्या पंक्तीत जाऊन बसण्यासाठी धडपडत असताना बहुतेक देशांनी शिक्षण हा एकमेव मार्ग देशाला विकसित करण्यात मोलाची भूमिका पार पाडणार असल्याचे जाणले आहे. भारतालादेखील विकसनशील अवस्थेतून विकसित देशांच्या पंक्तीत बसविण्यासाठी शिक्षणाचे सार्वजनिकीकरण हा भारतीय संविधानाने अनुसरलेला मूलमंत्र आहे. "सामाजिक गरजांची पूर्ती करण्याची, सामाजिक समस्यांचे निराकरण करण्याची जबाबदारी शिक्षणावर पडते. साक्षरता प्रसार, बेकारीचे निराकरण, व्यावसायिक पात्रता, वैज्ञानिक उन्नती, औद्योगिक विकास, सामाजिक व राष्ट्रीय ऐक्य ही आपल्या देशाची परिस्थिती लक्षात घेता शैक्षणिक उद्दिष्टे महत्त्वाची ठरतात."[२]

शिक्षण व्यवस्थेचे विविध स्तर आहेत. यामध्ये प्राथमिक, माध्यमिक व उच्च शिक्षण या स्तरांचा समावेश होतो. शिक्षण व्यवस्थेतील प्रत्येक स्तर विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी महत्त्वपूर्ण असतो. म्हणजेच "शिक्षण म्हणजे पूर्णत्वाचा विकास होय."[३] एकंदर प्राचीन काळापासून आपल्या देशात ज्ञानार्जन व ज्ञानदानाची परंपरा अतिशय गौरवपूर्ण परिस्थितीत चालत आलेली आहे. कालपरत्वे तिचा विकासही होत आहे. आज संगणकाच्या युगात शिक्षणाने विकासाची फार मोठी झेप घेतली आहे. परंतु त्याचबरोबर शिक्षणातील समस्यांमध्येही वाढ झालेली आहे. शिक्षणाचा होणारा विकास हा प्रामुख्याने फक्त मोठ्या गावांतून व शहरांतूनच मर्यादित झालेला आहे. ग्रामीण भागातही शिक्षणाच्या सुविधा आहेत, पण त्यास विशेष गती मिळालेली नाही. त्यासाठी शैक्षणिक विकास खेड्यांपर्यंत पोहचवणे गरजेचे आहे.

**भारतातील शैक्षणिक आयोग, शैक्षणिक धोरणे व नविन कायदा:**

भारतात स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्यानंतरही शैक्षणिक प्रश्नांचा अभ्यास करण्यासाठी व शिक्षण व्यवस्थेसंबंधी शिफारशी करण्यासाठी अनेक समित्या व आयोग नेमले गेले. त्या आयोगांपैकी महत्त्वपूर्ण आयोग व कायदे पुढीलप्रमाणे:

**१. हंटर आयोग १८८२-८३ :** भारतातील शिक्षण आयोग अर्थात हंटर आयोग हा पहिलाच असा आयोग होता की, ज्याने भारतीयांच्या विविध स्तरांवरच्या शिक्षणाचा अत्यंत बारकाईने विचार केला. "प्राथमिक शिक्षण कसे पसरविता येईल आणि त्यात काय सुधारणा असली पाहिजे, याविषयी विचार करणे आयोगाचे मुख्य कार्य आहे."[४] त्याचबरोबर सर्व स्तरांवरील शिक्षणासाठी सहायता अनुदान देण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे

संशोधक विद्यार्थिनी, समाजशास्त्र विभाग, डॉ.बा. आं. म. विद्यापीठ, औरंगाबाद

भारतामध्ये एक शैक्षणिक जागृती झाली. परिणामस्वरूप या आयोगाचा प्रभाव बराच काळ भारतीय शिक्षणावर राहिला.

**२.मुदलियार आयोग १९५२ :** स्वातंत्र्योत्तर काळातील हा महत्त्वाचा आयोग समजला जातो. "शिक्षणाच्या इतिहासात माध्यमिक शिक्षणाचा सर्वांगीण विचार करून मौलिक अशा शिफारशी करणारा हा पहिलाच आयोग आहे."[५] मुदलियार आयोगाच्या शिफारशींमुळेच बहुउद्देशीय शाळा सुरू झाल्या. अनेक ऐच्छिक विषय आले, अंतर्गत गुणांची सुरुवात, अभ्यासानुवर्ती कार्यक्रमांना महत्त्व, बाह्य परीक्षेतील दोष कमी करण्याचे प्रयत्न झाले. भारतीय शिक्षण क्षेत्रातील इतर आयोगांपेक्षा हा आयोग व्यावहारिक व वास्तवाचा विचार करणारा आहे. यामुळे राष्ट्रीय गरजांशी माध्यमिक शिक्षण जोडले गेले.

**३. कोठारी शिक्षण आयोग १९६४-६६ :** कोठारी आयोगाने पूर्व प्राथमिक शिक्षणापासून ते पदव्युत्तर शिक्षण, संशोधनापर्यंतचा आयोगाने विचार करून शिफारशी केल्या होत्या."शिक्षणाचा नवा आकृतिबंध, शिक्षणाचे व्यावसायिकरण, बुकबँक, कार्यानुभव, द्विस्तरीय अभ्यासक्रम, सुधारित वेतनमान, राष्ट्रीय शिक्षण संस्था, त्रिभाषा सूत्र, स्त्री शिक्षण, संस्थांना स्वायत्ता अशा अनेक शिफारशी अमलात आल्या आहेत. शिक्षणाचा सर्व बाजूंनी विचार करणारा हा पहिलाच आयोग आहे."[६]

**४. १९६८चे शैक्षणिक धोरण :** "१९६८ चे शैक्षणिक धोरण हे कोठारी आयोगाच्या शिफारशींचा अवलंब करून भारत सरकारने आपले पहिले राष्ट्रीय शैक्षणिक धोरण म्हणून जाहीर केले."[७] या धोरणाअंतर्गत शैक्षणिक सोयींतील विषमता दूर करून ग्रामीण व इतर मागस भागांत चांगल्या शिक्षणाची सोय झाली पाहिजे. समान शाळा पध्दतीचा स्वीकार करावा. मुलींच्या शिक्षणाला गती द्यावी अशा शिफारशी मांडण्यात आल्या. पण त्यांना पूर्णपणे यश मिळाले नाही. म्हणून संपूर्ण शिक्षण व्यवस्थेचे पुनरावलोकन करण्याची गरज जाणवू लागली.

**५. १९८६चे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण :** "भारतातील शिक्षण क्षेत्रातील दुरवस्थेकडे राजीव गांधी पंतप्रधान असताना लक्ष वेधण्यात आले. १९८५ मध्ये प्रसिध्द करण्यात आलेल्या 'चॅलेज ऑफ एज्युकेशन' या पुस्तिकेत शिक्षण क्षेत्रातील उणिवांची जंत्री करण्यात आली. या उणीवा दूर करण्याच्या उद्देशाने १९८६ मध्ये भारताचे नवे शैक्षणिक धोरण जाहीर करण्यात आले."[८] राष्ट्रीय शैक्षणिक धोरण १९८६ मधील महत्त्वपूर्ण बदल हा राष्ट्रीय शिक्षण पध्दतीत संपूर्ण राष्ट्रात समान शैक्षणिक आकृतिबंधाचा विचार आहे. १०+२+३ हा आकृतिबंध देशातील सर्व भागात स्वीकारला गेला आहे.

**६. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण १९९२ ( १९८६ची पुनरावृत्ती ) : १९९२** मध्ये सुधारित राष्ट्रीय शैक्षणिक धोरण जाहीर झाले, यातील महत्त्वपूर्ण बाब अशी की, "२१व्या शतकातील प्रवेशापूर्वी खात्रीने १४ वर्षापर्यंतच्या मुलांना गुणवत्तायुक्त मोफत व सक्तीचे शिक्षण उपलब्ध करून द्यावे."[९]

**७. सर्व शिक्षा अभियान २००१:** शालेय शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणाच्या प्रक्रियेला केंद्र सरकारच्या सर्व शिक्षा अभियान या योजनेमुळे वेग आलेला आहे. "शासनाने २००१ सालपासून सर्व शिक्षा अभियानाची अंमलबजावणी सुरु केली आहे, त्यासाठी विद्यार्थ्यांच्या निवास स्थानापासून १ कि.मी.च्या परिघात प्राथमिक शाळा सुरू करणे आवश्यक आहे. तसेच मुलांची शाळेतील उपस्थिती वाढविण्यासाठी दुपारचा पोषक आहार देण्याने उपस्थिती वाढते व गळतीचे प्रमाण कमी होत असलेले दिसून येते."[१०]

**८. बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९ :** समाज, व्यक्ती व राष्ट्र यांचे नियमन करण्यासाठी कायदे मदत करतात. केवळ कायद्याचा आधार घेऊन परिणामकारक व कायमचे परिवर्तन होऊ शकत नाही. मात्र कायदा अस्तित्वात आल्यावर समाजाचे मत परिवर्तन होण्यास मदत होते. म्हणून "संविधान विधेयक २००९ मध्ये कलम २१(अ) राज्याने तयार केलेल्या कायद्यानुसार वय वर्षे ६ ते १४

वयोगटातील मुलांना राज्याकडून मोफत आणि सक्तीचे शिक्षण दिले जाईल असे सुचविले होते. त्यासाठी १ एप्रिल २०१० पासून ६ ते १४ वयोगटातील मुलांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा कायदा अमलात आला."[११]

या सर्व आयोग व कायद्यांमुळे निश्चितच शैक्षणिक स्थिती सुधारलेली आहे. परंतु तरीही या कायद्यांची कठोरपणे अंमलबजावणी होणे आवश्यक आहे, तरच शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण झालेले दिसून येईल.

**शैक्षणिक गळती:**

गळती म्हणजे विद्यार्थ्यांनी मध्येच शाळा सोडणे होय. हरटॉग समितीच्या मते, "प्राथमिक शाळेत दाखल झाल्यानंतर विद्यार्थी कायमस्वरूपी साक्षरता प्राप्त करण्यापूर्वी शाळा सोडतो, त्यालाच अपव्यय किंवा गळती असे म्हणतात."[१२]

**गळतीचे प्रकार:**

**१. परिस्थितीजन्य गळती :** "विद्यार्थ्यांच्या सततच्या अनुपस्थितीमुळे विद्यार्थ्यांचा प्रवेश रद्द केला तर होणाऱ्या गळतीस परिस्थितीजन्य गळती म्हणतात."

**२. स्थगनजन्य गळती :** "सतत अनुत्तीर्ण झाल्याने विद्यार्थ्यांने शाळा सोडली तर त्यास स्थगनजन्य गळती असे म्हणतात."

**गळतीचे कारणे:**

**१. आर्थिक परिस्थिती :** ग्रामीण भागातील वाढती बेरोजगारी, मोल-मजुरी करणारे पालक यांना आर्थिक हातभारासाठी मदत मिळावी म्हणून तसेच शैक्षणिक खर्चाअभावी विद्यार्थ्यांना शाळेतून नावे कमी करावे लागतात, तर मुलींना घरची कामे करण्यासाठी शाळा सोडून द्यावी लागते.

**२. शाळेचे ठिकाण :** बऱ्याच वेळेस शाळा घरापासून फार दूर असल्याने विद्यार्थी टाळाटाळ करतात. मुलींच्या बाबतीत पालक असुरक्षित असतात, तसेच योग्य रस्ते नसल्यास पावसाळ्यात होणारा त्रास यांसारख्या अनेक कारणांमुळे विद्यार्थी शाळेत जाण्यास उदासीन असतात.

**३. शैक्षणिक वातावरणाचा अभाव :** विद्यार्थ्यांना शाळेत योग्य वर्गखोली, क्रीडांगण, ग्रंथालय, प्रयोगशाळा या सुविधा नसतील तर त्याचा परिणाम विद्यार्थी शाळेत जाण्यास टाळाटाळ करतात. परिणामी ते शाळेत येत नाहीत व तेथूनच गळती सुरू होते.

**४. आरोग्यविषयक कारणे :** गरिबी व निकृष्ट आहार यामुळे विद्यार्थ्यांचे आरोग्य व्यवस्थित राहत नाही. तसेच शाळेतील निकृष्ट दर्जाचा आहार, शाळेतील परिसर यामुळेही आरोग्यविषयक समस्या निर्माण होतात, त्यामुळे विद्यार्थी शाळेत जाण्याचे टाळतात.

**५. वर्गातील दुर्लक्ष :** विद्यार्थ्यांचा शाळेत दाखला झाल्यापासून वेगवेगळया टप्प्यांद्वारे शिक्षण दिले जाते. जर प्राथमिक शिक्षणात दुर्लक्ष केले तर विद्यार्थ्यांचा शैक्षणिक पाया कच्चा राहतो, व पुढील अभ्यासक्रम अशा विद्यार्थ्यांना अवघड जातो. त्यांच्याकडे दुर्लक्ष केल्यास ते इतर मुलांपेक्षा मागे पडतात व त्यांच्यामध्ये भीती निर्माण होते.

**६. शैक्षणिक ताणतणाव :** विद्यार्थ्यांकडून पालकांच्या सतत वाढत्या अपेक्षांची पूर्तता करता न येणे त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये तणाव वाढत जातो. तसेच वर्गात सतत हुशार विद्यार्थ्यांबरोबर तुलना, शिक्षकांचे वैयक्तिक मार्गदर्शन नसणे, वाढती स्पर्धा यामुळे विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाबद्दल नकारात्मक भावना वाढीस लागते.

**७. मोठ्या संख्येचे वर्ग :** ग्रामीण भागातील शाळांमध्ये वर्गखोल्या छोट्या असतात, परंतु जर विद्यार्थी संख्या जास्त असेल तर प्रत्येक विद्यार्थ्यांकडे वैयक्तिक लक्ष देणे किंवा प्रत्येक विद्यार्थ्यांच्या प्रश्नांचे निरसन होणे शक्य नसल्यामुळे मार्गदर्शनाच्या अभावामुळे शाळेविषयी घृणा निर्माण होण्यास सुरूवात होते.

**उद्दिष्टे:**

१. शैक्षणिक आयोग व कायद्यांविषयी माहिती करून घेणे.

२. शैक्षणिक स्थिती समजावून गळतीची कारणे शोधणे.

३. गळतीवर उपाययोजना सुचवणे.

**गृहीतकृत्ये:**

१. पालकांवर रूढी-परंपरांच्या असलेल्या प्रभावामुळे त्यांना शैक्षणिक सद्यस्थितीची माहिती नसते.

२. पालकांचे शिक्षण व आर्थिक परिस्थितीमुळे गळती वाढते.

३. मुलांच्या मानाने मुलींची गळती जास्त प्रमाणात होते.


४. शाळा गावापासून किंवा घरापासून लांब असल्यास गळतीचे प्रमाण वाढते.

**संशोधन प्रणाली:**

प्रस्तुत शोधनिबंध हा संपूर्णत: दुय्यम तथ्यांवर आधारित आहे. दुय्यम तथ्य संकलनासाठी विविध संदर्भ ग्रंथ, शासकीय अहवाल, शोधनिबंध, मासिके, इंटरनेट यांचा वापर केला आहे.

**फुलंब्री तालुक्यातील गळतीचा कल:**

"फुलंब्री तालुक्याची सध्याची लोकसंख्या २०११ च्या जनगणनेनुसार १,६१,०१२ आहे."[१३] फुलंब्री तालुक्याअंतर्गत प्राथमिक शिक्षणापासून ते उच्च शिक्षणापर्यंत शैक्षणिक सुविधा उपलब्ध आहेत. तरीदेखील येथील "साक्षरता दर हा ६२.६२ टक्के एवढाच आहे."[१४] या संदर्भातील माहिती मिळवण्यासाठी या तालुक्याची अभ्यासासाठी निवड केली आहे. फुलंब्रीत सध्या ९२ गावे आहेत. या अंतर्गत एकूण २५९ शाळा आहेत. त्यापैकी प्राथमिक शाळा २१९ आहेत व माध्यमिक शाळा ३८ आहेत. तसेच जिल्हा परिषदेच्या प्राथमिक व माध्यमिक शाळा मिळून १९९ शाळा आहेत. सदरील अभ्यास हा वर्तमान स्थितीशी निगडित आहे. माहिती संकलित करतांना इयत्ता ९वी व १०वी इयत्तेची पूर्ण माहिती उपलब्ध न झाल्यामुळे फक्त ४थी ते ८ वीपर्यंतच्या आकडेवारीचा उपयोग सदरील अभ्यासासाठी केला आहे. या संदर्भात फुलंब्री तालुक्यातील शैक्षणिक स्थिती किंवा गळती दर्शवणारा पुढील आलेख महत्त्वपूर्ण आहे.




वरील आलेखात २००९-१० ते २०१३-१४ च्या ४थी ते ८ वीपर्यंतची स्थिती दर्शविली आहे. यावरून शैक्षणिक गळती ही प्रामुख्याने ४थी इयत्तेतून ५वी इयत्तेत जाताना दिसून येते, तसेच ७वी इयत्तेतून ८वी इयत्तेत जाताना गळती दिसून येते. या गळती प्रमाणात मुला-मुलींच्या प्रमाणात जास्तीत जास्त गळती होताना दिसून येते. तसेच इयत्ता ६वी व ७ वीच्या स्थितीत फारसा फरक झालेला दिसून येत नाही. मात्र २०१२-१३ व २०१३-१४ ची शैक्षणिक स्थिती व गळतीचा कल कमी झालेला दिसून येतो. परंतु हे प्रमाण किंवा स्थिती मुलींच्या बाबतीत तफावत असलेली दिसून येते, हे खालील आकडेवारीवरून दिसून येईल.

### इयत्तावार मुला-मुलींची २००९-१० ते २०१३-१४ ची आकडेवारी

| वर्ग / इयत्ता | ४थी | | ५वी | | ६वी | | ७वी | | ८वी | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | मुले | मुली | मुले | मुली | मुले | मुली | मुले | मुली | मुले | मुली |
| *२००९-१० | २१०४ | १८२३ | १५१५ | १४३१ | १४२६ | १३०९ | १४१८ | १३४८ | १०४४ | ९२३ |
| *२०१०-११ | १७६६ | १६२३ | १६२२ | १५०३ | १३८९ | १३२९ | १३२१ | १२२१ | ११८४ | १०३९ |
| *२०११-१२ | १७६६ | १५२७ | १६०४ | १३७७ | १५५८ | १४१६ | १३९६ | १२३८ | १२९८ | १०७८ |
| +२०१२-१३ | १६८३ | १५०३ | १७३८ | १४९६ | १७५५ | १५०५ | १६९४ | १५३३ | १५१८ | १२२९ |
| +२०१३-१४ | १५४३ | १४८४ | १६२९ | १४६७ | १७५२ | १४८८ | १७४७ | १४८७ | १६२० | १३५७ |

(*जिल्हा परिषद-सर्व शिक्षा अभियान विभाग, +फुलंब्री पंचायत समिती शिक्षण विभाग)

वरील आकडेवारीवरून प्रत्येक इयत्तेत मुलांपेक्षा मुलींचे गळतीचे प्रमाण अधिक असल्याचे दिसून येते. यासाठी मुलामुलींना शिक्षण प्रवाहात आणण्यासाठी व त्यांची शिक्षणातील गळती कमी करण्यासाठी शासकीय व सामाजिक पातळीवर अधिक व्यापक प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे.

**उपाययोजना:**

१. ज्या मुला-मुलींना पूर्ण वेळ शाळेत जाता येत नाही, त्यांच्यासाठी अंश वेळ शिक्षणाची व्यवस्था करावी.
२. मोफत व सक्तीच्या शिक्षण कायद्याचे काटेकोर पालन करावे.
३. शाळेत येण्या-जाण्यासाठी शाळांनी बसची सुविधा करावी.
४. पालकांसाठी उद्बोधन कार्यक्रम शाळांनी घेतले पाहिजेत.
५. व्यावसायिक शिक्षणाला प्रोत्साहन दिले गेले पाहिजेत.
६. शाळेत मार्गदर्शनपर कार्यक्रम आयोजित करावे.
७. शाळेत स्वयं-शिस्तीचे वातावरण निर्माण करावे.

**संदर्भसूची:**


१. कायंदे-पाटील गंगाधर-'भारतीय शिक्षण इतिहास आणि समस्या', चैतन्य पब्लिकेशन, नाशिक, २००६, पृ.२४७
२. कुंडले म.बा. - 'शैक्षणिक तत्त्वज्ञान व शैक्षणिक समाजशास्त्र', विद्या प्रकाशन, पुणे, १९९६, पृष्ठ क्र.२४८
३. पिंपळापुरे शशिकांत - 'समाजशास्त्रीय संकल्पना व व्याप्ती', विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद, २००३, पृ.७५
४. शेटकर गणेश, शेवतेकर शारदा, जोशी शोभना -'भारतीय शिक्षणाचा इतिहास', मृण्मयी प्रकाशन, औरंगाबाद २००२, पृ.क्र.१४४
५. वास्कर आनंद, वास्कर पुष्पा - 'भारतीय शिक्षणाचे बहुजनीकरण', प्रकाशक मिलिंद जोगळेकर, नित्य नूतन प्रकाशन, २००६, पृ.क्र.२०६
६. शेटकर व इतर -पृ.क्र.२५६
७. मगरूळकर मीना, आवटे कमलादेवी - 'भारतीय समाज आणि प्राथमिक शिक्षण', फडके प्रकाशन, कोल्हापूर २००५, पृ.क्र.१०६
८. डिसुझा आल्बर्ट - 'शिक्षण विचार', प्रकाशक डॉ.रा.गो.प्रभुणे, सेक्रेटरी शिक्षण मंडळ, कराड, २००७ डिसेंबर,पृ.११६
९. शेटकर व इतर - पृ.क्र.२८०
१०. अस्मिता तांबिले - 'शिक्षणाची स्थिती', चाणक्य मंडल २०११, संपादक अविनाश धर्माधिकारी, पृ.क्र.११
११. www.primaryeducationact2009
१२. भिलेगावकर सदानंद, भिलेगावकर स्मिता - 'माध्यमिक शिक्षणाची कार्यपध्दती', नित्य नूतन प्रकाशन, पुणे, प्रकाशक मिलिंद जोगळेकर, २००६, पृ.क्र.७७
१३. महाराष्ट्र शासन - 'जिल्हा सामाजिक आर्थिक समालोचन', जनगणना २०११
१४. बालवाड रमेश - 'औरंगाबाद जिल्हा विशेषांक', विद्याभारती प्रकाशन. पृ.क्र.४१


* * *

# शैक्षणिक धोरणांत बाबासाहेबांच्या विचारांची गरज

प्रा. डॉ. प्रदीप एच. गजभिये

**प्रस्तावना :**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मते जे शिक्षण माणसाला घडवीत असते तेच खरे शिक्षण होय. जे शिक्षण उपयोगी पडते तेच खरे शिक्षण होय. शिक्षणाचा परिणाम शील व चारित्राची निर्मिती करणारा असावा. शिक्षण हे मूल्याधिष्ठित म्हणजे उच्चतम नैतिक आचरण निर्माण करणारे असावे. ग्रंथ हे शक्तीचे साधन आहे असे ते समजत असत. जी व्यक्ती आपल्यापेक्षाही शिक्षणावर अधिक प्रेम करते. त्या व्यक्तीला शिक्षणप्रेमी म्हणावे. शिक्षण हे शिस्त, विकास आणि समाज नियंत्रणाशी संबंधित असले पाहिजे. भारतात आज शाळेतील नैतिक मूल्य बाजूस सारून शिक्षणाचा गोरखधंदा जोरात सुरू आहे. बहुजन लोकांच्या नावाखाली चालविल्या जाणाऱ्या शाळा म्हणजे साक्षर लोकांचे केवळ गोठे आहेत. भारतातील शाळा महाविद्यालयाला शैक्षणिक गुणवत्तेपेक्षा पोल्ट्री फार्मचे स्वरूप प्राप्त झालेले आहे. आज भारतात शाही श्रीमंत मुलांसाठी शाही शाळा आणि गरिबांच्या मुलांसाठी झोलबा पाटलाचा वाडा अशा प्रकारची भयाण आणि भकास परिस्थिती आहे. डॉ. बाबासाहेब म्हणायचे भारतात सामुदायिक शिक्षणाची गरज आहे, पंरतु आज शिक्षणाचा धंदा लुटारू वर्गाच्या हातात गेला आहे, त्यामुळे गरिबांच्या शाळा बंद पडण्याच्या मार्गावर आहेत.

महात्मा बुध्द म्हणतात माणसाच्या सर्व प्रश्नांची मुळे त्याच्या अज्ञानातच आहेत, त्यामुळे आज भारतात अज्ञान कसे टिकवले जाईल हेच पाहिले जाते. आंबेडकर, बुध्द, शाहू, फुले असे अभिप्रेत समुदाय शिक्षणाचा विचार संपविण्याचे प्रयत्न प्रतिगामी करत आहेत. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी जे शैक्षणीक तत्त्वज्ञान प्रतिपादन केले आणि निरक्षर जनतेला साक्षर करण्यासाठी शैक्षणिक संस्था स्थापन केल्या आणि झोपलेल्या जनतेला जागे करण्याचे अवघड कार्य केले. डॉ. बाबासाहेबांना ब्राह्मणांनी बहुजनांवर कशी अमानुषता लादली याची जाणिव करून द्यावयाची होती. यासाठी शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा असा संदेश दिला. शैक्षणिक तत्त्वज्ञान मनुष्याचे डोके, हृदय आणि हात यांच्या अंतर्गत गुणवत्ता जोपासणारी प्रक्रिया म्हणून शिक्षण संकलित करते व माणसाच्या अंगीकृत मुरलेल्या शक्ती मुक्त करते. पशूल्य अस्तित्वाचा त्याग करून त्याऐवजी सद्‌गुण आणि त्याच्याशिवाय जीवनामध्ये दुसरे कोणतेही हित प्राप्त करून घेणे शक्य नव्हते. ते म्हणायचे की सर्व प्रकारच्या विषमता दूर करण्यासाठी आणि सामाजिक लोकशाही प्राप्त करून घेण्यासाठी शिक्षण हा एक राजमार्ग आहे.

उच्च शिक्षणातील आपल्या आपल्या लोकांच्या मागसलेपणाची जाणिव डॉ. आबेडकरांना होती. त्यांची प्रगती घडवून आणण्यासाठी शिक्षण हे फार मोठे हत्यार आहे असे त्यांना वाटत होते. आपल्या लोकांमध्ये शिक्षणाचा प्रसार करण्यासाठी त्यानी शक्य त्या साधनांचा प्रसार करण्यासाठी. त्यानी शक्य त्या साधनांचा उपयोग करण्याचा प्रयत्न केला. १९२४ मध्ये अस्पृश्यांच्या उध्दारासाठी डॉ. आबेडकरांनी बहिष्कृत हितकारिणी सभेची स्थापना केली. सभेची उद्दिष्टे होती १) वसतीगृहे उघडून दलित वर्गामध्ये शिक्षणाचा प्रचार व प्रचार करणे. २) वाचनालये, समाजकेंद्रे, अभ्यास मंडळे उघडून संस्कृतीचा प्रसार करणे. ३) औद्योगिक व कृषीशाळा निर्माण करून रोजगार उपलब्ध करून आर्थिक सुधारणा घडवून आणणे. डॉ. बाबासाहेब आबेडकरांनी मुंबई विद्यापिठ कायदा दुरूस्ती विधेयकावरील दि. ५ आक्टो. १९२७ ला आपले मत व्यक्त करताना म्हणतात,

नगर परिषद शिवाजी महाविद्यालय, मोवाड, ता. नरखेड, जि. नागपूर मो. ९४२१८०३४१०

विद्यापिठाच्या अनेक महत्त्वपूर्ण मूलभूत कार्यापैकी एक म्हणजे गरजू आणि गरिबांच्या दारापर्यंत उच्च शिक्षणाच्या सोयी पोहोचविणे हे आहे. मागासवर्गीय जमातींना उच्च शिक्षणाच्या सोयी उपलब्ध करून देणे हे कोणत्याही आधुनिक विद्यापिठाचे प्रथम कर्तव्य आहे, म्हणून विद्यापिठाच्या कारभारावर काही प्रमाणात मागास वर्गीयांचे नियंत्रण असणे आवश्यक आहे. उच्चवर्णीयांना आम्ही जसे आहोत, जेथे आहोत, तेथेच , तसेच राहावे असे वाटते.

शिक्षण हा मानवी जीवनाचा अविभाज्य घटक आहे. माणसाला जर चांगले शिक्षण मिळाले तर त्याचे जीवन समृध्द होते. शिक्षणचा दर्जा तसेच समानता प्रत्येकाला संधी मिळण्याबरोबरच गरिबालाही चांगले शिक्षण घेता आले पाहिजे. विद्यार्थ्यांना जीवनातील विविध रंगांची जाणीव करून दिली पाहिजे. विद्यार्थ्यांना जीवनातील सत्याची जाणिव करून देताना त्यांना येणाऱ्या अडचणी, आव्हाने या बाबी विद्यार्थ्याना आवर्जून सांगितल्या पाहिजेत. समाजाची खरी शक्ती माणूस आहे. समाजात परिवर्तन घडवून आणायचे असेल तर समाजातील सामाजिक समस्यांच्या निराकरणासाठी सामाजिक दृष्टी, आंतरिक तळमळ आणि सामाजिक जाणिव असणारा सामाजिक कार्यकर्ता आपल्याला शिक्षणाच्या माध्यमातून निर्माण करता आला पाहिजे. शिक्षणातून सामाजिक, आर्थिक प्रगतीच्या पाऊलखुणा उजळून निघाल्या पाहिजेत. ग्रंथ मानवाला लढण्याची शक्ती प्रदान करतात, ग्रंथ हे ज्ञानाचे वृक्ष असतात, अशा ग्रंथरूपी वृक्षाचे आपल्या जीवनात बीजारोपण करून आपल्या ज्ञानाची उंची आकाशाला गवसणी घालेल इतकी वर्धमान केली पाहिजे. नागपूर येथे २९ जुलै १९४२ ला समाजाला प्रबोधन करताना डॉ. बाबासाहेब म्हणाले होते. स्वच्छ राहाण्यास शिका, सर्व दुर्गुणांपासून मुक्त रहा. तुमच्या मुलांना शिक्षण द्या, हळूहळू त्यांच्या मनात महत्त्वाकांक्षा जागृत करा, ते थोर पुरूष होणार आहेत असे त्यांच्या मनावर बिंबवा, त्यांच्यातील न्यूनगंड नाहीसा करा, त्यांचे लग्न करण्याची घाई करू नका.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी पीपल्स एज्युकेशन सोसायटीची स्थापना करून पूर्ण देशभरात दलित समाजात जास्तीत जास्त उच्च शिक्षणाचा प्रसार करणे संस्थेच्या माध्यमातून समाजामध्ये शिकण्याची जिद्द निर्माण केली. सिध्दार्थ कॉलेज, मिलिंद कॉलेज अशी उच्च शिक्षणाची केंद्रे निर्माण केली. अस्पृश्य समाजाची जी तात्कालिक परिस्थिती होती. ती जर दूर करायची असेल तर आधी उच्च शिक्षणाडे लक्ष दिले पाहिजे. त्यासाठी ते असे म्हणत एक मुलगा बी. ए. झाल्याने अस्पृश्य समाजाचा जो आधार होईल तसा एक हजार मुले चौथी शिकून पास झाले तरी होणार नाही. अस्पृश्य समाजातील जास्तीत जास्त संख्येने मुलांनी उच्च शिक्षण घ्यावे, प्रशासनात उच्च पदे प्राप्त करावीत. शासनकर्ता जमात म्हणून समाजाची प्रगती करण्यासाठी प्रयत्न करावेत, असे त्यांना वाटत होते. त्यांनी उच्च शिक्षणासाठी गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना परदेशी पाठवण्यासाठी सहाय केलेत.

**सद्यःस्थितीचे उच्च शिक्षणः-**

स्वातंत्र्यानंतर शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण करण्यात आले. परंतु आजपर्यंत निरक्षरांची टक्केवारी पूर्णपणे कमी झालेली नाही. उच्च व दर्जेदार शिक्षण केवळ मोजक्या लोकापर्यंतच पोहोचलेले आहे. उच्च आणि दर्जेदार शिक्षणापर्यंतच गरीब वंचित समाजाला पोहचताच येणार नाही अशी व्यवस्था केली आहे. १९८० पासून विनाअनुदानित तत्त्व २००२ मध्ये शिक्षण क्षेत्राचे खासगीकरण त्यात विदेशी गुंतवणूकीला मान्यता, २००९ पासून उच्च दर्जेदार शिक्षणात आरक्षण नाही. असा सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय २०१० पासून विदेशी विद्यापीठांना प्रवेश देण्यासाठी प्रयत्न अशा सरकारच्या धोरणामुळे गरीब, मध्यमवर्गीय विद्यार्थी दर्जात्मक उच्च शिक्षणापासून वंचित राहील. चांगले करिअर करण्यासाठी चांगली रक्कम, पैशाने जग विकत घेण्याची नवीन संस्कृती उदयास येत आहे. पैशाच्या माध्यमातून चांगले दर्जेदार शिक्षण घेऊन चांगले करिअर करून श्रीमंत अधिक श्रीमंत होत आहेत. तर गरिबांवर लाचारीची पाळी येत आहे. भारतात इंग्रज व्यापारी म्हणून आले आणि राज्यकर्ते

बनलेत. सद्य:स्थितीत भारतात शिक्षण क्षेत्रात गुंतवणूक करण्यासाठी विदेशी विद्यापीठे तयार आहेत. तसे झाल्यास ज्ञानदान करणारे गुलाम करून राजसत्ता हाती घेतील व भारतात पुन्हा गुलामीचे राज्य निर्माण होईल अशी परिस्थिती निर्माण होऊ शकते. त्यामुळे पुन्हा दारिद्रयाचे दृष्टचक्र निर्माण होऊन श्रीमंत पुन्हा श्रीमंत व गरीब पुन्हा गरीब होतील.

बाबासाहेबांच्या विचारातून आपण आजच्या स्थितीचा निष्कर्ष काढल्यास आज बहुजन समाजातील हुशार अश्या विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणापासून वंचित करण्याचे धोरण असल्याचे दिसून येते. कारण ज्या लोकांकडे हजारो वर्षांपासून शिक्षणाची मक्तेदारी आहे अशा उच्चभ्रू समाजातील लोक आणि त्यांची समाज व्यवस्था बहुजन समाजातील युवकांना शिक्षणापासून कसे वंचित करता येईल याचे षडयंत्रे सतत सुरू असतात. हुशार विद्यार्थ्यांना फसवून त्यांना शिक्षणापासून वाममार्गाकडे गुन्हेगारीकडे लावण्यासाठी सतत पर्यंत उच्च वर्गातील लोक करीत असतात. असे आजच्या अनेक घटनांवरून दिसून येते. या विद्यार्थ्यांना नोकरीपासून सुध्दा वंचित करण्याचे शासन स्तरावरून सतत पर्यंत असतात. म्हणुन ही विषमता नष्ट करण्यासाठी संविधानिक मार्गाने आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा विचारानेच बहुजन समाजातील विद्यार्थ्यांसमोरील प्रश्न सोडविता येणे शक्य आहे.

**निष्कर्ष :**

१) समाजाच्या सर्व स्तरांवरील लोकांना उच्च शिक्षणासाठी आग्रह धरावा.

२) उच्च शिक्षणासाठी मागासवर्गीयांना शिष्यवृत्ती वेळेवर देण्यात यावी.

३) शैक्षणिक संस्था शासनाच्या अखत्यारीत असाव्यात.

४) उच्च शिक्षणामुळे अस्पृश्य दलित समाजातील उणीवा भरून निघतील.

५) व्यावसायिक शिक्षणावर शासनाने भर द्यावा.

६) भारतीय शिक्षण व्यवस्थेत समता, बंधूता, स्वातंत्र्य व न्याय व शील या तत्त्वांचा समावेश असावा.

७) अस्पृश्य समाजातील उच्च शिक्षित लोकांना आपल्या बांधवांच्या कल्याणाकडे लक्ष दिले पाहिजे.

८) राष्ट्रकार्य करण्यासाठी शिक्षण व्यवस्था अपयशी ठरत आहे. त्याची कारणमीमांसा शोधून त्यावर उपाय योजना करणे काळाची गरज आहे.

९) उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी मानवी जीवन विषयक शिक्षण आत्मसात करून समाजात प्रचार व प्रसार करावा त्यामूळे समाजात नवचेतना निर्माण होईल.

१०) उच्च शिक्षणामुळे समाजातील जातीयवाद, विषमता, वर्णव्यवस्था नष्ट करण्यास मदत होऊन देशाचा विकास करता येईल.

डॉ. बाबासाहेब आंबेडकराच्या शैक्षणिक विचाराचा पूर्णता समावेश केल्यास आणि त्याची संपूर्ण प्रामाणिकपणे सरकारने अंमलबजावणी केल्यास आपल्या देशातील मागासवर्गीय ओ.बी.सी., एस.सी., एस.टी., एन.टी. आणि अल्पसंख्याक समाजाचा विकास होऊन या समाजाची प्रगती करता येईल. म्हणून भारत सरकारने व राज्य सरकारने बाबासाहेबांच्या विचाराला अनुसरून देशाचे भविष्य घडविण्यासाठी प्रयत्न करणे अत्यआवश्यक आहे. त्यामुळे देशातील सामाजिक विषमता नष्ट होऊन समता प्रस्थापित करता येईल.

**संदर्भ ग्रंथ सूची :**

१) डॉ. मिलींद तायडे – शिक्षणाचे राष्ट्रीयीकरण मूलभूत गरज.

२) डॉ. बाबासाहेब आंबेडकर, गौरवग्रंथ – महाराष्ट्र राज्य साहित्य व सांस्कृतिक मंडळ मुंबई.

३) डॉ. बाबासाहेब आंबेडकर – दलितांचे शिक्षण

४) धनजंय कीर – डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र

५) डॉ. नरेद्र जाधव – डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची विचार शलाका.

६) डॉ. यशवंत मनोहर – आजचे शिक्षण आणि अध्यापक

७) डॉ. आंबेडकरांची भाषणे – सुगत प्रकाशन, पुणे.

***

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शैक्षणिक विचार

डॉ. राजेंद्र कांबळे

**प्रस्तावना :**

शिक्षण समाज परिवर्तनाचे, व्यक्तिविकासाचे प्रभावी हत्यार आहे. ज्ञानाशिवाय व्यक्ती आंधळी, पंगू व निराधार आहे. शिक्षण म्हणजे समाज प्रगती, शिक्षण म्हणजे सर्वांगीण विकास, शिक्षण म्हणजे अन्याय, अत्याचाराला वाचा फोडणारे प्रभावी हत्यार होय. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या[१] मते, 'जगातील प्रत्येक समाजाचे भवितव्य त्या त्या समाजातील सुशिक्षित लोकांवर अवलंबून असते. आजपर्यंत तुमच्यात चळवळ झाली नाही याचे कारण तुमच्यात कोणी शिकलेले लोकच नव्हते. शिक्षणामुळे माणसाला व समाजाला डोळसपणा प्राप्त होतो.' भारतीय संविधानात कलम २६ २ नुसार "प्रत्येकाला शिक्षणाचा हक्क आहे. कमीतकमी प्राथमिक आणि मूलभूत शिक्षण तरी प्रत्येकाला मोफत मिळाले पाहिजे. तसेच प्राथमिक शिक्षण अनिवार्य असले पाहिजे. तसेच तांत्रिक आणि व्यावसायिक शिक्षण हे सर्वसामान्यपणे उपलब्ध करून दिले पाहिजे आणि उच्च शिक्षणाच्या संधी प्रत्येकाला समान पातळीवर गुणवत्तेच्या आधारे सहजपणे प्राप्त झाल्या पाहिजेत." याचाच अर्थ सरकारचे हे कर्तव्य आहे की, देशाच्या प्रत्येक नागरिकांकरिता शिक्षणाची व्यवस्था कमी दरात किंवा निःशुल्क केली पाहिजे. शिक्षणाच्या खासगीकरणाचा अर्थ[२]– शिक्षणाची जबाबदारी ही शासनाची होती. लोकांना योग्य नागरिक बनविण्यासाठी त्यांना शैक्षणिक सोयी शासनातर्फे उपलब्ध करून दिल्या जात होत्या. शिक्षण हे खासगी आणि सामाजिक गुंतवणूक आहे. त्यामुळे शिक्षणाची जबाबदारी ही व्यक्तिगत विद्यार्थी आणि त्यांचे कुटुंब आणि समाज समुदाय आणि राज्य यांची होती. परंतु खासगीकरणामुळे निर्णय आणि पैसा व प्रशासनाची जबाबदारी संबंधीत अभ्यासक्रम तयार करणे या सर्व बाबी शासनाशी किंवा सार्वजनिक क्षेत्रांशी संबंधीत न ठेवता तथा खासगी क्षेत्राकडे हस्तांतरित केल्या जातात.

शिक्षणाचे खासगीकरण म्हणजे शिक्षण संस्थांमध्ये खाजगी क्षेत्राचे व्यवस्थापन आणि शासनाच्या हस्तक्षेपाचा पूर्ण अभाव होय. अशा संस्था स्वतः फार मोठी फी आकारून आणि सेवाशुल्क घेऊन आणि स्त्रोतांचा पूर्ण उपयोग करून स्वतःचा पैसा उभारू शकतात. जे फी देऊन शिक्षण घेऊ शकतात त्यांच्याकडून फी घेऊन शिक्षण दिल्यास वाईट काय असे तात्त्विक उत्तर दिले जाते. भारतात अलीकडील दशकात उच्च शिक्षणाचे खासगीकरण विविध स्वरूपांत होत आहे. ते पुढीलप्रमाणे आहे.

१) शासनाच्या उच्च शिक्षण संस्थांमध्ये सेल्फ फायनांन्सिग अभ्यासक्रम सुरू केलेत. उच्च शिक्षणाचें हे अभ्यासक्रम शासकीय संस्थांमध्ये असले तरी त्या अभ्यासक्रमांकरिता विद्यार्थ्यांना फी द्यावी लागते. याचाच अर्थ फी भरूनच विद्यार्थ्यांना हे अभ्यासक्रम शिकावे लागतात.

२) शासनाचे अनुदान मिळणाऱ्या खासगी संस्थांचे खासगी सेल्फ फायनान्सिंग संस्थामध्ये रूपांतरण करणे.

३ सेल्फ फायनांन्सिंग खासगी संस्थांचा विस्तार करण्यास परवानगी देणे. अशा प्रकारच्या उच्च शिक्षणाच्या संस्थांना धंदेवाईक खासगी उच्च शिक्षण संस्था असे म्हणतात.

शिक्षणाच्या संदर्भात सार्वत्रिक मान्यता अशी आहे की, शिक्षण हे मानव भांडवलाच्या उभारणीमध्ये महत्त्वाची गुंतवणूक आहे. ती तांत्रिक नवनिर्मिती आणि आर्थिक वृध्दींची किल्ली आहे. सर्वांना शिक्षण देण्याची व्यवस्था करणे हे शासनाचे एक प्राथमिक कर्तव्य आहे. परंतू अलीकडे देशात शिक्षणाच्या खासगीकरणाची लहर

इंदिरा गांधी कला, वाणिज्य महाविद्यालय, कळमेश्वर, नागपूर

आहे. परंतु सरकार उच्च शिक्षणाकडून प्राथमिक शिक्षणाकडे आपले लक्ष्य केंद्रित करून खासगी क्षेत्रांना उच्च शिक्षणात प्रवेश करण्याचे आवाहन करीत आहेत.

'उच्च शिक्षणाचे खासगीकरण झाल्यामुळे शिक्षणाचे व्यापारीकरण झाले. पूर्वी ज्ञान देण्याचे कार्य हे पवित्र मानले जायचे. परंतु शिक्षणाच्या खासगीकरणामुळे शिक्षण हा एक उद्योग बनला आहे. शिक्षण संस्था म्हणजे शिक्षण कंपनी आणि विद्यार्थी म्हणजे ग्राहक होत. उच्च शिक्षण ही एक क्रयवस्तू बनले आहे. ज्यांच्याकडे प्रचंड पैसा खर्च करण्याची ऐपत आहे. त्यांनाच शिक्षण विकत घेता येते. तर ज्यांच्याकडे पैसा नाही त्यांना शिक्षण विकत घेता येणार नाही. अशा प्रकारे खासगीकरणामुळे उच्च शिक्षणाचे मोठ्या प्रमाणात व्यापारीकरण झाल्याचे आढळून येते.'[४]

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी[५] "प्राथमिक शिक्षणाबरोबर उच्च तंत्रज्ञान शिक्षण मोफत द्यावे म्हणून ब्रिटिशांकडे आग्रह धरला होता. बहुजन समाज व दलित समाजाकडे त्याकाळी दमडी नव्हती, त्यांचे खूप मोठे अज्ञान होते. त्यांना शिक्षणाचा हक्क व्यवस्थेने दिला नव्हता, शिक्षणाचे महत्त्व, त्याची जाणीवही नव्हती, त्या प्रतिकूल परिस्थितीत त्यावेळी गव्हर्नर लॉर्ड-लिनलीथ गो यांच्याकडे डॉ. बाबासाहेबांनी मोफत उच्च तंत्रज्ञान शिक्षणासाठी दलित व उपेक्षित विद्यार्थ्यांना विलायतेला पाठविण्यासाठी आग्रह धरला. अशा वेळी ब्रिटिशांनी डॉ. आंबेडकरांची मागणी मान्य करून १६ विद्यार्थ्यांना मोफत विलायतेला उच्च तंत्रज्ञान शिक्षणासाठी पाठविले. डॉ. आंबेडकर नेहमी म्हणायचे की, उच्च तंत्रज्ञान शिक्षणाने मोक्याच्या उच्चपदस्थ नोकऱ्या मिळतील. ज्यावेळी उपेक्षित माणूस उच्चपदाच्या खुर्चीवर विराजमान होईल, त्यावेळी त्याला चांगला पगार तर मिळेलच. त्याचबरोबर समाजात त्याची सामाजिक पत पण वाढेल."

डॉ. आंबेडकर म्हणायचे ज्ञान हे तलवारीसारखे आहे, मग ज्ञानी माणसाने या तलवारीचा उपयोग चांगला की, वाईटासाठी करावयाचा ? हे त्या माणसाच्या शीलावर अवलंबून असते. तलवार कोणाचा खूनही करेल किंवा कोणाचा तरी प्राणही वाचवील. ज्ञानाचेही तसेच आहे. शिकलेल्या माणसांचे फक्त पोट भरून भागणार नाही. स्वार्थापलीकडे त्यांना काहीच दिसत नसेल. त्यांना जर परमार्थ करता येत नसेल तर ते शिक्षित होऊन त्यांचा काय उपयोग ? डॉ. आंबेडकरांना जीवनवादी, शास्त्रीय, मानवतावादी, समाजहितवादी, शील आणि प्रज्ञा यांचा सुवर्णसंगम साधणारे शिक्षण अभिप्रेत होते. डॉ. आंबेडकर आयुष्याच्या शेवटी १८ मार्च १९५६ ला आगरा येथे म्हणाले होते की, "पढे-लिखे लोगों ने मुझे धोखा दिया"[६] आज डॉ. आंबेडकरांमुळे समाजाला ज्ञान मिळाले, परंतु समाजाचे समाजऋण ज्या पध्दतीने फेडून द्यावयाचे होते, तसे झाले नाही. शिकलेल्या समाजाला सामाजिक बांधिलकीचा विसर पडत आहे.

इ.स. १९३२ ला राऊंड टेबल कॉन्फरन्स लंडन येथे भरली होती. तिथे शिक्षणातील राखीव जागांबरोबर राजकीय व नोकरीमधील आरक्षणाबाबत डॉ. आंबेडकरांनी आग्रह धरला होता. त्यामुळे अनुसूचित जाती, जमातीला शिक्षणात आरक्षण मिळू लागले आणि शिक्षण घेण्याची सुवर्णसंधी मिळू लागली. डॉ. आंबेडकरांनी आर्थिकदृष्ट्या दुर्बलांना शिक्षणासाठी ईबीसी सवलत जाहीर केली. त्यामुळे त्यांना शिक्षण घेता आले तर दारिद्र्य रेषेखालील बीपीएल लोकांना बजेटमध्ये झुकते माप देण्याची कायदेशीर तरतूद डॉ. आंबेडकरांनीच केली. डॉ. आंबेडकरांनी घटनेत ३४० कलमान्वये ५२ टक्के ओबीसीसाठी त्यांना शैक्षणिक, राजकीय, आर्थिक उन्नतीसाठी तरतुद केली. त्यामुळे ५२ टक्के इतर मागासवर्गीय मुले आरक्षणामुळे उच्च शिक्षण घेऊ लागले.

सत्तेतील पुढाऱ्यांनी शैक्षणिक संस्था काढून शाळा, महाविद्यालये, विद्यापीठे सर्रास वाटप केली. संस्थाचालक सत्तेतील मालक असल्यामुळे संस्था चालकांनी कॅपिटेशन फीस व प्रवेश फीसच्या नावाखाली भरमसाठ माया जमा केली. आरक्षणाला फाटा देऊन व्यावसायिक शिक्षण संस्थेत मॅनेजमेंट कोट्यातून मोठमोठ्या देणग्या वसूल केल्या जात आहेत. शासनात हे संस्थाचालक मालक असल्यामुळे यांच्या विरोधात

कार्यवाही होत नाही. एकीकडे एस.सी., एस.टी., ओबीसीचे आरक्षण संपविले जात आहे. तसेच गुणवत्तेच्या नावाखाली आरक्षणाच्या जागा संपविल्या व दुसरीकडे जो जास्त पैसा देईल त्याला शिक्षणाच्या जागा गुणवत्ता न पाहता वाटप केल्या जात आहेत. शिक्षण देणे हा संस्थाचालकांचा एक प्रकारचा उद्योग झालेला आहे. शिक्षण संस्था हा कारखाना झाला असून त्याचे उत्पादन हे शिक्षण झालेले आहे. अशा शिक्षण संस्थामध्ये विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक आणि बौध्दिक विकासाच्या संदर्भात तसे शैक्षणिक वातावरण नसते.

डॉ. आंबेडकर म्हणत होते की, 'शिक्षक हे राष्ट्राचे रथचालक असतात.'[७] परंतु शिक्षक व प्राध्यापक तसेच संशोधकाचा विचार केला तर त्यांच्या संशोधनाची, शिक्षणाची कीव येते कारण विज्ञान विषयात पी.एचडी. केलेले ओबीसी जर आपल्या घरी सत्यनारायणाची पूजा करीत असतील, वनस्पतीशास्त्रात पी.एचडी. झालेली ओबीसी महिला जर चांगला नवरा मिळावा म्हणून अंकुर उगवलेल्या गव्हाची पूजा करीत असेल वा सात जन्म एकच नवरा मिळावा म्हणून वडाच्या झाडाला पांढरा धागा गुंडाळत प्रदक्षिणा घालत असेल, रसायनशास्त्रात पी.एचडी. झालेली ओबीसी कुंभमेळ्यातील गढूळ पाण्याला पवित्र समजत असेल आणि खगोलशास्त्रात पी.एचडी. झालेला ओबीसी ग्रह दशेवर विश्वास ठेवून जगत असेल, परमहासंगणक निर्माण करणारी व्यक्तीही दगडधातूचित्रात ईश्वर शोधत असेल, डॉक्टरांच्या दवाखान्यात देवतांच्या मूर्ती व लिंबू मिरची बांधली जात असेल, तर ओबीसींची मानसिकता किती गुलामगिरीची आहे.

**समारोप :**

डॉ. आंबेडकरांसारख्या महापुरुषांनी मागासलेल्या वर्गाला प्रगती करता यावी यासाठी जिवाचे रान केले. शिक्षण घेऊन हा वर्ग समाजाची सेवा करेल असे त्यांना वाटत होते. परंतु परिस्थिती वेगळीच आहे. आज शिकलेला वर्ग सुध्दा शोषण सहन करीत आहे. नोकरीकरिता डोनेशन असो किंवा शिक्षणाचे खासगीकरण असो. या विषयावर शिक्षित वर्ग सुध्दा कोणतेही समाजाचे प्रबोधन करीत नाही. स्वत: प्रतिक्रिया देत नाही. आंदोलन उभारत नाही. त्यामुळे कमी शिकलेले संस्थाचालक सुध्दा शिक्षितांचे शोषन करतात. शिक्षित वर्ग अंधश्रध्देच्या फेऱ्यातुन अजूनही निघालेला नाही. त्यामुळे शिक्षितांचे खासगी जीवन काही वेगळेच दिसून येते. हा वर्ग क्रांतीपासून चळवळीपासून अलिप्त राहण्याची भुमीका पार पाडतो आहे. ही बाब देशाचे प्रगतीकरीता सुध्दा बाधक आहे. आधी 'मनुवाद्यांनी' शोषण केले आता 'मनीवादी' शोषण करीत आहेत व शिक्षित वर्ग विज्ञानाऐवजी अंधश्रध्देच्या जवळ जात आहे.

**संदर्भ :**


१ संस्था त्रैमासिक ऑक्टोबर. २०१५ निब्बाण टेम्पल, मानवसेवा नगर, सेमिनरी हिल्स, नागपूर.

२ मानवी हक्क आणि सामाजिक न्याय, पी.के. कुलकर्णी, डायमंड पब्लिकेशन पूणे. २०१३ पृ. ८३

३ भारतीय समाज प्रश्न आणी समस्या, डॉ. प्रदीप आगलावे, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर २०१५ पृ. १८४-१८५

४ तत्रैव पृ - १८८

५ हनुमंत उपरे, ओबीसीला पयाय धर्मांतर, बहुजन साहित्य प्रसार केंद्र, नागपूर २०१२ पृ. ४७-४८

६ नानकचंद रत्तू, डॉ. आंबेडकर के अंतिम कुछ वर्ष पृ. ८२ सम्यक प्रकाशन, दिल्ली २०११

७ हनुमंत उपरे, उपरोक्त पृ. ५०

८ थोरांची थोरवी, धोंडिराम सिंह राजपूत, रजत प्रकाशन, औरंगाबाद २०१०


* * *

# भारतापुढील शैक्षणिक आव्हाने

प्रा. डॉ. सरोज आगलावे

**प्रास्ताविक:-**

भारतीय समाजात पूर्वी शिक्षणाचा अधिकार काही विशिष्ट वर्गाला होता. बहुसंख्य समाजाला जाणीवपूर्वक शिक्षणापासून वंचित ठेवण्यात आले होते. १९ व्या शतकात ब्रिटिशांच्या काळात नवे शैक्षणिक धोरण सुरू झाले. शिक्षणाची भारतातील वाईट स्थिती ज्योतिराव फूले यांनी हंटर कमिशनला कळविली. शूद्र, अतिशूद्र आणि स्त्रियांना शिक्षण देण्यासाठी फूले दाम्पत्त्यांनी विशेष प्रयत्न केले. पुढे छत्रपती शाहू महाराज, सयाजीराव गायकवाड, डॉ. भीमराव आंबेडकर यांनी वंचितांसाठी शिक्षणाची दारे खुली केली. स्वातंत्र्यानंतर भारतीय संविधानाने शिक्षणाची संधी सर्वांना उपलब्ध करुन दिली. भारतीय संविधानाच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार चौदा वर्षे वयाच्या आतील सर्व मुलामुलींना शिक्षण सक्तीचे आणि मोफत करण्याचे अभिवचन आहे. भारत सरकारने एकूण राष्ट्रीय उत्पन्नाच्या (GDP)- ६ टक्के रक्कम शिक्षणावर खर्च करण्याचे आणि त्या रकमेच्या अर्धा टक्के रक्कम प्राथमिक शिक्षणावर खर्च करण्याचे जाहीर केले. परंतु प्रत्यक्षात मात्र तसे झाले नाही. १९५१-५२ मध्ये शिक्षणावर केवळ ०.७ टक्के खर्च होत होता जो १९९९-२००० मध्ये वाढून ३.९० टक्के झाला. साक्षरता दराचे प्रमाण जरी वाढले तरी यामुळे शिक्षण क्षेत्रातील दोष झाकले जाणार नाहीत. भारत सरकारने १९८५ मध्ये प्रसिद्ध केलेल्या Challenges of Education दस्तऐवजात शिक्षण क्षेत्रातील वास्तव परखडपणे मांडले होते. शिक्षण क्षेत्रात सुधारणा सुचविण्यासाठी वेळोवेळी विविध आयोग नेमले. पण ते सर्व अहवाल धूळ खात पडलेत. त्यात कोठारी आयोगाचा अहवाल महत्त्वाचा होता. या आयोगाने शैक्षणिक गुणवत्ता व राष्ट्रहिताला महत्त्व दिले होते. पण त्याच सूचना दुर्लक्षिल्या गेल्या. त्याचा परिणाम असा झाला की जी शैक्षणिक केंद्रे सामाजिक अभिसरणाची ठिकाणे बनायला पाहिजे होती ती आज विषमता जोपासणारे अड्डे बनले आहेत. याचा प्रत्यय आज येतो आहे.

युनेस्कोने पॅरिस येथील आपल्या मुख्यालयात ५ ते ९ ऑक्टोबर, १९९८ ला उच्च शिक्षणावर जागतिक परिषद आयोजित केली होती. या परिषदेने जाहीर केले की, शिक्षण हे मानवी अधिकार, लोकशाही, स्थायी विकास आणि शांततेचा खांब आहे. त्यामुळे सर्वांना आपल्या आयुष्यात शिक्षणासाठी प्रवेश देण्यात येईल. त्याकरिता विविध विभाग सामान्य तांत्रिक आणि शालेय व्यावसायिक यामध्ये आणि शालेयोत्तर व्यावसायिक शिक्षण त्याचप्रमाणे विद्यापीठे, महाविद्यालये आणि तांत्रिक संस्था यामध्ये समन्वय आणि सहकार्य घडवून आणणे आवश्यक आहे.

उच्च शिक्षणावरील या जागतिक परिषदेने मानवी अधिकारांच्या वैश्विक जाहीरनाम्यातील कलम २६ ची आठवण करून हे कलम सर्व देशांना बंधनकारक असल्याचे स्पष्ट केले. मानवी अधिकारांच्या या वैश्विक जाहीरनाम्यातील कलम ६ मधील पहिला परिच्छेद पुढीलप्रमाणे आहे. प्रत्येकाला शिक्षणाचा अधिकार आहे आणि उच्च शिक्षणात सर्वांना, गुणवत्तेच्या आधारावर प्रवेश मिळेल. जागतिक परिषदेने उच्च शिक्षणास नवी दृष्टी दिली. या परिषदेच्य कलम ३ मध्ये उच्च शिक्षणाच्या प्रवेशासाठी समतेच्या तत्त्वांचा पुरस्कार केला आहे. उच्च शिक्षणात प्रवेश देताना वंश, लिंग, भाषा

सहयोगी प्राध्यापक, समाजशास्त्र विभाग, महिला महाविद्यालय, नंदनवन, नागपूर

किंवा धर्म किंवा आर्थिक, सांस्कृतिक किंवा सामाजिक फरक किंवा शारीरिक अपंगत्व या आधारावर कोणत्याही प्रकारची विषमता पाळली जाणार नाही. समतेच्या तत्वानुसार सर्वांना उच्च शिक्षण घेण्याची संधी मिळेल. भारतातील उच्च शिक्षणापुढे अभ्यासक्रम, उच्च शिक्षणाच्या अपुऱ्या सोयी, अद्ययावत प्रयोगशाळांचा अभाव, प्राध्यापक आणि प्रशिक्षकांची उदासीनता, रोजगारांची हमी नसणे इत्यादी अनेक समस्या आहेत. उच्च शिक्षणात होणारे खासगीकरण हे आपल्या देशातील उच्च शिक्षणातील फार मोठे अरिष्ट होय. उच्च शिक्षणाच्या खासगीकरणामुळे सर्वसामान्य कुटूंबातील मुलं प्रवेश आणि शिक्षण शुल्काची वाढलेली प्रचंड रक्कम देऊ शकत नाहीत. त्यामुळे ते उच्च शिक्षणापासून वंचित झाले आहेत.

१९९१ मध्ये भारतात जागतिकीकरणाला सुरुवात झाली. १९९५ मध्ये WTO ची स्थापना झाल्यानंतर गॅट्स कराराअंतर्गत डंकेल प्रस्ताव मंजूर झाल्यानंतर भारताची शिक्षण व्यवस्था ही जागतिक उदारीकरणाच्या धोरणामुळे जागतिक बाजारासाठी खुली करण्यात आली. मुक्त आर्थिक धोरणानुसार शिक्षण क्रयवस्तू ठरले. शिक्षणावरील खर्च अनुत्पादक समजला गेल्यामुळे शिक्षणावरील खर्चात कपात करण्यात आली. स्वातंत्र्यानंतर भारताने स्वीकारलेल्या कल्याणकारी योजनेला व भारतीय संविधानातील कलम २९ (१) Right to Education मूलभूत अधिकाराला मूठमाती देणारी शैक्षणिक धोरणे स्वीकारली जात आहेत. संविधानातील १४, १५, १६ व १७ या कलमांना बाजूला सारून, शिक्षणाचे खासगीकरण करून शैक्षणिक भेदभावाला सुरुवात झाली. त्याचा परिणाम बहुजन समाजावर झाला. शिक्षणाच्या बाजारीकरणाने आर्थिकदृष्ट्या बहुजन समाजाला दूर लोटल्याने त्यांचे उच्च शिक्षणातील प्रमाण कमी होत आहे. जागतिक स्तरावरील एलपीजी चा परिणाम भारतीय शिक्षण व्यवस्थेवर झाला आहे आणि त्यामुळे आज शिक्षण क्षेत्रात अनेक प्रश्न उपस्थित झाले आहेत. आज अनेक शैक्षणिक आव्हाने भारतासमोर उभी ठाकली आहेत.

**शोधनिबंधाचे उद्देश :**

१. भारतातील शिक्षणाची सद्यस्थिती जाणून घेणे.

२. बदलत्या शैक्षणिक धोरणांचा समाजावरील परिणाम जाणून घेणे.

३. वंचित समूहांसमोरील शैक्षणिक आव्हानांचा आढावा घेणे.

४. शैक्षणिक गुणवत्तेचा विचार करणे.

५. जागतिक स्तरांवरील बदलत्या शैक्षणिक परिणामांचा भारतीय शिक्षण व्यवस्थेच्या परिप्रेक्षामध्ये विचार करणे.

**अभ्यास पध्दती :**

प्रस्तुत शोधनिबंध हा व्दितीयक तथ्यांच्या संकलनावर आधारित आहे. शोधनिबंधासाठी विविध पुस्तके वर्तमानपत्रांतील लेख, मासिके, वार्षिकांक, इंटरनेटवरील माहितीचा आधार घेतला आहे.

**भारतापुढील शैक्षणिक आव्हाने :**

**शिक्षणातील साचलेपणा:-**

१९९१ नंतर स्वीकारलेल्या नव्या आर्थिक धोरणांचा स्वीकार केल्यामुळे शिक्षाण क्षेत्रावरील जबाबदारी वाढली. शिक्षण क्षेत्रात बरेच बदल अपेक्षित होते परंतु आपण जुने इन्फ्रास्ट्रक्चर, जुन्या नैसर्गिक व मानवी संसाधनांसह २१ व शतकात उभे आहोत. तोच तो जूना अभ्यासक्रम, शिक्षकांची उदासीनता, जुन्या इमारती, जूने ग्रंथालय, शाळांची वाईट अवस्था, विद्यार्थ्यांच्या शिक्षणाप्रतीच्या आवडीचा अभाव कारण रोजगाराची हमी नाही, प्राथमिक सोयी, सुविधांचा अभाव यामुळे शिक्षणसंस्था आणि एकूणच शिक्षण व्यवस्थेत एक प्रकारचा ठराविक साचलेपणा आला आहे. या शिक्षण व्यवस्थेमुळे विद्यार्थी केवळ परीक्षार्थी झाला आहे. ज्ञानार्थी नाही. त्याला केवळ पदवी हवी आहे जेणेकरून पदवीच्या आधारे नोकरी मिळेल पण आता नोकरीची हमी सुद्धा राहिली नाही. या

सर्व प्रकारामुळे शिक्षण क्षेत्राला मरगळ आलेली आहे. ती दूर करणे आवश्यक आहे. हा साचलेपणा काढून शिक्षण क्षेत्राला गतिमान करण्याची गरज आहे.

**डिजिटल लिटरसी मिशनः-**

२१ व शतकातील Social Transformation च्या युगात Communication Computer Network आणि Knowledge अत्यावश्यक आहे. अलीकडे डिजिटल हा शब्द अनेक ठिकाणी अनेकदा ऐकायला मिळतो. परंतु भारताला डिजिटल इंडिया बनविणसाठी आपण तयार आहोत ? वरील चारही बाबींसाठी भारताला बरीच पावले उचलणे गरजेचे आहे. Communicate च्या साधनांचा वापर वाढवावा लागेल. भारतात Computer Literacy केवळ ६.१५ टक्के आहे. 5Network चे जाळे भारतभर (विशेषतः ग्रामीण भागात) पसरलेले नाही, यावर विशेष लक्ष द्यावे लागेल. कारण उत्तर आधुनिक काळात संगणक साक्षरता, तंत्रज्ञान साक्षरतेवरून जगाची विभागणी दोन वर्गात होत आहे. तंत्रज्ञान ज्याच्याकडे तो देश प्रगत ठरेल त्याचे वर्चस्व जगावर राहिल. मधल्या काळात भारताने IT सेक्टरला महत्व दिले. IT सेक्टरने एकाच प्रकारचा व्यवसाय दिल्याने IT सेक्टर कोलॅप्स झाले. प्जसेक्टरला ॅवतसक डंतामजनाही. १ महिन्यात ६०००० कंपन्या बंद पडल्या. तांत्रिक प्रगती करणे ही काळाची गरज आहे हे ओळखून डिजिटल लिटरसी मिशन राबविणे आवश्यक आहे.

**मागणी आणि पुरवठा यात महदंतरः**

आजच्या बदलत्या बाजारीकरणाच्या युगात प्रत्येक गोष्ट मार्केट लक्षात घेऊनच करावी लागते. मार्केटच्या अनुकूल अभ्यासक्रम आखला जावा. मार्केटला जे स्कील हवे असेल त्यानुसार Program करणे गरजेचे आहे. परंतु जागतिक बाजारपेठेचा विचार उच्च शिक्षणाचा अभ्यासक्रम आखताना दिसत नाही. Supply आणि Demand बरेच अंतर दिसते. प्रधानमंत्री नरेंद्र मोदीनी Skill Development वर भर दिला आहे. त्यादृष्टीने अभ्यासक्रम तयार करणे गरजेचे आहे.

**मूलभूत संशोधनावर भर नाहीः**

भारत मुलभूत संशोधनात मागे आहे. मौलिक चिंतन भारतात होत नाही. High Tech Libraries आणि Loboratories चा भारतात अभाव आहे. भारतात संशोधन केवळ डिग्री मिळविण्यासाठी केले जाते. त्या संशोधनाचा दर्जाही निम्न असतो. मूलभूत संशोधन करणारे नोबेल पारितोषिक विजेते ठरतात. किती भारतीय नोबेल पारितोषिक विजेते आहेत? प्राध्यापकांनी संशोधन करावे यासाठी शासनाकडून विविध प्रकल्पांसाठी अनुदान दिले जाते. शैक्षणिक गुणवत्ता संशोधनाच्या माध्यमातून वाढविता येईल हा आशावाद ठेवून युजीसी प्रकल्पाकरिता अनुदान देत असते. संशोधनही भरपूर होत आहे. परंतु त्या संशोधनाचा दर्जा तपासण्याची गरज आहे. भारताच्या विकासाच्या अनुषंगाने मूलभूत संशोधन होणे गरजेचे आहे.

**शिक्षणाचे खासगीकरण आणि गुणवत्तेचा प्रश्न :**

पाश्चात्य देशांतील ४०० विद्यापीठ भारतात येण्यास उत्सुक आहेत. या विद्यापीठांना हव्या असलेल्या सुविधा पुरविण्याची जबाबदारी शासनाने घेतली आहे. या विद्यापीठांचा अभ्यासक्रम कोणत्या देशाच्या विकासाच्या अनुषंगाने तयार करण्यात आलेला आहे ? दर्जेदार उच्च शिक्षण या विद्यापीठांतून मिळेल का ? या विदेशी विद्यापीठाच्या तुलनेत भारतीय विद्यापीठे तग धरू शकतील का? या विदेशी विद्यापीठांची शैक्षणिक गुणवत्ता कोण तपासणार ? भारताचे शिक्षण क्षेत्र विदेशी विद्यापीठांसाठी खुले केल्यानंतर असे अनेक प्रश्न उपस्थित झाले आहे. हे विदेशी विद्यापीठ भरमसाट शिक्षण शुल्क आकारणार. अशा विद्यापीठांतून पैसे देऊन श्रीमंतांची मुले प्रवेश घेतील व गरीब पण हुशार विद्यार्थी या विदेशी विद्यापीठांतील शिक्षणापासून वंचित राहतील. असे हुशार शिक्षणापासून वंचित झालेल्या गरीब विद्यार्थ्यांनी जर आपल्यावरील अन्यायाला प्रत्युत्तर म्हणून जर हातात बंदूक घेतली तर

आपण त्यांना काय म्हणणार ? आतंकवादी की देशद्रोही? म्हणून शासनाने शिक्षणाच्या खासगीकरणावर फेरविचार करावा.

१९९१ नंतर भारताने स्वीकारलेल्या खासगीकरणाच्या धोरणाचा परिणाम शिक्षण क्षेत्रावरही झाला. शिक्षण ही क्रय वस्तु ठरली. शिक्षण शुल्क आकारण्याचा अधिकार शिक्षण संस्थांना दिला. शिक्षणसंस्थांनी भरमसाट शुल्क आकारले. (उदा. MAPPY) त्याचा परिणाम गरीब विद्यार्थ्यांवर झाला. पैशाअभावी ते उच्च शिक्षण घेऊ शकत नसल्याने त्यांचे आयुष्य अंधकारमय झाले आहे. श्रीमंतांची मुले मात्र जास्त पैसा देऊन शिक्षण घेतील. बुद्धिहीन उच्चशिक्षितांचा एक नवा वर्ग तयार होईल. पैसे मोजून पदव्या घेणाऱ्याची गुणवत्ता मात्र विचारायलाच नको. शिक्षणासाठी केलेला अवाढव्य खर्च आणि नोकरी मिळविण्यासाठी दिलेली लाखों रूपयांची लाच हा सर्व पैसा वसूल करण्यासाठी उच्च शिक्षित बुद्धिहीन श्रीमंत युवावर्ग जर भ्रष्टाचार करेल तर त्याला जबाबदार कोण ?

उच्च विद्यापीठांच्या खासगीकरणाबद्दल University News (१४ जुलै २००३) च्या अंकात Privatization of Higher Education लेखात शेख सलीम यांनी असा निष्कर्ष काढला की, 'उच्च शिक्षण हे श्रीमंतांसाठी राहील आणि गरीब उच्च शिक्षणापासून वंचित होतील.'

**Brain Drain ची समस्या:**

बिल क्लिंटनने Brain Drain वर नियंत्रण ठेवण्यासाठी प्रत्येक विद्यार्थ्याला राष्ट्रासाठी राष्ट्रीय सेवा देणे बंधनकारक असल्याचे आदेश दिले होते. भारतात Brain Drain रोखण्याचा कायदा नाही. नेहरूंनी काही प्रमाणात प्रयत्न केला होता परंतु अमेरिकेने भारतावर दबाव आणला. कारण भारतातील Best Brain स्वस्त किमतीत मिळावे म्हणून अमेरिकेने भारतात IITs स्थापण्यावर भर दिला. IIT चे सिलॅबस अमेरिकेला लक्षात ठेवूनच केला गेला असे मत युजीसी चे माजी अध्यक्ष प्रो. यशपाल यांनी व्यक्त केले होते. भारतात Global Opportunities नसल्याने talented युवा वर्ग परदेशांत जात आहे. याच intelligence च्या आधारे आपण भारताला बौद्धिक आणि आर्थिक महासत्ता बनवू शकलो असतो. पण Brain Drain भारत रोखू शकला नाही.

**Public Private Participation -**

अलीकडे PPP च्या संकल्पनेबाबत बोलले जाते. ही संकल्पना १९९४ मध्ये चीनने राबविली. चीनमध्ये मीन-बॅन ही संकल्पना आली. उच्च शिक्षण संस्थांतील स्थानिक लोकांचा सहभाग वाढला. भांडवलदार आपला बाजाराभिमुख अभ्यासक्रम या १३०० संस्थांना देतात. त्या संस्था Low Cost Program Courses तयार करून देतात व विद्यार्थी तसे तयार केले जातात. विद्यार्थ्यांना बाजाराभिमुख अभ्यासक्रम केल्यामुळे रोजगार सहज उपलब्ध होतो. बेकारीचा प्रश्नही मिटतो. परंतु भारतात मात्र चित्र उलट आहे. येथे Private सेक्टरचे उद्दिष्ट निव्वळ नफा कमावणे हे आहे. शिक्षण क्षेत्राच्या चाव्या सरकार समारंभपूर्वक खासगी क्षेत्राच्या हातात देत आहे. या Private सेक्टरला उच्च शिक्षणाशी काही देणे घेणे नाही. शिवाय जनतासुद्धा आपली जबाबदारी सरकारवर टाकून मोकळी होत आहे. त्यामुळे पीपीपी ची संकल्पना भारतात मूळ धरू शकली नाही.

**शिक्षणाचे भगवेकरण:**

भारताला जसा शेजारच्या राष्ट्राकडून धोका आहे, त्या बाह्य शक्ती भारतातील अंतर्गत शांतता भंग करू इच्छितात. त्याचप्रमाणे भारतात काही फुटीरतावादी शक्ती आहेत. त्या देशात अशांतता व अस्थिरता निर्माण करण्याचा प्रयत्न करीत आहेत. भारताने लोकशाहीचा अवलंब केल्यानंतर सर्व भारतीयांना स्वातंत्र्याचा अधिकार प्राप्त झाला. घटनेच्या माध्यमातून धर्मनिरपेक्षता पाळण्याची हमी भारताच्या लोकांनी दिली. परंतु अलीकडे

एक विशिष्ट प्रभावी विचारधारेचे लोक मात्र देशात अस्थिरता, फुटीरता आणण्याचा प्रयत्न करीत आहेत. घटनेने प्रदान केलेल्या स्वातंत्र्यावर गदा आणत आहे. त्याचा फटका शिक्षण क्षेत्रालाही बसत आहे. विध्वंसक शक्ती देशात विघातक कृत्य करून उच्च शिक्षणापासून बहुजन समाजातील विद्यार्थ्यांना मागे खेचण्याचा प्रयत्न करीत आहेत. खरे तर धर्म आणि शिक्षण ही दोनही क्षेत्रे वेगवेगळी आहेत परंतु शिक्षण क्षेत्रात धर्माला घुसवून अलीकडे जे वादळ निर्माण करण्यात येत आहे त्याचा परिणाम मागास जातीच्या विद्यार्थ्यांना भोगावा लागत आहे. जात, धर्म विचारधारेच्या आधारांवर होणारा धुडगूस देशाची प्रतिमा मलिन करीत आहेत. NCERT च्या अभ्यासक्रमांमधून याच प्रकारचा भेदाभेद जोपासला जात आहे. विशिष्ट एका धर्माची धार्मिक मूल्ये अभ्यासक्रमांत टाकण्यात आली आहेत. शिक्षणातील भगवेकरण थांबले पाहिजे.

**सारांश :**

२१ व शतकात जग विज्ञान-तंत्रज्ञानाने समृद्ध होऊन सर्व क्षेत्रांत प्रगती करीत आहे. भारत देखील त्यादृष्टीने प्रयत्नशील आहे. भारतात युवा मनुष्यबळ सर्वाधिक आहे. त्या मनुष्यबळाला शिक्षित आणि प्रशिक्षित केल्यास डॉ. अब्दुल कलामांच्या स्वप्नांतील भारत २०१० पर्यंत आर्थिक महासत्ता होईल. विज्ञान-तंत्रज्ञानाच्या आधारे आर्थिक विकास साधताना बौद्धिक विकासावर भर देणे आवश्यक आहे. परंतु त्यादृष्टीने भारतात पुरेशा शैक्षणिक सुविधा उपलब्ध नाहीत. सरकारने स्वीकारलेल्या शैक्षणिक धोरणामुळे उच्च शिक्षण क्षेत्रावर अरिष्ट्ये येत आहेत. त्यामधून मार्ग काढावा लागेल. शिक्षणाची गुणवत्ता वाढवावी लागेल. शिक्षणावरील खर्चांत वाढ करावी लागेल. शिक्षणाच्या खासगीकरणावर अंकुश घालावा लागेल. बहुजनांच्या शैक्षणिक विकासाकडे लक्ष द्यावे लागेल. जागतिक बदलांचा विचार करीत भारतातील परिस्थिती लक्षात घेऊन उच्च शिक्षणासंदर्भात नियोजन करावे लागेल. Think Globally Act Locally या प्रकारच्या नीतीचा अवलंब करावा लागेल.

**संदर्भसूची:**

१. आंबेडकर बी.आर. 'दलितांचे शिक्षण' अनुवाद प्रा. देवीदास घोडेस्वार, समता प्रकाशन, नागपूर

२. भावे.श्री मा. 'उच्च शिक्षणाची वाटचाल आणि आव्हाने, सामाजिक परिवर्तनः चिकित्सा आणि भवितव्य संपादक, जावडेकर शरद व अन्य, सुगावा प्रकाशन पुणे

३. Definition approved by the General Conference of UNESCO at its 27th Session (November 1993) in the Recommendations on the Recognition of Studies and Qualifications in Higher Education.

५.Shaikh Saleem – Privatization of Higher Education (Article) 'University News, Editor – Dr. Goswamy July 14 – 20, 2003

६. World Conference on Higher Education – Edited by – D Bhavskara Roa, Discovery Publishing House. New Delhi, 2001.

७. http://www.ugc.ac.in/

८. www.ugc.ac.in / pdfnews / A nnual_Report_ 2011-12 _ English_final.pdf

* * *

# महाराष्ट्रातील उच्च शिक्षण आणि बेरोजगारीचा प्रश्न

**डॉ. नारायण कांबळे**

**प्रस्तावना :**

शिक्षण ही एक अखंड चालणारी प्रक्रिया आहे. ती समाजातच घडत असल्यमुळे एक सामाजिक प्रक्रिया बनली आहे. या प्रक्रियेतूनच व्यक्तीच्या वर्तनात बदल संभवतात, समाज हा गतिशील आहे, समाज रचना बदलणारा आहे. शिक्षण म्हणजे मानवी कल्याणाचा मार्ग होय. शिक्षण हे जीवन आणि जीवनातील इच्छा, आकांक्षा आणि संकल्प जाणून घेण्याचे महत्त्वाचे साधन मानले जाते. उच्च शिक्षणाचा अर्थ असा सांगता येईल की, भावी जीवनात आवश्यक असणारे ज्ञान, आरोग्य, उपजीविकेचे साधन, समायोजन करण्याचे सामर्थ्य, विविध गुण व कौशल्ये या सर्वांची जोपासना करणे म्हणजे 'उच्च शिक्षण' होय.

उच्च शिक्षणविषयक वेगवेगळ्या विचारवंतांच्या दृष्टिकोन पुढीलप्रमाणे सांगता येईल. स्वामी विवेकानंदाच्या मते, "शिक्षण म्हणजे माणसातील पूर्णत्वाचा आविष्कार होय. संपूर्ण माणसाचा विकास करणे, इच्छाशक्तीचा विकास करणे, तिचे नियंत्रण करुन आत्मविकासाच्या कामी तिचा विनियोग करण्याचे सामर्थ्य म्हणजे उच्च शिक्षण होय." म. गांधजींच्या मते, "केवळ साक्षरता म्हणजे उच्च शिक्षण नव्हे, शिक्षणाचा प्रारंभ देखील नव्हे, आत्मा आणि मन यांचा परिपूर्ण विकास करुन व्यक्तीमधील सर्वोत्कृष्ट गुणांची अभिव्यक्ती हेच खरे शिक्षणाचे ध्येय होय." डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मते, "उच्च शिक्षण म्हणजे सामाजिक क्रांतीचे एक अत्यंत प्रभावी साधन आहे. उपासमारीने शरीराचे पोषण कमी झाल्यास माणूस किंवा व्यक्ती हीनबल होऊन अल्पायुषी होतो, पण शिक्षणापासून व्यक्ती वंचित राहिल्यास जिवंतपणीच तो दुसऱ्याचा गुलाम बनतो. सामाजिक गतिशीलता, विचारांचे परिवर्तन, विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्त्व घडवून आणण्यासाठी उच्च शिक्षणाची मदत होते. उच्च शिक्षण हे तर सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, आर्थिक, शैक्षणिक परिवर्तन घडवून आणणारे महत्त्वाचे साधन आहे." म्हणून उच्च शिक्षणाची संधी राज्यातील सर्व घटकांना मिळणे आवयक आहे. राज्यातील सर्व समस्यावर उच्च शिक्षण एक प्रभावी औषध आहे. राज्यात एकात्मता, समानता, गुणवत्ता निर्माण होण्याला मदत होत असते. सरकारला राज्यात समाज परिवर्तन घडवून आणावयाचे असेल तर अगोदर शिक्षणाद्वारे व्यक्ती परिवर्तन घडवून आणणे आवश्यक आहे. म्हणजेच उच्च शिक्षण घेणाऱ्या तरुणांकडून आर्थिक व सामाजिक परिवर्तन घडवून आणणे सोपे जाईल.

**महाराष्ट्रातील उच्च शिक्षणातील प्रगती :**

महाराष्ट्रातील उच्च शिक्षणाच्या प्रगतीविषयीची आकडेवारी सन १९६०-६१ ते २००१-०२ या कालावधीमध्ये तक्ता क्र. १ मध्ये दिलेली आहे. सदरच्या तक्त्यानुसार माध्यमिक आणि उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या किती प्रमाणात वाढत आहे. आणि त्याचबरोबर संस्थेची किंवा महाविद्यालयीच स्थिती दर्शविली आहे. टेबल क्र. १ दर्शवितो की, सन १९६०-६१ ते १९७०-७१ मध्ये विद्यार्थी संख्या वाढीचा दर १२.५६ टक्के होता तर कॉलेज वाढीचा दर ११.६३ टक्के होता. हा दर १९६०-६ ते २००२ पर्यंत सर्वाधिक असल्याचे दिसून येते. सन १९७०-७१ ते १९८०-८१ या दहा वर्षांच्या कालखंडात संस्था वाढीचा दर अतिशय कमी तर विद्यार्थी वाढीचा दर अधिक होता. सन १९८०-८१ ते १९९०-९१ या कालावधीत संस्थांची संख्या वाढली त्या तुलनेत विद्यार्थी संख्येत आणखीन वाढ झाली. सन १९९०-९१ ते १९९९-२००० या कालखंडात संस्थेच्या वाढीच्या दरात व विद्याथ्री संख्येत घट झालेली दिसून येते. सन २०००-०१ आणि २००१-०२ या कालावधीत असे दिसून येते की, संस्था वाढीचा दर मंद तर विद्यार्थी

समाजशास्त्र विभाग, स्वामी विवेकानंद महाविद्यालय, शिरुर (ताज), ता. अहमदपूर, जि. लातूर

वाढीचा दर अधिक असल्याचे दिसते. पण ही वाढ समाधानकारक नाही. विद्यार्थी संख्येत वाढ करावयाची असेल तर विविध स्वरूपाच्या योजना आखणे काळाची गरज आहे. असे जरी असले तरी सुद्धा शिक्षणाबाबत लोकांच्या दृष्टिकोनात बदल, झालेली जागृती, त्याचबरोबर राज्य शासनाच्या सुनियोजित प्रयत्नांमुळे विद्यार्थ्यांची पटसंख्या आणि शैक्षणिक संस्थांच्या संख्येत वाढ झालेली दिसून येते.

पदवी शिक्षण देणाऱ्या महाविद्यालयांची संख्या वाढीचा दर सन १९६०-६१ ते १९७०-७१ मध्ये १५.९२ टक्के होता तर विद्यार्थी वाढीचा दर १९.८१ टक्के होता. ही बाब राज्याच्या दृष्टिकोनातून व समाजाच्या दृष्टिकोनातून समाधानकारक मानली पाहिले. परंतु हा दर पुढे तसाच राहिलेला नाही. म्हणलेच १९७०-७१ ते १९८०-८१ मध्ये हा दर अनुक्रमे ३.५१ टक्के आणि ७.९५ टक्के दिसतो. याचे मुळ कारण म्हणजे या कालखंडात उच्च माध्यमिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थी संख्येत घट झालेली दिसते. सन १९८०-८१ ते १९९०-९१ मध्ये पुन्हा वाढ झालेली आहे. कॉलेज संख्येत ३.५१ टक्केवरुन ५.३२ टक्के वाढ झाली तर विद्यार्थी संख्येत ७.९५ वरुन ८.१८ टक्के वाढ झाली. ही वाढ मात्र विरोधाभास दर्शविते. म्हणजेच कॉलेजच्या संख्येत ज्याप्रमाणात वाढ होत आहे त्याप्रमाणे विद्यार्थी संख्येत वाढ झालेली नाही.

सन १९९०-९१ ते १९९९-२००० या कालावधीत कॉलेज व विद्यार्थी संख्येत घट झालेली आहे. ५.३२ टक्केवरुन ३.६१ टक्के होणे व विद्यार्थी संख्येचा वाढीचा दर ८.१८ टक्क्यांवरुन १.३८ टक्के झालेली ही वाढ ऋणात्मक वाढ दर्शविते. याचे कारण नवीन धोरणांचा परिणाम आहे असे म्हणण्यास वाव आहे. विद्यार्थ्यांच्या शिक्षणाकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलत चाललेला आहे. कारण शास्त्रीय शिक्षणाऐवजी व्यावसायिक शिक्षणाकडे विद्यार्थ्यांचा कल असतो. सन १९९०-९१ ते २०००-०२ पर्यंतचा काळ विचारात घेतला तर विद्यार्थ्यांचे उच्च शिक्षण घेण्याचे प्रमाण घटलेले दिसते. याचे मुळ कारण सुशिक्षित बेरोजगारी आहे असे म्हणण्यास हरकत नाही.

वरील सर्व बाबी तुलनात्मकरीत्या विचारात घेतल्या तर असे निदर्शनास येते की, माध्यमिक विद्यार्थी संख्येचा वाढीचा दर हा राज्य शासनाच्या व समाजाच्या दृष्टिकोनातून समाधानकारक मानला पाहिले. परंतु उच्च शिक्षण घेणारे विद्यार्थी संख्येत घट होत आहे. ही बाब विचारात घेणे आवश्यक वाटते. कारण उच्च शिक्षण घेणारे विद्यार्थी हे बौद्धिकरीत्या सक्षम असतात.

तक्ता क्र. १

**महाराष्ट्रात उच्च शिक्षणातील वाढीचा दर**

| | | उच्च माध्यमिक | | | उच्च शिक्षण (पदवी, पदव्युत्तर) | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| वर्ष | संस्था | वाढीचा दर | विद्यार्थी संख्या | वाढीचा दर | संस्था / कॉलेज | वाढीचा दर | विद्यार्थी संख्या | वाढीचा दर |
| १९६०-६१ | २४६८ | -- | ८५८ | -- | २११ | -- | ११० | -- |
| १९७०-७१ | ५३३९ | ११.६९ | १९३६ | १२.५६ | ५४७ | १५.९२ | ३२८ | १९.८१ |
| १९८०-८१ | ६११९ | १.४६ | ३३०९ | ७.०९ | ७३९ | ३.५१ | ५८९ | ७.९५ |
| १९९०-९१ | १००२६ | ६.३९ | ५७४३ | ७.३६ | ११३२ | ५.३२ | १०.७१ | ८.१८ |
| २०००-०१ | १५३२५ | ०.२८ | ९१११ | ०.४२ | १५९९ | ०.३८ | ९३९ | ०.१२ |
| २००१-०२ | १६११८ | ०.५१ | ९६३६ | ०.५७ | १७३५ | ०.८५ | ९४८ | ०.०९ |

**आधार :** १ महाराष्ट्राची आर्थिक पाहणी १९९१-९२, पान १३३

२. महाराष्ट्राची आर्थिक पाहणी २००१-०२, पान टी ६४

महाराष्ट्र शासनाने भारतातील स्थान महत्त्वपूर्ण आहे पण तरीदेखील आज राज्यामध्ये सुशिक्षित बेरोजगारी ही एक मुख्य समस्या बनली आहे. रोजगार संधीमध्ये वाढ होणे राज्यातील विकासात्मक नियोजनाचे उद्दिष्ट आहे. राज्याच्या नियोजन काळात रोजगार संधीमध्ये लक्षणीय वाढ झालेली आहे. परंतु आजदेखील बेरोजगारीची तीव्रता कमी झाल्याचे आपणास दिसून येत नाही. सुशिक्षित बेरोजगारी व औद्योगिक बेरोजगारीचे प्रकार आहेत. सुशिक्षित बेरोजगारी म्हणजे ज्या व्यक्तीचे एस.एस.सी.पेक्षा अधिक शिक्षण झालेले आहे आणि प्रचलित वेतनावर काम करण्याची इच्छा असून देखील त्याला काम मिळत नसेल तर अशा व्यक्तीला सुशिक्षित बेरोजगार समजावा. राज्यातील सुशिक्षित बेरोजगारीमध्ये न्यून बेरोजगारी निर्माण झालेली आहे. कारण बी.ए. किंवा एम.ए. झालेल्या व्यक्तीस त्याच्या योग्यतेची नोकरी न मिळता त्या कमी दर्जाची (सेवकांची) नोकरी नाईलाजाने पत्करावी लागते, त्याला न्यून बेरोजगारी म्हणतात. उदा. तासिका तत्त्वांवरील प्राध्यापक म्हणून काम करणे, राज्यातील सुशिक्षित बेरोजगारी का वाढत आहे? त्याची प्रमुख कारणे म्हणजे ग्रामीण भागांतून शहरी भागांमध्ये स्थलांतरीत होणाऱ्यांची संख्या अधिक आहे. राज्यामध्ये मानवी साधन सामग्रीचे चुकीचे नियोजन, औद्योगिक क्षेत्र व शिक्षण क्षेत्र यांच्यात सहकार्याचा अभाव, पुस्तकी शिक्षण, आजारी उद्योगांचे वाढते प्रमाण, आधुनिक तंत्रज्ञानाचा वाढता वापर इत्यादी सांगता येतील.

तक्ता क्र. २

**महाराष्ट्र राज्यातील उच्च शिक्षणातील सुशिक्षित बेरोजगारी**

| वर्ष | सुशिक्षित बेरोजगार | वाढीचा दर |
|---|---|---|
| १९६०-६१ | १६३ | -- |
| १९७०-७१ | ३६१ | १४.५६ |
| १९८०-८१ | १२६८ | २५.१२ |
| १९९०-९१ | २९३८ | १३.१७ |
| १९९९-२००० | ४३२२ | ४.१७ |
| २०००-०१ | ४४१९ | ०.२२ |
| २००१-०२ | ४२०४ | -०.४८ |

आधार : १.महाराष्ट्राची आर्थिक पाहणी १९९१-९२, XI पान १३

२. महाराष्ट्राची आर्थिक पाहणी, पान टी ६४

तक्ता क्र. २ मध्ये सुशिक्षित बेरोजगारीत कशा पद्धतीने वाढ होत आहे हे दर्शविलेले आहे. या तक्त्याच्या आधारे आपणाला काही निष्कर्ष काढता येतील. सन १९६०-६१ ते १९७०-७१ मध्ये सुशिक्षित बेरोजगार वाढीचा दर १४.५६ टक्के असा आहे. याचे मूळ कारण म्हणजे या काळामध्ये लोकसंख्यावाढीचा दर, अधिक विकासाचा दर दरडोई उत्पन्न कमी असल्यामुळे सुशिक्षित बेरोजगारीत वाढ झाल्याचे दिसते. सन १९६०-६१ ते २००१-०२ या कालावधीचे सूक्ष्मरीत्या निरीक्षण केले असता महाराष्ट्र राज्य सरकारने सुशिक्षित वाढीचा दर कमी करण्यासाठी प्रामाणिकपणे व सदैव प्रयत्न केल्यामुळे सुशिक्षित बेरोजगारीचा वाढीचा दर कमी ठेवण्यात यश आले आहे. उदा. सन १९९०-९१ मध्ये वाढीचा दर १३.१७ टक्क्यांवरुन १९९९-२००० मध्ये ४.१७ टक्के पर्यंत आणला. सन २०००-०१ ते २००१-०२ मध्ये सुशिक्षित बेरोजगारीचा वाढता दर -०.४८ टक्के आहे. याचा अर्थ महाराष्ट्र सरकारने सुशिक्षित बेरोजगारी कमी करण्यामध्ये यश मिळविलेले आहे. याचे श्रेय राज्य सरकारला जनतेने देणे आवश्यक आहे. कारण कोणतेही राज्य सरकार असो अर्थव्यवस्थेमध्ये पूर्ण रोजगाराची अवस्था निर्माण करू शकत नाही. परंतु बेरोजगार वाढीचा दर नियंत्रणात ठेवून त्याची तीव्रता कमी करता येते. कारण पूर्ण रोजगारीची अवस्था ही अर्थव्यवस्थेत सर्वसाधारण परिस्थितीत आढळून येत नसून विशिष्ट परिस्थितीतच दिसून येते. सामान्यपणे अर्थव्यवस्थेत अपूर्ण रोजगारीची अवस्था आढळून येते.

**महाराष्ट्र राज्यातील उद्योग आणि रोजगार संधी:**

महाराष्ट्र राज्य औद्योगिकदृष्ट्या प्रथम क्रमांकाचे राज्य समजले जाते. मुंबई शहर हे भारताच्या व्यापाराची राजधानी मानले जाते. महाराष्ट्र राज्यातील प्रमुख उद्योग पुढीलप्रमाणे आहेत. लोखंड पोलाद, विद्युत, सुतीवस्त्रे, रसायन, पेट्रोलियम, औषधी, अभियांत्रिकी, मशिन, अवजारे,

प्लॅस्टिक, इलेक्ट्रॉनिक्स मशीन, सिमेंट, साखर, कागद काच इत्यादी उद्योगांचा यात समावेश केला जातो. उदा.एकूण कारखान्यांतील ८२.१ टक्के कारखाने या पट्ट्यात आहेत. विभागनिहाय विचार करता या पट्ट्यात ७७.३ टक्के रोजगार या विभागात उपलब्ध झालेला आहे. उद्योगांच्या वाढींमध्ये मराठवाडा विभागाचे प्रमाण अतिशय नगण्य आहे. उदा. कारखान्यांची संख्या ४.३ टक्के उत्पादन १.२ टक्के आणि रोजगार ४.४ टक्के आहे. या बाबीचा विचार करता महाराष्ट्र राज्यामध्ये उद्योगांच्या व रोजगारीच्या बाबतीत प्रादेशिक असमतोलपणा निर्माण झालेला दिसतो. जर आपणास पर्यायाने राज्य सरकारला सुशिक्षित बेरोजगारीचा प्रश्न सोडवायचा असेल आणि रोजगार संधी निर्माण करावयाची असेल तर विदर्भ व मराठवाडा याकडे अधिक लक्ष केन्द्रित करणे राज्याच्या व समाजाच्या दृष्टिकोनातून फायदेशीर आहे. या विभागाकडे लक्ष देणे काळाची गरज बनली आहे.

महाराष्ट्र राज्यातील सन १९६१ ते सन २००० या कालखंडात विविध क्षेत्रांतील रोजगार वाढीचा दर दर्शविलेला आहे. (तक्ता क्र. ३) राज्यातील अर्थव्यवस्थेतील बदलांचा परिणाम रोजगार वाढीवर झालेला दिसतो. या तक्त्यावरुन असे निदर्शनास येते की काही ठराविक उद्योगांमध्ये रोजगार वाढलेला आहे. तर काही उद्योगांमध्ये रोजगारात घट झाल्याचे आपल्या निदर्शनास येईल. उदा. १९६१ ते २००० वस्त्रोद्योग (४८.५७ ते १९.४५ टक्के), खते उत्पादन (११.८७ ते १४.५ टक्के), यंत्रसामग्री (७.८१ ते १३.९४ टक्के), परिवहन सामुग्री (६.१७ ते १०.२० टक्के) राज्यातील काही उद्योगांचा रोजगार वाढीचा दर कमी दिसतो. त्यामध्ये पेट्रोलियम ४.२५ टक्के खनिज उत्पादने २.८१ टक्के कागदाचे उत्पादन ४.७४ टक्के याचा अर्थ असा की, राज्य सरकाने आपल्याकडे उपलब्ध असलेल्या उद्योगांचा पर्याप्त वापर केला तर निश्चितच रोजगार निर्मितीची संधी उपलब्ध होईल. राज्यातील पायाभूत संरचेनचा विकास ज्या प्रमाणात झाला पाहिजे त्या प्रमाणात झालेला नाही असे दिसते. राज्य सरकारला सुशिक्षित बेरोजगारी कमी करावयाची असेल तर पायाभूत संरचनेत अधिक भांडवल गुंतवणूक करुन अधिक रोजगार संधी उपलब्ध होईल.

सुशिक्षित बेरोजगारी कमी करुन रोजगार संधी उपलब्ध व्हावी यासाठी राज्य सरकारने नवीन योजना/प्रकल्प आखले आहेत. औद्योगिक प्रशिक्षण संस्थांतून प्रशिक्षण पूर्ण केलेल्या सुशिक्षित बेरोजगारांना त्यांच्या प्रकल्प खर्चांच्या १५ ते २२.५ टक्क्यांपर्यंत व जास्तीत जास्त १.५ लाख रुपये मर्यादेपर्यंत बीज भांडवल अर्थसाहाय्य देण्यात येते. या कार्यक्रमाखाली २०००-०१ या वर्षात १४९४ लाभार्थींना ६.८५ कोटी रुपयांचे साहाय्य करण्यात आले. तर त्या आधीच्या वर्षी २४२० लाभार्थ्यींना ११.०३ कोटी रुपयांचे साहाय्य देण्यात आले होते. एप्रिल ते जानेवारी २००२ या कालावधीत ८३३ लाभार्थ्यींना ३.९९ कोटी रुपये साहाय्य देण्यात आले. या योजनेमध्ये लाभार्थ्यींची संख्या विचारात घेतली तर अतिशय कमी दिसते. सुशिक्षित बेरोजगारांना या योजनेचा लाभ झालेला आहे. सुशिक्षित बेरोजगारांना रोजगार संधी उपलब्ध करुन द्यावयाची असेल तर बीज भांडवल अर्थसाहाय्य योजनेचा प्रसार होणे आवश्यक आहे.

उद्योजगता प्रशिक्षण कार्यक्रम या कार्यक्रमाचा उद्देश सुशिक्षित बेरोजगारांना स्वयं रोजगारासाठी प्रवृत्त करणे व प्रशिक्षण देणे हा आहे. या कार्यक्रमांतर्गत महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्राकडून पद्धतशीर प्रशिक्षणाद्वारे उद्योजकतेचा विकास घडवून आणण्यासाठी १ ते ३ आठवड्यांचे प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात येतात. या कार्यक्रमांतर्गत प्रशिक्षण दिलेल्या तरुणांची संख्या

२०००-०१ मध्ये ९९३७ होती तर १९९९-२००० मध्ये ती १८७३ होती. सन २००१ ते २००२ अखेरपर्यंत ६७२८ तरुणांना प्रशिक्षण देण्यात आले. या स्वयंरोजगाराचा लाभ घेणाऱ्यांची संख्या घटत आहे याचे मूळ कारण तपासणे अत्यंत गरजेचे दिसते. स्वयंरोजगारातून अनेकांना रोजगार उपलब्ध होऊ शकतो. याकरिता राज्य सरकारांनी स्वयंरोजगारीची संकल्पना सुशिक्षित बेरोजगारांना अधिक सूक्ष्मरीत्या समजावून सांगणे काळाची गरज आहे. उदा. कॉलेमध्ये या योजनेचा प्रसार करणे आवश्यक दिसते.

पंतप्रधान रोजगार योजना ही पूर्णत: केंद्र पुरस्कृत आहे. या योजनेला वित्त पुरवठा केंद्र शासनाकडन ७५ टक्के, राज्य सरकारकडून २५ टक्के दिला जातो. ही योजना जिल्हा उद्योग केंद्रांमार्फत राबविण्यात येते. या योजनेत व्यवसायासाठी एक लोख रुपयांपर्यंत आणि उद्योग किंवा सेवांसाठी दोन लाख रुपयांपर्यंत अर्थसहाय्य देण्यात येते. या योजनेखाली २०००-०१ मध्ये ३७०१५ लाभार्थ्यींना २४६.१६ कोटी रुपयांचे कर्ज मंजूर करण्यात आले. तर १९९९-२००० मध्ये ३८४७८ लाभार्थ्यींना २४४.८९ कोटी रुपयांचे कर्ज मंजूर करण्यात आले होते. सन २००१-०२ मध्ये १५६४० लाभार्थ्यींना ९१.४० कोटी रुपयांचे कर्ज मंजूर करण्यात आले. यो योजनेचा विचार केला असता राज्य सरकार भांडवलाच्या दृष्टिकोनातून सक्षम आहेत. परंतु लाभ घेणाऱ्यांचे प्रमाण कमी आहे. या योजनेचा महाराष्ट्रभर प्रचार व प्रसार होणे अत्यंत गरजेचे दिसते. कारण केन्सच्या मते, रोजगार वाढविला जाऊ शकतो म्हणून सुशिक्षित बेरोजगारी कमी करण्यासाठी राज्य सरकार प्रयत्नशीलच आहे असे आपल्याला म्हणता येईल.

**संदर्भ :**

१) माळी, एम.जी., १९७०. 'शैक्षणिक प्रश्न, पुनर्रचना आणि राष्ट्र विकास', पुणे : नीळकंठ प्रकाशन

२. कोठारी आयोग, 'शिक्षण आयोग अहवाल (१९६४-६६)', शिक्षण आणि राष्ट्रीय विकास शिक्षण मंत्रालय, भारत सरकार

३. बापट मा. गो. १९७३. 'शैक्षणिक प्रश्न आणि महाराष्ट्रातील शैक्षणिक विकास' पुणे : व्हीनस प्रकाशन, प्रथमावृत्ती

४. पाटील, लीला. १९७६. 'आजचे अध्यापन'. पुणे : श्री विद्या प्रकाशन, प्रथमावृत्ती

५. कुंडले, म.बा. १९५९. 'अध्यापनशास्त्र आणि पद्धती', पुणे : मॉडर्न बुक डेपो, पुणे, प्रथमावृत्ती

६. महाराष्ट्र राज्य सांख्यिकीय गोषवारा १९६१-६२, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन, मुंबई

७. महाराष्ट्र राज्य सांख्यिकीय गोषवारा २००१-०१, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन, मुंबई

* * *

# रॅगिंग : उच्च शिक्षणातील अमानुषता

प्रा. संदीप चौधरी

**प्रस्तावना :**

भारतीय उच्च शिक्षण व्यवस्था ही अत्यंत विस्तृत आणि जटिल स्वरुपाची आहे. पारंपारिक अभ्यासक्रमांबरोबरच अपारंपारिक अभ्यासक्रम त्याचप्रमाणे व्यावसायिक ज्ञानशाखा असा उभा-आडवा विस्तार हे या व्यवस्थेचे वैशिष्ट्य आहे. व्यावसायिक अभ्यासक्रमांमध्ये अभियांत्रिकी आणि वैद्यकीय अभ्यासक्रमांच्या ज्ञानशाखा मोठ्या प्रमाणावर विद्यार्थी प्रिय झाल्या आहेत. कौशल्यावर आधारित या ज्ञानशाखांकडे विद्यार्थ्यांचा कल अधिक दिसून येतो. सतत कार्यमग्नता हे या दोन्ही ज्ञानशाखांचे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. त्यामुळेच की काय? रॅगिंगसारखी अमानुषता ही या दोन शाखांमध्ये तुलनेने अधिक आढळून येते. उच्च शिक्षणातील अनेक समस्यांपैकी रॅगिंगसारखी अमानुषता ही या दोन शाखांमध्ये तुलनने अधिक आढळून येते. उच्च शिक्षणातील अनेक समस्यांपैकी रॅगिंग ही एक समस्या आहे. विद्यार्थ्यांचे भावविश्व बदलून टाकणारी, विद्यार्थ्यांचे जीवन उद्ध्वस्त करणारी अमानुष, अमानवीय समस्या ठरली आहे. नवोदित विद्यार्थ्यांना केवळ शारीरिकच नव्हे तर मानसिक वेदना देणारी ही एक सामाजिक समस्या आहे. देशभरात अनेक ठिकाणी रॅगिंगमुळे विद्यार्थ्यांचा बळी गेल्याची अनेक उदाहरणे आहेत. रॅगिंगचा ताण असह्य झाल्यामुळे विद्यार्थ्यांनी आत्महत्या केल्याच्या अनेक घटना घडल्या आहेत. प्रस्तुत शोध निबंधामध्ये रॅगिंग म्हणजे काय? रॅगिंगचे स्वरूप आणि रॅगिंगची अमानुषता यावर प्रकाश टाकण्यात आला आहे.

**रॅगिंग म्हणजे काय?**

उच्च शिक्षण घेत असताना विद्यार्थ्यांना रॅगिंगचा सामना करावा लागण्याची शक्यता असते. विशेषतः वैद्यकीय आणि अभियांत्रिकीसारख्या व्यावसायिक महाविद्यालयांमध्ये रॅगिंगची प्रकरणे उघडकीस आली आहेत. साधारणपणे नवोदितांना जुन्या विद्यार्थ्यांकडून होणारा त्रास अथवा छळ असे रॅगिंगचे स्वरूप असते. शारीरिक आणि मानसिक अशा दोन्ही प्रकारांनी हा छळ केला जातो. रॅगिंग या संकल्पनेचा अर्थ स्पष्ट करताना असे म्हणता येईल की, ज्यामुळे कोणत्याही शैक्षणिक संस्थेतील विद्यार्थ्यांस शारीरिक किंवा मानसिक हानी पोहोचत असेल किंवा पोहचण्याची शक्यता असेल किंवा त्याच्यात धास्तीची किंवा भीतीची अथवा लज्जेची किंवा अडचणीत आल्याची भावना निर्माण होत असेल असे गैरवर्तणुकीचे प्रदर्शन करणे किंवा असे कोणतेही कृत्य करणे असा होय.

प्रिव्हेंन्शन रॅगिंग ॲक्ट १९९९ नुसार शैक्षणिक परिसरात कुणाला चिडवणे, न पटणारे विनोद करणे, कॉमेंटस करणे व कोणतीही ओंगळवाणी कृती करण्यास भाग पाडणे म्हणजे रॅगिंग होय. होस्टेल, महाविद्यालये, खाजगी ट्यूशन्स यामध्ये असे कृत्य करण्यास कायद्याने प्रतिबंध आहे. शाळा किंवा महाविद्यालयातील नवोदित विद्यार्थी आणि वरिष्ठ विद्यार्थी यांच्यातील घातक संबंध म्हणजे रॅगिंग होय. रॅगिंगमध्ये लैंगिक शोषण, उपहासात्मक वागणूक किंवा शारीरिक मानहानीचा अंतर्भाव असतो. देशात नामांकित शिक्षण संस्थांमध्ये रॅगिंगचा इतिहास पाहायला मिळतो. प्रकर्षाने वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये रॅगिंगची अनेक प्रकरणे उघडकीस आली आहेत. रॅगिंगचे प्रारंभिक स्वरूप हे मनोरंजक आणि ओळख परिचय करुन घेणे असे होते. परंतु नंतर रॅगिंगचे स्वरूप हे अमानवीय झाले. ब्रिटिश महाविद्यालयांमध्ये आणि विद्यापीठांमध्ये रॅगिंगची सुरुवात झाल्याचे मानले जाते.

सहयोगी प्राध्यापक, समाजशास्त्र विभाग, स.भु. कला व वाणिज्य महाविद्यालय, औरंगाबाद

त्याचे लोण भारतीय महाविद्यालयांमध्ये पोहोचले.

नवोदितांच्या स्वागत करण्याच्या पद्धतीचे रूपांतर त्यांना वाईट वागणूक देणे आणि शिक्षा करण्यात झाले. गमतीच्या नावाखाली विद्यार्थ्यांना मारहाण करणे, नग्न करणे, दमदाटी करणे, कामे करवून घेणे अशा पद्धतीची कामे रॅगिंग मध्ये होतात. या गोष्टींचा नवोदित विद्यार्थ्यांवर होणारा परिणाम हा कधीही न पुसता येणारा असतो. या घटनांमुळे विद्यार्थ्यांची मानसिकता खराब होते. एखादा विद्यार्थी हा जेव्हा रॅगिंगचा बळी ठरतो तेव्हा कधी-कधी त्याच्यामध्ये बदल्याची भावना निर्माण होत असते. त्याचे प्रत्यंतर म्हणजे तो विद्यार्थी त्याच्या नवोदित विद्यार्थ्यांची रॅगिंग घेत असतो. अशा प्रकारे हा प्रघात निरंतर चालू राहतो.

ते विद्यार्थी आपल्या वरिष्ठांना शरण जातात त्यांना सोडले जाते. जे नवोदित शरण जात नाहीत त्यांना अमानवीय कृत्यांना सामोरे जावे लागते. रॅगिंगमुळे शारीरिक आणि मानसिक आघात होत असतो. अनेक विद्यार्थी हा आघात सहन करू शकत नाहीत. ते आत्महत्या करीत असतात. ते रॅगिंगचा बळी ठरत असतात.

**रॅगिंगचे भयावह स्वरूप :**

रॅगिंगमध्ये देशातील भयावह स्वरूप समजून घेण्यासाठी Coalition tc Uproot Ragging From Education (CURE) या संस्थेतर्फे रॅगिंगच्या घटनांचे अध्ययन करुन मांडण्यात आलेल्या अहवालाचा विचार करावा लागेल. भारतातील विविध राज्यांमध्ये १९९८ ते २००७ या दशकभरात १९८ घटनांची नोंद घेण्यात आली. रॅगिंगच्या या घटना अतिशय अमानुष पद्धतीने झाल्याची नोंद करण्यात आली. नोंदविलेल्या या घटनांमध्ये रॅगिंगच्या बळी ठरलेल्या १४ विद्यार्थ्यांनी आत्महत्या केल्याची धक्कादायक माहिती देण्यात आली आहे. तर १२ घटनांमध्ये गंभीर स्वरूपाचा शारीरिक आणि मानसिक छळ करण्यात आल्याचे निरीक्षण नोंदविले गेले आहे.

तक्ता क्र. १

**रॅगिंगच्या घटनांची यादी ( १९९८ ते २००७ )**

| राज्य | रॅगिंगच्या नोंदविलेल्या घटना |
|---|---|
| आंध्रप्रदेश | २३ |
| आसाम | ०१ |
| बिहार | ०२ |
| चंदीगड | ०४ |
| छत्तीसगड | ०५ |
| दमण व दीव | ०१ |
| दिल्ली | १० |
| गुजरात | ०७ |
| गोवा | ०१ |
| हरियाणा | ०८ |
| हिमाचल प्रदेश | ०८ |
| झारखंड | ०४ |
| जम्मू व काश्मीर | ०१ |
| कर्नाटक | ०७ |
| केरळ | १४ |
| महाराष्ट्र | १४ |
| मध्य प्रदेश | ०७ |
| मणिपूर | ०१ |
| ओरिसा | ०९ |
| पंजाब | १६ |
| राजस्थान | ०१ |
| तामिळनाडू | ०९ |
| त्रिपुरा | ०१ |
| उत्तर प्रदेश | २२ |
| उत्तराखंड | ०३ |
| पश्चिम बंगाल | १९ |
| **एकूण** | **१९८** |

स्त्रोत : फ्रंटलाईन, एप्रिल १०, २००९

(CURE यांनी प्रसारमाध्यमांद्वारे उजेडात आलेल्या रॅगिंगच्या घटनांचा एकत्रित केलेल्या नोंदीवरुन तयार करण्यात आलेला तक्ता)

याच नोंदींचे अध्ययन करुन लक्षात येते की आंध्रप्रदेशात सर्वाधिक रॅगिंगच्या घटनांची नोंद झाली आहे. आंध्र प्रदेशात व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या

महाविद्यालयांची संख्या अधिक असणे हे ते मागील कारण आहे. रॅगिंगच्या घटना थांबविण्यात शासनाला अपयश आले असा ठपका सर्वोच्च न्यायालयाने ठेवून सीबीआय चे माजी संचालक आर. के. राघवन यांच्या अध्यक्षतेखाली रॅगिंगला आळा घालण्यासाठी उपाय योजना सुचविणारी समिती २००७ मध्ये स्थापन केली. राघवन समितीने उपरोक्त १९८ घटनांचे अध्ययन करुन तसेच देशभर दौरा करुन विविध क्षेत्रांतील नागरिकांशी चर्चा करुन अहवाल सादर केला. राघवन समितीने रॅगिंगच्या समस्येच्या विविध पैलूंवर प्रकाश टाकला. समितीने महत्त्वपूर्ण निरीक्षणे नोंदविली आहेत. विशेषत: रॅगिंगच्या गंभीर प्रकरणांमध्ये देखील आरोपींविरुद्ध कोणत्याही प्रकारे पोलिसांत तक्रार दाखल करण्यात टाळाटाळ केली जाते. असे निरीक्षण नोंदविले आहे. संस्था अधिकाऱ्यांची ही प्रवृत्ती पाहून समितीने आश्चर्य व्यक्त केले आहे. रॅगिंगसाठी त्यामुळेच संस्थेच्या अधिकाऱ्यांना सजग राहण्याचे सुचविले आहे. तसेच पोलिसांत तक्रार नोंदविण्यासाठी टाळाटाळ केल्यास अशा अधिकाऱ्यांना रॅगिंगसाठी जबाबदार धरण्याची शिफारस समितीने केली होती. सर्वोच्च न्यायालयाने राघवन समितीच्या अनेक शिफारशी मान्य करुन रॅगिंगच्या समस्येवर नियंत्रण आणण्यासाठी पुढाकार घेतला. रॅगिंगच्या घटनांकडे दुर्लक्ष करण्याच्या शैक्षणिक संस्थांचे अनुदान राज्याने अथवा केंद्राने बंद करुन टाकावे अशी शिफारसही त्यामध्ये करण्यात आली आहे.

मे २००७ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने सर्व शैक्षिणिक संस्थांना रॅगिंग रोखण्यासाठी आदेश दिले आहेत. रॅगिंगविरोधी कायद्याचे काटेकोर पालन करण्याचे, संस्थेच्या माहितीपत्रकात या कायद्याची माहिती प्रसिद्ध करणे, नोटीस बोर्डवर रॅगिंगविरोधी महिती देणे. विद्यार्थ्यांकडून आणि पालकांकडून रॅगिंग होणार नसल्याची हमीपत्र भरुन घेण्याची सक्ती या आदेशान्वये करण्यात आली आहे.

**विद्यापीठ अनुदान आयोगाचे प्रयत्न :**

रॅगिंगच्या समस्येवर मात करण्यासाठी विद्यापीठ अनुदान आयोगाने देखील मोठ्या प्रमाणावर उपाय योजना केल्या आहेत. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशांनुसार रॅगिंगवर नियंत्रण मिळविण्यासाठी नियमावली तयार करुन या नियमांच्या कठोर अंमलबजावणीची अपेक्षा व्यक्त केली आहे. विद्यार्थी आणि पालकांकडून हमीपत्र भरुन घेणे, रॅगिंगविरोधी कायद्याची माहिती दर्शनी भागात लावणे, संस्थाचालकांना रॅगिंगविरोधी कायद्यांच्या अंमलबजावणीसाठी प्रोत्साहित करणे, त्याचबरोबर विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र रॅगिंगविरोधी 'हेल्पलाईन' सुरू करण्यात आली आहे. या सोबतच National Antiragging Helpline देखील देखील कार्यरत आहे. या हेल्पलाईनवर रॅगिंगच्या घटनसंदर्भात मोठ्या प्रमाणावर नोंदी होत आहेत.

तक्ता क्र. २

**नॅशनल अॅन्टी रॅगिंग हेल्पलाईनवर स्वीकृत कॉल**

| राज्य | कॉलची संख्या | राज्य | कॉलची संख्या |
|---|---|---|---|
| आंध्र प्रदेश | ०७ | मध्य प्रदेश | १३ |
| बिहार | १० | महाराष्ट्र | १६ |
| दिल्ली | ०४ | ओरिसा | १८ |
| गुजरात | ०२ | पंजाब | १४ |
| हरियाणा | ०१ | राजस्थान | ०८ |
| हिमाचल प्रदेश | ०१ | तामिळनाडू | १० |
| जम्मू व काश्मीर | ०२ | उत्तर प्रदेश | ६५ |
| कर्नाटक | १० | पश्चिम बंगाल | ३२ |
| केरळ | ०५ | | |

स्रोत : Times of India, Pune (6th December 2010)

नॅशनल अॅन्टी रॅगिंग हेल्पलाईनवर मोठ्या प्रमाणावर रॅगिंगच्या घटनांची नोंद होत असते. बळी ठरलेल्या विद्यार्थ्यांना या हेल्पलाईनद्वारे मदत उपलब्ध करुन देण्यात येते. देशभरात 'अमन मुव्हमेंट' ही रॅगिंगविरोधी काम करणारी अशासकीय संघटना आहे. या संघटनेतर्फे हेल्प लाईन चालविली जाते. अमन कचरू हा १९ वर्षी युवक रॅगिंगचा बळी ठरला होता. हिमाचल प्रदेशातील तांडा येथील राजेंद्र प्रसाद वैद्यकीय महविद्यालयात प्रवेश घेतलेल्या अमन याची त्याच्या

वरिष्ठ विद्यार्थ्यांनी रॅगिंग घेतली. या रॅगिंगचा बळी ठरत अमन मृत्यू पावला. रॅगिंगची ही क्रूरता देशभरात रॅगिंगचे भयावह स्वरूप स्पष्ट करणारी ठरली. २००९ मधील या घटनेतील मृत्यूचा तपास करणाऱ्या उच्च स्तरीय समितीने अमनच्या मृत्यूस रॅगिंग कशी कारणीभूत ठरली याचे विश्लेषण केले आहे. तसेच शैक्षणिक परिसरात दारू आणि इतर नशांमुळे हिंसेचे प्रमाण वाढले आहे. अमनच्या स्मृती प्रीत्यर्थ 'अमर चळवळ' ही रॅगिंग विरोधी चळवळ सुरू करण्यात आली. सर्वोच्च न्यायालयाने देखील या घटनेची गंभीर देखल घेत रॅगिंगविरोधी कायद्यांच्या कठोर अंमलबजावणीचे आदेश दिले होते. तसेच राघवन समितीची स्थापना केली होती. याचा उल्लेख वर आलेलाच आहे.

रॅगिंगचे हे भयावह स्वरूप निकोप शैक्षणिक वातावरण तर दूषित करतेच. शिवाय विद्यार्थ्यांच्या मानवी हक्कांचे उल्लंघन करीत असते.अनेक नवोदितांच्या भवितव्याशी खेळ करीत असते. अनेकांना आपल्या करियरच्या वाटा बदलाव्या लागतात. अनेकांना शिक्षण थांबवावेसे वाटते. काहींना आयुष्यभर रॅगिंगच्या मानहानीची जखम त्रस्त करीत असते. मानसिक आघात अनेकांचे आयुष्य उद्ध्वस्त करीत असतो. रॅगिंगविरोधी अनेक उपाय योजना करण्यात येत असल्या तरी अनेक ठिकाणी रॅगिंगच्या घटना घडताना दिसतात. हेल्पलाईनवर नोंद होणाऱ्या घटना हे याचे उदाहरण होय. व्यावसायिक महाविद्यालयांत विशेषत: वैद्यकीय महाविद्यालये आणि वसतिगृहे ही रॅगिंग होण्याची स्थळे आहेत. अशा शैक्षणिक संस्थांनी रॅगिंगविरोधी वातावरण निर्मिती करण्याची विशेष आवश्यकता आहे. संस्था अधिकाऱ्यांचे थोडेही दुर्लक्ष रॅगिंगला प्रोत्साहन देणारे ठरू शकते. रॅगिंगच्या घटना लपवून ठेवण्यात नव्हे तर त्या उघड करण्यात शैक्षणिक संस्थांनी जबाबदारी उचलली पाहिजे. हीच अपेक्षा सर्वोच्च न्यायालयाने देखील व्यक्त केली आहे.

**समारोप :**

रॅगिंग ही उच्च शिक्षणातील एक क्रूर समस्या आहे. कनिष्ठ विद्यार्थ्यांच्या मनात दहशत निर्माण करणारी सामाजिक घटना आहे. रॅगिंगमुळे विद्यार्थ्यांच्या मानवी हक्कांचे उल्लंघन होत असते. वरिष्ठ विद्यार्थ्यांकडून कनिष्ठ विद्यार्थ्यांचा शारीरिक आणि मानसिक छळ करण्याची ही अमानुष घटना आहे. या छळाचा नवोदितांवर अनेकदा गंभीर परिणाम होत असतो. त्यातूनच रॅगिंग मध्ये छळल्या गेलेल्या विद्यार्थ्यांना मानसिक आघात सहन करावा लागतो. ज्यांची हा आघात सहन करण्याची मानसिकता नसते, ते विद्यार्थी आत्महत्या करीत असतात. रॅगिंगची अमानुषता ही एखाद्याचे आयुष्य संपवीत असते. रॅगिंगच्या समस्येचे निराकरण करण्यासाठी कायद्याच्या कठोर अंमलबजावणीची आवश्यकता आहे. उच्च शिक्षणातील रॅगिंगची कीड संपविण्यासाठी सजग विद्यार्थी निर्माण करण्याची आवश्यकता आहे. शैक्षणिक परिसर रॅगिंगमुक्त असणे हीच खरी विद्यार्थ्यांच्या विकासाची आणि निकोप भवितव्याची नांदी ठरेल. पुन्हा कोणी अमन रॅगिंगचा बळी ठरणार नाही याची खबरदारी संबंधितांना घ्यावी लागेल. त्याचप्रमाणे एक सुसंस्कृत आणि निर्भय पिढी घडविण्यासाठी प्रयत्न करावे लागतील.

**संदर्भ :**


१. सुर्वे, जी.पी. आणि वंदन जी. सुर्वे (२००९), रॅगिंग, मैत्रिच्या पलीकडे, पुणे: विद्यार्थी साहाय्यक समिती

२. प्रसाद हिमाद्री आणि धर्मेंद्र प्रसाद (२००९), रॅगिंग : एनकाऊंटरिंग दी थ्रेट इन हायर एज्युकेशन इन्स्टिटयूशन, युनिव्हर्सिटी न्यूज (४७(१८) मे ०३-०९, २००९)

३. वेंकटेशन व्ही. (२००९) कॅम्पस क्रुएल्टी, फ्रंटलाईन (एप्रिल १०, २००९)

४. जॉन शोभा (२०१०), रॅगिंग हॉरर्स डोन्ट एण्ड वुईथ इंडिया, टाइम्स ऑफ इंडिया, पुणे (डिसेंबर ६, २०१०)

५. www.ugc.ac.in

६. www.amanmovement.org


* * *

# भारतातील शिक्षणाचे खासगीकरण आणि दारिद्र्य

**प्रा. शेषराव क. राठोड**

**प्रस्तावना :**

मनुष्यबळ जडणघडणीत आणि देशाच्या सामाजिक व आर्थिक प्रगतीत शिक्षणाचा वाटा महत्त्वाचा असतो.कारण कोणत्याही देशाचा विकास हा त्या देशातील सुशिक्षित आणि सुजाण मनुष्यबळावर अवलंबून असतो. मानवसंपत्ती जेवढी प्रगत तेवढी त्या देशाच्या विकासाची गती अधिक व टिकाऊ असते. उद्योग, शेती, व्यापार, पतपुरवठा आणि अन्य संस्थात्मक सोयी-सुविधांच्या उभारणीवर भरमसाट खर्च केला परंतु त्याच्या वापरासाठी लागणारे कुशल मनुष्यबळ उपलब्ध नसेल तर त्यातून होणारा फायदा अल्प असेल. म्हणून देशातील कामगार वर्गाला उच्च कौशल्याचे शिक्षण देणे गरजेचे आहे. सन १९९० मध्ये जॅमरीन (थायलंड) येथील पहिल्या शिक्षण परिषदेत जागतिक बँकेने सर्वांसाठी शैक्षणिक धोरण जाहीर करताना उच्च शिक्षणावरील सबसिडी कमी करण्याचे धोरण भारतासह सर्वच विकसनशील देशांच्या गळी उतरवले. तेव्हापासून भारत सरकारने उच्च शिक्षण क्षेत्रातील आपली जबाबदारी कमी करण्यास सुरुवात केल्याचे दिसते. परिणामी १९९७ पासून देशातील अनुदानित शाळा व महाविद्यालयांच्या संख्येतील वाढ थांबली असून खासगी विनाअनुदानित शाळा व महाविद्यालयांच्या संख्येत लक्षणीय वाढ होत आहे.

**उच्च शिक्षणाचे स्वरुप :**

देशात उच्च शिक्षण देणारी ७५७ विद्यापीठे ३८०५९ संलग्न महाविद्यालये व ११९२२ स्वतंत्र संस्था आहेत. या एकूण महाविद्यालयांपैकी ७६% महाविद्यालये खासगी व्यवस्थापनाद्वारे चालविली जातात. त्यापैकी ६१% महाविद्यालये खासगी विनाअनुदानित तर १५% खासगी महाविद्यालयांना शासकीय अनुदान मिळते. शैक्षणिक वर्ष २०१४-१५ मध्ये १८-२३ वयोगटातील केवळ २३.६% विद्यार्थी शिक्षण घेत होते. त्यात २४.५% मुले व २२.७% मुलींचा समावेश होतो. अनुसूचित जातीमध्ये १९.३ मुले व १४.६% मुली तर अनुसूचित जमातीच्या १७.६% मुले व १२.०% मुलीचा समावेश होतो.

सन २००९ च्या शिक्षण हक्क कायद्यानुसार (०-१४) वयोगटासाठी शासन मोफत व सक्तीचे प्राथमिक शिक्षण हे धोरण राबवत आहे. या कायद्याप्रमाणे मूलभूत प्राथमिक शिक्षण देणे ही सर्वस्वी सरकारची जबाबदारी आहे. त्यामुळे सरकार उच्च शिक्षणावरचा खर्च कमी करुन सारे लक्ष प्राथमिक शिक्षणावर केंद्रित करत आहे. ज्या प्रमाणात शालेय शिक्षणावरचा खर्च वाढत जाणार त्या प्रमाणात उच्च शिक्षणावरचा खर्च सरकार कमी करणार. त्यामुळे ते महान होत जाणार परिणामी दारिद्र्य रेषेखालील जीवन जगणाऱ्या एकूण २१.९% लोकसंख्येपैकी ग्रामीण भागातील २५% पेक्षा जास्त व शहरी भागातील १३% पेक्षा जास्त पाल्यांना उच्च शिक्षणास मुकावे लागेल. म्हणजेच एका बाजूला प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणामुळे उच्च शिक्षणाच्या दारावर विद्यार्थ्यांचा रेटा वाढत असताना दुसऱ्या बाजूला उच्च शिक्षणातील गरिबांसाठीच्या संधी कमी-कमी होत जाणार, तिथल्या वाटा अरुंद आणि कठीण होत जाणार.

उच्च शिक्षणाच्या खासगीकरणामुळे सर्व प्रकारच्या किफायतशीर व्यवसाय शिक्षण, मोठ्या उद्योगांना गरजेचे असलेले संशोधन, वित्तसंस्था, व्यापार व उद्योगांचे व्यवस्थापन, जाहिरातीचे जग, डिझायनिंग, फिल्ममेकिंग इत्यादी क्षेत्रांतील उच्च शिक्षण घेण्यासाठी आज भरमसाट पैसे मोजावे लागतात. नवीन शैक्षणिक धोरण भांडवलदार आणि व्यापारी वर्गाला फायद्याचे ठरणारे असले तरी

विनायकराव पाटील महाविद्यालय, वैजापूर

त्यामुळे उच्च शिक्षण प्रचंड महाग झाले आहे. समाजाच्या वरच्या स्तरातील विद्यार्थ्यांची प्रतिष्ठेच्या शिक्षणावर मिरासदारी तयार होणार असल्याने बहुतांश निम्न स्तरातील विद्यार्थी त्यापासून वंचित राहतील.

आज देशात शैक्षणिक क्षेत्रात अति गरीब समाजासाठी असलेली शिक्षण व्यवस्था आणि श्रीमंतांसाठीची शिक्षण व्यवस्था अशी स्पष्ट दोन चित्रे पाहावयास मिळतात. यावरुन असे दिसते की, तुमच्याकडे असलेला पैसा ही एकच गोष्ट तुम्ही कोणते शिक्षण घेणार आणि तुम्हाला कोणती संधी पकडता येणार हे ठरवते.

दारिद्र्य हा देशाच्या विकासातील प्रमुख अडथळा आहे. दारिद्रय दूर करण्यासाठी सरकारने अनेक योजनांवर भरमसाट निधी खर्च केला परंतु अपेक्षित आर्थिक वृध्दीदर गाठण्यात आणि दारिद्रयाचे समूळ उच्चाटन करण्यात अपयश येत आहे. स्वातंत्र्य मिळून जवळपास सात दशके पूर्ण होत असताना अपेक्षित आर्थिक वृध्दीदर गाठण्यात आणि दारिद्र्य निर्मूलन करण्यात आपल्या देशाला अपयश आले आहे. नियोजन आयोगाच्या २०११–१२ च्या आकडेवारीनुसार आजही देशात २१.९% लोकसंख्या दारिद्र्यरेषेखालील जीवन जगते आहे. यातून अनेक प्रश्न निर्माण होतात उदा. १) लोक दरिद्री का आहेत? २) दारिद्र्य रेषेच्या वर कसे येतील? ३) दारिद्र्याचे प्रमुख कारण कोणते? ४) गरीब श्रीमंतांतील उत्पन्नदरी का निर्माण झाली ? ५) वैयक्तिक उत्पादन क्षमतेमुळे लोक दारिद्री आहेत ? का अन्य घटकांमुळे इत्यादी.

प्रस्तुत निबंधामध्ये भांडवल व उष्मांकाचा आधार घेऊन दारिद्र्याचे विश्लेषण करणाऱ्या पांरपरिक दृष्टिकोनाऐवजी उच्च शिक्षण आणि दारिद्र्य यांच्या संबंधांचा आढावा घेण्यात आला आहे. उच्च शिक्षणातून अनेक उत्पादन कौशल्य आत्मसात करता येतात. जी व्यक्तीला दर्जा उंचवण्यास प्रत्यक्ष मदत करते. परंतु उच्च शिक्षणाच्या खासगीकरणामुळे गरीब लोकांना आज भरमसाट पैसा मोजून शिक्षण घेणे कठीण झाले आहे. दरिद्री लोकांच्या पाल्यांना उच्च शिक्षणाअभावी उत्तम दर्जाच्या संधींपासून वंचित रहावे लागत आहे. म्हणून त्यांना कमी पगाराची नोकरी वा रोजगाराचा आधार घ्यावा लागतो. परिणामी त्यांचे वार्षिक उत्पन्न कमी राहते. त्यांना जीवनावश्यक गरजा पुर्ण करण्यासाठी अनेक अडथळ्यांचा सामना करावा लागतो. म्हणून या गरीब लोकांना जर मोफत गुणवत्तापूर्ण उच्च शिक्षण उपलब्ध करून दिले तर गरीब घरांतील हुशार व होतकरू मुलांना त्यांचा उपयोग आपला आर्थिक स्तर उंचावण्यासाठी होईल. परिणामी दरिद्री लोकांचा आर्थिक दर्जा उंचावेल व देशाच्या विकासाला चालना मिळेल.

प्रस्तुत शोधनिबंधाचा प्रमुख उद्देश भारतातील उच्च शिक्षण क्षेत्र आणि दारिद्र्याचे आकलन करुन घेणे व उपाय सुचविणे हा आहे. यासाठी दुय्यम तथ्य सामुग्रीचा आधार घेतला असून तथ्याचे संख्यात्मक तसेच गुणात्मक विश्लेषण करण्यावर भर देण्यात आला आहे.

**भारतातील दारिद्र्य :**

पहिल्या पंचवार्षिक योजनेपासून दारिद्र्य निर्मूलन हे देशाच्या विकासात्मक धोरणाचे प्रमुख उद्दिष्ट आहे. तरीही २०११–१२ च्या आकडेवारीनुसार एकूण लोकसंख्येच्या २१.९% लोक दारिद्र्य रेषेखालील जीवन जगत आहेत. त्यापैकी ग्रामीण भागातील २५.७% लोकसंख्या तर शहरी भागातील १३.७% लोक दरिद्री आहेत.

दारिद्र्य निर्मूलनाच्या संदर्भातील मतप्रवाहाचा विचार केला असता त्यामध्ये वेगवेगळे मत प्रवाह दिसून येतात. काही विचारवंतांच्या मते देशातील दारिद्र्याचे उच्चाटन करण्यासाठी गरीब लोकांना प्रत्यक्ष मदत करणे गरजेचे आहे. उदा. अन्नधान्य पुरवठा, रोजगार, आरोग्य सोयी व प्रत्यक्ष आर्थिक मदत तर दुसरीकडे काही विचारवंतांच्या मते दारिद्र्य निर्मूलनासाठी मोफत शिक्षण उपलब्ध करुन देणे गरजेचे आहे.

मानवी भांडवलवादी दृष्टिकोन समर्थकांच्या मते शिक्षण हे दारिद्र्य निर्मूलन करण्याचे महत्त्वाचे साधन आहे. कोणत्याही समाजाने शिक्षणात केलेली गुंतवणूक ही तेथील मनुष्यबळ घडविण्याच्या दृष्टीने अतिशय

उपयुक्त ठरते. शैक्षणिक विकासामुळे ज्ञान व कौशल्य विकास, आर्थिक विकास, मानवी विकास, आयुर्मानात वाढ , जन्मदर व मृत्युदरात , दारिद्र्यात घट इत्यादी प्रक्रियेला चालना मिळते. उच्च व गुणवत्तापूर्ण शिक्षणामुळे वैयक्तिक मिळकतीत वाढ होते. परिणामी व्यक्ती, कुटुंब व देशाच्या विकासाला चालना मिळते. या उलट व्यक्ती जर निरक्षर व अल्पशिक्षित असेल तर त्याला दारिद्र्यात जीवन जगावे लागते. कारण निरक्षरता व दारिद्र्याचा जवळचा संबंध आहे.

१) दारिद्र्य ही केवळ निम्न उत्पन्नाशी संबंधित समस्या नसून ती व्यापक बहुआयामी संकल्पना आहे. यात पर्याप्त संधीच्या अभावी शिक्षण आणि मानवी भांडवलाच्या विकासात अनेक अडचणीचा सामना करावा लागतो. "Poverty is not only a problem of low incomes,rather it is a multi dimensional problem that includes low access to opportunities for developing human capital and to education."

२) मानवी दारिद्र्य ही आर्थिक (उत्पन्न) दारिद्र्यापेक्षा व्यापक संकल्पना असून यात व्यक्तीला सर्वसोयींनी युक्त जीवन जगण्यासाठी हव्या असणाऱ्या संधी व पर्यायी साधनांचा तुटवडा असतो. Human Poverty is more than income poverty , it is a denial of choices and opportunities for living to lerable life.

**शैक्षणिक दारिद्र्य आणि आर्थिक दारिद्र्यः**

शैक्षणिक दारिद्र्य आणि आर्थिक दारिद्र्याचा जवळचा संबंध आहे कारण शैक्षणिक दारिद्र्य हा आर्थिक दारिद्र्य निश्चित करणाऱ्या घटकांपैकी एक महत्त्वाचा घटक आहे. आर्थिकदृष्टया मागास असणाऱ्या घरातील मुलांना खासगी महागडे शिक्षण घेण्यापासून वंचित राहावे लागते.

शैक्षणिक दारिद्र्य व आर्थिक दारिद्र्य एकमेकाला प्रभावीत करतात. आर्थिक दारिद्र्यामुळे गरीब पालक आपल्या पाल्याच्या शिक्षणावर पर्याप्त खर्च करू शकत नाहीत. शिक्षणावरील अल्प किंवा नगण्य गुंतवणुकीमुळे त्यांच्या मुलांना उच्च दर्जाचे महागडे खासगी शिक्षण घेता येणार नाही. परिणामी कमी मागणी असणारे व पारंपरिक शिक्षण घ्यावे लागेल. त्यामुळे ते कमी पगाराच्या नोकरी व रोजगारास पात्र असतील. त्यातून मिळणारे उत्पन्न कमी असेल त्यामुळे त्यांना दरिद्री व निकृष्ट प्रतीचे जीवन जगावे लागेल.

थोडक्यात शैक्षणिक दारिद्र्यामुळे आर्थिक दारिद्र्य व आर्थिक दारिद्र्यामुळे शैक्षणिक दारिद्र्य हे चक्र सुरु आहे. या दुष्टचक्राला भेदण्यासाठीचे प्रमुख साधन म्हणजे मोफत उच्च शिक्षण होय. सर्वांना समान व मोफत उच्च शिक्षण दिल्याशिवाय गरीब लोकांचा आर्थिक विकास होणार नाही. गरीब पालक आपल्या मुलांना शाळेत पाठवत नाहीत याचे कारण त्यांना शिक्षणाचे महत्त्व वाटत नाही असा वरच्या वर्गात गैरसमज आहे. पण मुळातच या लोकांची मुलांच्या शिक्षणावर खर्च करण्याची ऐपत नसते. १४ ऑगस्ट १९२४ च्या यंग इंडिया अंकामध्ये महात्मा गांधीजीनी लिहिले आहे की, भारतात जी निरक्षरता आहे त्याचे कारण पालक मुलांना शाळेत पाठवायला राजी नसतात हे नाही, तर सोयी-सुविधांची कमतरता, शिक्षण पध्दतीतील कमतरता शिक्षणाचा प्रत्यक्ष जीवनाशी संबंध नसणे ही त्यामागील कारणे आहेत. तेव्हा आपल्या मुलांच्या शिक्षणाची पालकांना काळजी वाटत नाही अस मानणे तर्काला धरुन नाही .

देशातील एकूण लोकसंख्येच्या २१.९% लोक दारिद्र्य रेषेखालीलजीवन जगत आहेत. राज्यनिहाय विचार केला असता छत्तीसगडमध्ये सर्वाधिक म्हणजेच ३९.९३% लोकसंख्या दरिद्री असून त्यानंतर अनुक्रमे दादरा आणि नगर हवेली, झारखंड, मणिपूर आणि बिहार या राज्यांचा क्रमांक लागतो. तसेच देशातील १८-२३ वयोगटातील शिक्षण घेणाऱ्या लोकसंख्येचा विचार केला असता असे दिसते की या वयोगटातील एकूण लोकसंख्येच्या केवळ २०.८ % लोकसंख्याच उच्च शिक्षण घेत आहे. उच्च शिक्षणाच्या प्रमाणाचा राज्यनिहाय विचार केला असता देशातील एकूण घटक राज्यांपैकी जवळपास १८ घटकराज्यांत सरासरीपेक्षा कमी प्रमाण दिसून येते. तामिळनाडू हे प्रथम क्रमांकाचे राज्य असून येथे १८-२३ या वयोगटातील एकूण ४०% लोकसंख्या उच्च

शिक्षण घेत आहे. तर झारखंडमध्ये सर्वात कमी म्हणजेच ९.९% लोकसंख्या शिक्षण घेताना दिसते.

**शिक्षण आणि मिळकतीचा आंतरसंबंध :**

शिक्षण हे उत्पादनाचे प्रभावी माध्यम (साधन) आहे. जे आपल्या इच्छा, आकांक्षा व गरजा पूर्ण करण्याठी मदत करते. हा विचार आज जगमान्य झालेले दिसत आहे. शिक्षणामुळे ज्ञान व कौशल्य इतरांना शिकविणे आणि एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे हस्तांतरित करणे शक्य होते. शैक्षणिक पातळी उंचावल्यास त्याचा परिणाम ज्ञान, कौशल्य, रोजगार, व्यक्तीची उत्पादकता आणि मिळकतीवर होतो. गरीब लोकांचे उत्पादन वाढल्यास कुपोषण, निकृष्ट आरोग्य, माता व अर्भक मृत्यु इ. समस्यांमधून सुटका होईल. म्हणून जोपर्यंत गरीब जनतेला शिक्षित केले जाणार नाही तो पर्यंत त्यांचा आर्थिक विकास होणार नाही. कारण उच्च शिक्षण आणि दारिद्र्य या दोहोत व्यस्त संबंध आहे.

**दारिद्र्य निर्मूलनावर शिक्षणाचा परीणाम :**

शिक्षणाचा व्यक्तीला प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष फायदा होत असल्याचे स्पष्ट होते. प्रत्यक्ष फायदा म्हणजे शिक्षणामुळे व्यक्तीला नवनवीन कौशल्य आत्मसात करता येते, व्यक्तीच्या अंगी असणाऱ्या सुप्त गुणांचा विकास होतो आणि व्यक्तीची कार्यक्षमता वाढते. तर अप्रत्यक्षरीत्या व्यक्ती आरोग्य, रोजगार व कार्यक्षमतेबद्दल जागरुक होते. त्यांची उत्पादकता वाढते, आर्थिक स्थिती उंचावते परिणामी त्याची दारिद्र्यातून सुटका होऊ शकते. म्हणून प्रत्येकाला उच्च शिक्षण मोफत देणे गरजेचे आहे.

**निष्कर्ष :**

उच्च शिक्षण आणि दारिद्र्याच्या विश्लेषणावरुन असे दिसून येते की,

१) शैक्षणिक दारिद्र्य व आर्थिक दारिद्र्य परस्परांना प्रभावित करतात.

२) गुणवत्तापुर्ण उच्च शिक्षण व दारिद्र्याचा संबंध ऋणात्मक दिसून येतो.

३) उच्च शिक्षणामुळे व्यक्तिची मिळकत क्षमता उंचावते.

४) मोफत व गुणवत्तापूर्ण उच्च शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण केल्यास दारिद्र्यात जीवन जगणाऱ्या लोकांना त्याचा फायदा आपला आर्थिक स्तर उंचावण्यासाठी होईल.

५) शिक्षणामुळे केवळ आर्थिक फायदा होतो असे नाही तर अप्रत्यक्षरीत्या आरोग्य, कार्यक्षमता, गतिशीलता इत्यादी घटक प्रभावित होतात.

नव्या शतकाच्या समाजरचनेचा आणि अर्थव्यवस्थेचा खरा आधार ज्ञान हाच आहे. ज्ञानाधिष्ठित समाज रचना व ज्ञानाधिष्ठित अर्थव्यवस्था हेच भविष्यकाळात टिकून राहण्याचे मार्ग आहेत. भारतीय समाज हा ज्ञानाधिष्ठित समाज व्हावा यासाठी समाजातील प्रत्येकाला ज्ञान मिळवण्याची संधी प्राप्त झाली पाहिजे. शिक्षणाचा सार्वत्रिक प्रसार आणि शिक्षणाच्या न्याय व पुरेशा संधी उपलब्ध करुन दिल्याशिवाय दारिद्र्याचा प्रश्न सुटणार नाही.

**संदर्भ :**


१) All India Survey On Higher Education : An overview 2014-15 (Provisional) P.3

२) सुधीर पानसे, जागतिकीकरण आणि शिक्षण क्षेत्र - लोकवाङ्मय गृह, मुंबई, तिसरी आवृत्ती जानेवारी २०११.

३) Press Note On Poverty Planning Commission Govt. of India, July 2013, P.3.

४) World Bank Poverty Reduction in South Asia, Washington, Dec. 1994

५) UNDP Human Development Report New York Oxford University Press 1997 :2

६) Tilak JBG Post - Elementary Education Poverty and Development In India, PBET Working Paper Series, 06 Nov. 2005.

७) Prevez zam urrad Janju and Usman Ahmed Kamal The Role of Education and Income in Poverty Alleviation A Cross- country Analysis the Lahore Journal of Economics (Summer2011) P.143-172

८) अरविंद वैद्य, नवे आर्थिक धोरण आणि भारतातील शिक्षण क्षेत्र, पर्याय प्रकाशन, मुंबई २०१२.


* * *

# ग्रामीण महाराष्ट्रातील स्त्री शिक्षणाची समस्या

**डॉ. मिसाळ हनुमंत दामोदर**

**प्रस्तावना :**

सर्व धर्मात स्त्रियांचे स्थान दुय्यम समजले गेले आहे. ग्रामीण भागात तर स्त्रियांच्या समस्या अधिकच गंभीर स्वरूपाच्या आहेत. शेतमजूर, बलुतेदार, छोटे-मोठे शेतकरी, जमीनदार यांच्या प्रत्येकाच्या कुटुंबात स्त्रियांच्या समस्या गंभीर स्वरूपाच्या आहेत. स्त्रियांच्या सामाजिक दर्जालाच थेट सर्व धर्मांनी आव्हान दिल्याने अगदी प्रारंभिक काळापासून स्त्रियांना मानसिक गुलामगिरीच्या अवस्थेत जीवन जगावे लागते आहे. यामध्ये ग्रामीण स्त्रियांची स्थिती आणखीनच वाईट आहे. महाराष्ट्र राज्य पुरोगामी राज्य म्हणून ओळखले जात असले तरी ग्रामीण महाराष्ट्रातील स्त्रियांना मिळणारा सन्मान व दर्जा निश्चित गौरवशाली नाही. इथे स्त्रियांच्या प्रश्नांची सुरूवातच तिच्या जन्मापासून होते. आज महाराष्ट्रात पुरुषांच्या जन्माचे स्वागत पेढे वाटून तर स्त्रीच्या जन्माला एक गंभीर प्रश्न मानला जातो. जन्मत:च पालकांची मानसिकता अशी दुजाभावाची असल्याने मुलगा-मुलगी यांचा सांभाळसुद्धा पक्षपातीपणाने केला जातो. शिक्षण, आरोग्य आणि बालपण या सर्व पातळीवर ग्रामीण महाराष्ट्रात स्त्रीस दुय्यम समजले जाते. विवाहाअगोदरची जी परिस्थिती तीच किंबहुना त्यापेक्षा अधिक गंभीर परिस्थिती विवाहानंतर महाराष्ट्रातील ग्रामीण स्त्रियांच्या वाट्याला येते. या संशोधन लेखात महाराष्ट्रातील ग्रामीण स्त्रियांच्या मुळ शैक्षणिक समस्या संदर्भात शोध घेण्याचा प्रयत्न केला आहे. स्त्रियांच्या या सर्व समस्यांच्या मागे शिक्षणाचा अभाव हे अनेक अभ्यासातून स्पष्ट झाले आहे. म्हणूनच महात्मा फुले यांनी मती, गती, नीती द्रव्य नसणे यामागे केवळ अविद्या हेच कारण सांगितले आहे. परिणामी शैक्षणिक समस्याही स्त्रियांच्या एकूण विकास आणि व्यक्तिमत्त्वाची जडणघडण यासाठी अधिक गतिरोध निर्माण करत आहे. म्हणूनच महाराष्ट्रातील ग्रामीण स्त्रियांच्या शैक्षणिक समस्यांमागील वस्तुस्थिती व उपाययोजना यावर हा संशोधन लेख आधारित आहे.

**संशोधन पद्धती:**

सदर संशोधन पेपर हा मुख्यत: दुय्यम व प्राथमिक तथ्यांवर आधारित असून विषयासंबंधीत माहिती विविध शासकीय कार्यालये, शासकीय अहवाल, वर्तमानपत्रे, महाराष्ट्र समालोचन संदर्भातील आकडेवारी, विविध संबंधित पुस्तके, जर्नल्स इत्यादींच्या माध्यमातून योग्य ती माहिती संकलित करण्यात आली आहे. शिवाय प्रातिनिधिक स्वरूपात महाराष्ट्रातील विविध ग्रामीण महाविद्यालयांतील पालक, प्राचार्य, महिला शिक्षक, विद्यार्थिनी यांच्याशी प्रत्यक्ष-अप्रत्यक्षणे ग्रामीण महाराष्ट्रातील स्त्रियांच्या विविध शिक्षण समस्यांबाबत असंरचित परंतु विषय हेतू साध्य होईल अशा संदर्भाने गट चर्चा व प्रश्न विचारून त्यांचे मत लक्षात घेण्यात आले आहे.

भारतासारख्या विकसनशील देशांत खरे तर शिक्षणाला अधिक महत्त्व देऊन त्याप्रमाणे शैक्षणिक सेवा-सुविधासाठी अधिक आर्थिक तरतूद केली पाहिजे. परंतु आजही शिक्षणावरील होणारा खर्च इतर विकसित देशांच्या तुलनेत फारच कमी म्हणजे केवळ १.२ टक्के एवढाच आहे. इतर देशांत मात्र १० ते २० टक्के एवढा वार्षिक खर्च शिक्षणावर होतो. याचा परिणाम म्हणून त्या देशात साक्षरतेचे प्रमाण ९८ ते ९९ टक्के दरम्यान आहे. भारतामध्ये मात्र साक्षरतेचे एकूण प्रमाण फारच कमी म्हणजे केवळ ४३.५६ टक्के असल्याचे विदारक चित्र आहे. भारतातील एकूण साक्षरतेची अशी अवस्था

सहयोगी प्राध्यापक, श्री. मुक्तानंद महाविद्यालय, गंगापूर, जि. औरंगाबाद

असेल तर दुर्लक्षित घटक महिला व इतर मागासलेल्या समूहाची साक्षरतेची परिस्थिती किती गंभीर असेल याची कल्पना येते.

महाराष्ट्रातील ग्रामीण स्त्रियांची साक्षरता तर आणखीनच गंभीर आहे. सामाजिक परिवर्तनामध्ये खऱ्या अर्थाने उच्च शिक्षण महत्त्वाची भूमिका पार पाडत असते. महिलांची साक्षरता ही महत्त्वपूर्ण समजली जाते. त्याचे कारण असे की एक पुरुष शिक्षित झाला तर तो केवळ एकटा साक्षर होतो. परंतु एक स्त्री साक्षर झाली तर तिचे संपूर्ण कुटुंब शिक्षित होते. या दृष्टीने पाहाता महाराष्ट्रातील ग्रामीण स्त्रियांच्या साक्षरतेचे एकूण कमी प्रमाण, त्यांची एकूण प्रगती व व्यक्तिमत्त्व विकास याबाबत प्रश्नचिन्ह निर्माण करते आहे. महाराष्ट्रामध्ये शिक्षणाच्या विविध पातळीवरील मुलींची टक्केवारी पुढील तक्ता क्र. १.१ वरून स्पष्ट होते.

तक्ता क्र. १.१

**शिक्षणाच्या विविध पातळीवरील मुलींची टक्केवारी**

| क्र. | वर्ष | प्राथमिक | माध्यमिक | उच्च माध्यमिक | उच्च शिक्षण |
|---|---|---|---|---|---|
| १. | १९८० | ४३.० | ३६.० | ३१.० | ३१.७ |
| २. | १९९० | ४६.० | ४०.६ | ३६.६ | ३४ |
| ३. | १९९८ | ४८.० | ४५.३ | ४२.० | ४२.८ |

स्त्रोत – शिक्षण संचलनालय महाराष्ट्र राज्य, वर्ष २००८–२००९

महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात शेती हा मुख्य व्यवसाय आहे. जलसिंचनाच्या मर्यादित सुविधांमुळे बहुतांशी शेती कोरडवाहू स्वरूपाची आहे. उत्पादकता कमी असल्यामुळे आर्थिक उत्पन्न कमी असते. परिणामी गरजांचा क्रम ठरविताना शिक्षणाला विशेषत: मुलींच्या शिक्षणाला प्राधान्यक्रम मिळत नाही. यामुळे ग्रामीण कुटुंबांतील स्त्रियांचे शिक्षणाचे विशेषत: उच्च शिक्षण प्रमाण ५० टक्क्यांच्या आत असल्याचे निदर्शनास येते. मुलींचे शिक्षण अर्ध्यावर सोडले जाते. ज्याचा परिणाम मुलींच्या शिक्षणावर व एकूणच त्याच्या प्रगतीवर होत आहे.

महाराष्ट्र शिक्षण संचालनालयाच्या आकडेवारीनुसार माध्यमिक स्तरावरील मुलीच्या शिक्षणाचे गळतीचे प्रमाण प्रचंड आहे. हे तक्ता क्र. १.२ स्पष्ट होते.

तक्ता क्र. १.२

**गळतीचे प्रमाण**

| गळतीचे स्तर | १९८०–८१ | १९९०–९१ | २०००–०१ | २००२–०३ |
|---|---|---|---|---|
| पाचवी | ६३ | ३९ | १९ | १४ |
| आठवी | ७८ | ६२ | ४१ | ३६ |
| नववी | ८६ | ७३ | ५७ | ५५ |

स्त्रोत – महाराष्ट्र राज्य वार्षिकी २०११ (पृ. ८०२)

बालविवाह प्रतिबधंक कायद्याची निर्मिती होऊनही महाराष्ट्राच्या ग्रामीण भागातून त्या कायद्याचे उल्लंघन करून मोठ्या प्रमाणात मुलींचे बालवयात विवाह केले जातात. अज्ञान हेच त्यामागील खरे कारण आहे. विशेष असे की, महाराष्ट्रातील ग्रामीण स्त्री शिक्षणाकडे पाहण्याचा दृष्टिकोन मुळातच उदासीन आहे. येथील नागरी भागांतील पुरुष आणि स्त्री साक्षरता यातील अंतर कमी आहे. परंतु ग्रामीण क्षेत्रात हे अंतर जास्त आहे. ग्रामीण स्त्रियांचे कार्य क्षेत्र घरापुरते मर्यादित असावे आणि इतर ठिकाणी त्यांची भूमिका दुय्यम असावी हा येथील परंपरागत दृष्टिकोन या अवस्थेला कारणीभूत आहे. परिणामी प्राथमिक व माध्यमिक स्त्री शिक्षणाची व्याप्ती वाढविणे आणि मुलींचे शिक्षणातील गळतीचे प्रमाण रोखून शाळाबाह्य मुलींना शिक्षणासाठी कसे प्रवृत्त करावे हा प्रश्न अद्यापही महत्त्वपूर्ण आहे. मुलींना शिकून काय करायचे? हा दृष्टिकोन महाराष्ट्राच्या ग्रामीण जीवनात खोलवर रूजलेला आहे. स्त्रियांनी केवळ आपलं घर सांभाळावं या दृष्टिकोनातून स्त्रियांकडे पाहिले जाते. परिणामी महाराष्ट्रातील ग्रामीण स्त्रियांचे शिक्षणविषयक प्रश्न गंभीर बनले आहेत. त्यातून मुलींचे शाळा गळतीचे प्रमाण वाढल्याचे लक्षात येते.

तक्ता क्र. १.२ वरून ही बाब स्पष्ट होते. २००२–२००३ मध्ये नववीपर्यंत शाळा सोडलेल्या मुलींचे

प्रमाण ५५ टक्के असणे ही बाब म्हणूनच गंभीर आहे. हे प्रमाण लक्षात घेता उच्च शिक्षणातील महिलांची शिक्षण गळती किती तीव्र असू शकते याचीही कल्पना येते.

महाराष्ट्रातील शिक्षण संदर्भात मुला-मुलींच्या शिक्षणात मोठ्या प्रमाणात दुजाभाव केला जातो. हा दुजाभाव केवळ उच्च सामाजिक घटकातच केला जातो असे नाही तर तर विविध मागास घटकांतही हीच परिस्थिती दिसते. परिणामी पुरुषांच्या तुलनेत सर्व सामाजिक घटकांतील स्त्रियांच्या शिक्षण दरामध्ये मोठी तफावत असल्याचे पुढील तक्ता क्र. १.३ वरून निदर्शनास येते.

तक्ता क्र. १.३

**ग्रामीण महाराष्ट्रातील विविध सामाजिक घटकांतील स्त्री-पुरुष साक्षरता दर**

| सामाजिक घटक | पुरुष | स्त्री |
|---|---|---|
| सर्व | ८२.२ | ६३.३ |
| अनुसूचित जाती | ८१.७ | ६१.९ |
| अनुसूचित जमाती | ६८.७ | ४७.० |
| इतर मागास वर्ग | ८४.७ | ४७.० |
| इतर | ८६.४ | ६७.८ |
| जनगणना २००१ | ८१.९ | ५८.४ |

स्त्रोत - महा.आ.पा. २००८-२००९

वरील तक्ता क्र. १.३ चे अवलोकनातून ही गोष्ट स्पष्ट होते की, भारताच्या स्वातंत्र्यानंतरही महाराष्ट्रासारख्या पुरोगामी म्हणविणाऱ्या राज्यातील ग्रामीण भागात मुलींच्या सर्व सामाजिक घटकांत शिक्षणाच्या बाबतीत मोठा दुजाभाव केला जातो. मुलांच्याच शिक्षणाबाबत आग्रह धरणे एवढेच नव्हे तर मुलांना गुणवत्तापूर्ण व विशेष करून तांत्रिक शिक्षण देण्यावर अधिक भर देणे. मुलींना मात्र 'लग्नासाठीची शैक्षणिक पात्रता' म्हणून शिकवण्यावर भर दिला जातो. पर्यायाने पारंपरिक शिक्षण हेच बहुतांशी ग्रामीण मुलींच्या वाट्याला येते ही बाब लक्षात येते. थोडक्यात जन्माला आलेल्या मुलीच्या शिक्षणावर लक्ष देण्यापेक्षा त्याच्या विवाहावर अधिक लक्ष देण्याचे चित्र अद्यापही ग्रामीण महाराष्ट्रात दिसते.

शिवाय ग्रामीण महाराष्ट्रात वाहतुकीच्या साधनांचा फारसा विकास झालेला नाही. खराब रस्ते, वाहनांचा तुटवडा यामुळे शाळेत ये-जा करणे विशेषतः मुलींसाठी अनेकदा कठीण असते. छोट्या गावांमध्ये वाड्यावस्त्या आणि तांड्यांवर, आदिवासी पाड्यांवर शिक्षणाच्या सुविधा उपलब्ध नाहीत. परिणामी वाहतुकीच्या साधनांचा अभाव मुलींच्या शिक्षणाविषयी विपरीत परिणाम करीत असल्याचे दिसते. महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात स्त्रीचे शील या मुद्याला आवश्यकतेपेक्षा जास्त महत्त्व दिले जाते. परिणामी मुलगी घराबाहेर पडली की पालकांची चिंता वाढते. शाळा, महाविद्यालये या निमित्ताने मुली घराबाहेर पडतात. त्यातूनच एखादी घटना शाळकरी मुलींच्या प्रेमसंबंधाने घडते. त्याची जोरदार चर्चा वृत्तपत्रांतून आणि दूरदर्शनच्या विविध वृत्तवाहिन्यांवरून होते. मुलींची छेड काढणे, बलात्कार यासारख्या घटनांची भिती पालकांच्या मनात असते. सदर घटनांच्या भीतीमुळे मुलींची शिक्षणाची दारे बंद केली जातात. ज्या मुलींनी मधूनच शिक्षण सोडले त्या अनेक पालकांशी संशोधक या नात्याने मी जेव्हा संवाद साधला तेव्हा जवळपास ६५ टक्के पालकांनी लैंगिक अत्याचारांची भीती वाटते म्हणून मुलीला शाळा सोडण्यास भाग पाडले असे उत्तर दिले.

स्त्री अत्याचारांमध्ये व समस्यांमागे स्त्री शिक्षणाकडे होणारे दुर्लक्ष व स्त्रीकडे एक माणूस म्हणून पाहण्याची वृत्ती कमी असल्याने घडतात हेच स्पष्ट होते. म्हणून महाराष्ट्रातील स्त्री-शिक्षण विशेषकरून ग्रामीण स्त्री शिक्षणाकडे विशेष लक्ष देण्याची व त्या दृष्टीने उपाययोजना करण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे. महाराष्ट्रातील ग्रामीण स्त्री शिक्षणाचा प्रश्नासंदर्भात पुढीलप्रमाणे उपाययोजणे आवश्यक आहे.

**उपाययोजना :**

१. लिंगभेद नैसर्गिक आहे पण स्त्री-पुरुष भेदभाव सामाजिक आणि सांसकृतिक आहे. महाराष्ट्रातील ग्रामीण स्त्रीच्या शिक्षणाची अधोगतीला भेदभावाची हीच

मानसिकता जबाबदार आहे. त्यासाठी निश्चित प्रयत्न ग्राम पातळीवर झाले तर शिक्षणातील अडसर कायमचा निवारण होऊ शकतो.

२. स्त्रियांना शिक्षणाची योग्य संधी प्राप्त झाली पाहिजे.

३. शिक्षणाच्या आवश्यक सुविधा ग्राम पातळीवर मिळाल्या पाहिजेत. मुलींसाठी शाळा महाविद्यालयात जाण्या-येण्यासाठी स्वतंत्र वाहतुकीची व्यवस्था झाली पाहिजे.

४. गुणवत्तापूर्ण शिक्षण हा नियम कटाक्षाने पाळला पाहिजे. विशेषत: इंग्रजी माध्यमाच्या शिक्षणाने मुलींना रोजगाराच्या विविध संधी उपलब्ध होऊ शकतील.

५. महाराष्ट्रातील ग्रामीण समाजातील विविध जाती समूहांना रोजगार मिळविण्यासाठी आजही भटकंती करावी लागते. भटकंती करणारा वर्ग मोठा आहे. आज इथे तर उद्या तिथे अशा पद्धतीने गावोगाव भटकंती करणाऱ्या वर्गातील मुली शिक्षणापासून वंचित आहेत. अशा मुलींसाठी सर्वसोयींनी युक्त निवासी शाळा निर्माण होणे आवश्यक आहे.

६. मुलींचे शिक्षण म्हणजे विवाहासाठीची पात्रता ही पालकांची मानसिकता बदलवून मुलींनाही मुलाप्रमाणे गुणवत्तापूर्ण व्यवसायिक शिक्षण दिले पाहिजे यासाठी प्रयत्न होणे आवश्यक आहे.

**संदर्भ :**

1. Jadhav, T., Patil, M., (2011), Maharashtra 2011, Pune : Unique Academy.

2. Horton, Paul B., (1970), The Sociology and Social Problems, New York : Appleon Century Crafts.

3. Chanana, K., (2011) Interrogating Women's Education: Bounded Vision Expanding Horizons, Jaipur : Rawat Publications.

4. Kramer, L. (2004) The Sociology of Gender, Jaipura and New Delhi : Rawat Publications.

5. Kumar, K., (2010) Culture, State and Girls : An Educational Perspective, Economic and Political Weekly, Vol. XLV, No. 17.

6. District Information of School Education (DISE), (2009-10) National University of Educational Planning Administration (NUEPA) New Delhi.

7. Rajgopal, S., (2009) Gender Equality In Education : Accessing Gains and Reviewing Challenges in Rajasthan, New Delhi : Rawat Publication.

* * *

# ग्रामीण महिला आणि पाणी प्रश्न

डॉ . मंजुषा नळगीरकर

**प्रस्तावना :**

पाणी हेच जीवन आहे. मानवाची अत्यंत मूलभूत गरज म्हणजे पाणी होय . शास्त्रज्ञ म्हणतात की, मानवाच्या शरीराचा ७५टक्के भाग पाण्याने व्यापलेला आहे. तसेच मानवाला दैनंदिन जीवन व्यवहारासाठी ७५ टक्के जीवन पाण्यावर अवलंबून राहावे लागते. पाणी हे निसर्गाधीन आहे. मानवाने आत्तापर्यंत अनेक शोध लावले आहेत परंतु पाण्याचा शोध लावू शकला नाही. मानव पाणी निर्माण करू शकत नाही परंतु पावसाद्वारे पडलेल्या पाण्याचे जतन व साठवणूक करु शकतो. ज्यावेळेस मानवाला पाण्याचे महत्त्व कळत नाही, त्यावेळेस त्याला दुष्काळजन्य परिस्थितीचा सामना करावा लागतो. अशा दुष्काळजन्य परिस्थितीत पाणी प्रश्न अधिक गंभीर बनतो.

दुष्काळ म्हणजे असा काळ ज्यामध्ये पावसाचे प्रमाण कमी असते. ऑक्सफर्ड डिक्शनरीनुसार, "दुष्काळ म्हणजे असा कालखंड की जेव्हा कोरडे हवामान असते व लोकांच्या गरजा पूर्ण करता येतील इतपत पाण्याची उपलब्धता नसते."[१]

महाराष्ट्र शासनाने २०१५ ची दुष्काळग्रस्त गावांची आकडेवारी जाहीर केली. ज्यात महाराष्ट्रातील ४३,००० गावांपैकी १४,७०८ गावांचा समावेश आहे, याचाच अर्थ राज्यातील ३४ टक्के भाग दुष्काळग्रस्त आहे. हा महाराष्ट्रातील दुसरा दुष्काळग्रस्त कालावधी आहे. मागील चार वर्षापासून होणाऱ्या वातावरणातील बदलांमुळे ही परिस्थिती पुन्हा पुन्हा निर्माण होत आहे. महाराष्ट्रातील मराठवाडा विभागात या दुष्काळाची तीव्रता सर्वाधीक आहे. मराठवाड्यातील ८,५२२ गावे दुष्काळग्रस्त आहेत.[२] ज्याचा परिणाम म्हणून शेतकऱ्यांच्या आत्महत्यांची आकडेवारी दिवसें दिवस वाढत आहे. १ जानेवारी २०१४ ते डिसेंबर २०१४ पर्यंत दर आठवड्याला २० ते ३० शेतकऱ्यांच्या आत्महत्यांची नोंद मराठवाड्यातील औरंगाबाद जिल्ह्यात झालेली दिसते. वर्ष २०१४ ते २०१५ या वर्षात १,१०९ शेतकऱ्यांनी आत्महत्या केलेली आहे. ही आकडेवारी २०१३ ते २०१४ च्या दुष्काळाच्या तुलनेत दुप्पट आहे.[३]

दुष्काळामुळे निर्माण झालेल्या पीक समस्या व शेतकऱ्यांच्या समस्या व आत्महत्या सर्वत्र चर्चिल्या गेल्या परंतु दुष्काळामुळे निर्माण झालेल्या महिलांविषयक समस्या फारश्या चर्चिल्या गेल्या नाहीत. सदरील शोध निबंधात "दुष्काळामुळे निर्माण झालेला पाणी प्रश्न आणि ग्रामीण भागातील महिलांच्या समस्या" यावर अधिक प्रकाश टाकणार आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे :-**

* सध्याच्या दुष्काळ परिस्थितीमुळे ग्रामीण भागातील महिलांना भेडसावणाऱ्या पाणी प्रश्न विषयक समस्यांचा शोध घेणे.

* ग्रामीण महिलांचा पाणी प्रश्न सोडविण्यासाठी उपाययोजना सुचविणे .

**संशोधनाचे क्षेत्र :**

मराठवाड्याची आर्थिक राजधानी असलेल्या औरंगाबाद शहरापासून २५ किलोमीटर अंतरावर उत्तरेला फुलंब्री तालुका आहे. फुलंब्री तालुका हा औरंगाबाद जिल्ह्यातील महत्त्वाचा तालुका असून तालुक्याअंतर्गत ९२ गावांचा समावेश होतो.फुलंब्री तहसील कार्यालयाकडून मिळालेल्या माहितीनुसार फुलंब्री तालुक्यातील, ९० गावे दुष्काळग्रस्त आहेत. या गावांपैकी जातवा, तरटे बाभूळगाव, मोरहिरा, लिंगदरी व बाबरा या निवडक गावांचे सर्वेक्षण करण्यात आले आहे. कारण या गावांमध्ये दुष्काळाची तीव्रता अधिक आहे. हेच प्रस्तुत संशोधनाचे क्षेत्र आहे.

समाजशास्त्र विभागप्रमुख, श्री .संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय फुलंब्री, जि .औरंगाबाद

**संशोधन पध्दती :**

प्रस्तुत विषयावरील संशोधन करण्यासाठी अन्वेषणात्मक संशोधन पध्दतीचा अवलंब करण्यात आला.

**नमुना निवड :**

प्रस्तुत विषयावरील संशोधनासाठी सहेतुक व सोयीस्कर नमुना निवड पध्दतीचा अवलंब करुन संशोधनासाठी निवडलेल्या पाच ( जातवा, तरटे बाभूळगाव, मोरहिरा, लिंगदरी व बाबरा) गावांपैकी प्रत्येक गावातून दहा महिला अशा ५० उत्तरदात्यांची निवड करण्यात आली.

**तथ्य संकलन :**

ग्रामीण भागातील महिलांची पाणी समस्या अभ्यासण्यासाठी प्राथमिक व दुय्यम साधनांचा अवलंब केला.आहे प्राथमिक साधनांत मुलाखत अनुसूची व दुय्यम साधनांत वर्तमानपत्रे, मासिके व इंटरनेट यांचा वापर केला आहे.

**तथ्यांचे विश्लेषण :**

प्रस्तुत विषयाशी संबंधीत केलेल्या तथ्यांच्या संकलनानंतर त्यांचे वर्गीकरण करण्यात आले. ज्याचे विश्लेषण पुढीलप्रमाणे आहे.

**महिला व पाणी संबंध :-**

जीवन जगण्याचे एक आवश्यक साधन म्हणून, उत्पादनाचे साधन म्हणून व सांस्कृतिक देणगी म्हणून संपूर्ण जगातील महिलांचे पाण्याशी एक विशेष नाते आहे. याला भारत आणि महाराष्ट्र सुद्धा अपवाद असू शकत नाही. ग्रामीण भागात लिंगभेदावर आधारित केलेल्या कामाच्या वर्गीकरणात स्त्रियांना पाणी आणणे/भरणे, पाणी सांडणे व पाण्याचा घरकामासाठी वापर करणे ही कामे करावी लागतात. शहरी भागातील स्त्रियांच्या तुलनेत ग्रामीण भागातील स्त्रियांचा पाण्याशी अत्यंत घनिष्ढ संबंध आहे. म्हणून वारंवार पडणाऱ्या दुष्काळामुळे निर्माण झालेला पाणी प्रश्न ग्रामीण भागातील महिलांसाठी अत्यंत ज्वलंत बनत आहे.

**पाणी प्रश्नांची कारणे :**

दुष्काळामुळे ग्रामीण भागात निर्माण झालेल्या पाणी प्रश्नांची कारणे पुढीलप्रमाणे आहेत.

* वृक्षतोड व प्रदूषणामुळे निर्माण झालेला पर्यावरणीय असमतोल.
* पाणी व्यवस्थापनातील राजकारण व भ्रष्टाचार
* कृषी क्षेत्रासाठी लागणारे पाणी औद्योगिक क्षेत्राकडे वळवले जाणे.
* पावसाच्या पाण्याची साठवणूक व त्याच्या पुनर्वापराच्या तंत्रांचा अभाव.
* निसर्गाधीन शेती व शेतकऱ्यांनी अवलंबलेली चुकीची पीक पद्धती.
* स्थानिक पातळीवरील पाण्याचे स्त्रोत व पाणी व्यवस्थापनाकडे झालेले दुर्लक्ष्य मुळात ग्रामीण भागातील व्यक्तींमध्ये पाणी बचतीच्या व साठवणूकीच्या बाबतीत म्हणावी तेवढी जागरुकता दिसत नाही. ज्यामुळे पाणी प्रश्न दिवसेंदिवस गंभीर बनत आहे.

**महिला व पाणी संकलनाचे कार्य :-**

युनिसेफ व राजीव गांधी पेयजल मोहीम यांच्या संयुक्त विद्यमाने १९९० मध्ये केलेल्या अभ्यासात असे आढळून आले की, भारतात घरकामासाठी लागणाऱ्या पाण्याचे संकलन करण्याचे काम प्रामुख्याने महिलाच करतात. ज्यात १५ ते३५ वयोगटातील महिलांचे प्रमाण सर्वाधिक आहे[४] मागील वर्षी निर्माण झालेल्या महाराष्ट्रातील दुष्काळामुळे महिलांचे पाणी संकलनाचे काम अधिक महत्त्वाचे व कठीण बनले आहे.

**पाणी संकलनाची समस्या :**

ग्रामीण महिलांच्या दृष्टीने जीवन जगण्यासाठी, घरकामासाठी व जनावरांच्या संगोपणासाठी पाणी ही अत्यंत मूलभूत गरज आहे. ही गरज पूर्ण करण्यासाठी महिलांना पाणी संकलनाचे कार्य करावे लागते. दुष्काळ परिस्थितीत पाणी संकलनासाठी महिलांना दिवसातून कमीत कमी ३ फेऱ्या व अधिकाधिक ६ फेऱ्या कराव्या लागत होत्या. सकाळी ५वाजता, दुपारी १२ वाजता, सायंकाळी ५वाजता व रात्री १० नंतरही त्यांना पाणी आणण्याचे काम करावे लागत आहे.

* फुलंब्री तालुक्यातील दुष्काळग्रस्त गावांतील महिलांना पाणी आणण्यासाठी सरासरी ३ ते ४ किलोमीटर व त्यापेक्षा अधिक अंतर चालून जावे लागते.
* दिवसातील सरासरी ६ ते ९ तास एवढा वेळ महिलांना पाणी आणण्यासाठी लागतो. अंतर, कराव्या लागणाऱ्या

अधिकच्या फेऱ्या व त्यासाठी लागणारा भरपूर वेळ या प्रमुख समस्या होत्या.

* पाणी आणण्यासाठी प्रत्येक फेरीला महिला दोन हंडे नेत असत.जे ३० ते ३५ लिटरचे एक हंडा (१० ते १५ लिटर) होते.

* लांबच्या अंतरावरुन महिलांना पाणी आणावे लागत असल्यामुळे व त्यांच्याकडे पाण्याचे ओझेही अधिक असल्यामुळे बऱ्याच महिलांनी वाटेत जिथे थकवा जाणवला तिथे आराम केला असे सांगितले. पाणी संकलनाशी संबंधित ग्रामीण भागातील महिलांना चालावे लागणारे लांबचे अंतर होय.

**आर्थिक समस्या :**

दुष्काळ परिस्थितीत ग्रामीण भागातील महिलांसाठी पाणी आणणे हेच एक प्रमुख काम बनले होते व याच कामात त्यांना अधिकाधिक वेळ जात असल्यामुळे शेतीची कामे मजुरी करता येत नव्हती. ज्या महिला घरकामांव्यतिरिक्त कुटुंबाला आर्थिक हातभार लावण्यासाठी शेतीची व मजूरीचा कामे करीत होत्या, त्यांना दुष्काळ परिस्थितीमुळे शेतीची कामे मिळाली नाहीत व मजुरीसाठी वेळही मिळाला नाही.

फुलंब्री तालुक्यातील फुलंब्री, मोरहिरा, लिंगदरी या गावांतील कमी अर्थिक उत्पन्न गटातील बऱ्याच महिला (६० टक्के)आर्थिक अडचणीमुळे व गावात काम मिळत नसल्यामुळे हर्सूल-सावंगीजवळील नूजीवूड सीडस कंपनीत मजूरीसाठी जात होत्या. त्यांना मजूरीसाठी जावे लागत असल्यामुळे पाणी भरण्याच्या कामासाठी पुरेसा वेळ मिळत नव्हता. त्यामुळे महिलांना कमावलेल्या पैशातील (१००रु.रोजंदारी) बराचसा वाटा पाणी खरेदी करण्यासाठी (५० रु.) द्यावा लागत होता. त्यामुळे कुटुंबात पैशाचा तुटवडा निर्माण होऊन आपसांत भांडणे व वाददेखील होत आहेत असे बहुतांशी महिलांनी सांगितले.

**सुरक्षेची समस्या :**

पाणी आणण्यासोबतच महिलांना स्वयंपाक करणे, भांडी व कपडे धुणे व जनावरांसाठी चारा व पाण्याची व्यवस्था करणे आदी कामे दिवसभर करावी लागत व रात्री विहिरीतून व हापशावरुन पाणी आण्यासाठी जागरण करावे लागत असे. दुष्काळग्रस्त गावांत लोडशेडिंगमुळे रात्री लाईट नसायची तसेच गावात पथदिवे नसल्यामुळे अंधारातच पाणी आणण्याचे काम करावे लागत असे त्यामुळे भीतीही वाटत होती असे बऱ्याच (७०टक्के) महिलांनी सांगितले. रात्री पाणी आणल्यामुळे महिलांची पुरेशी झोप होत नव्हती. त्यामुळे दुसऱ्या दिवशीही शारीरिक थकवा जाणवत होता असेही मत मांडले. ज्या स्त्रियांचे पती त्यांच्या सोबत नव्हते कामासाठी अन्य ठिकाणी गेले असल्यामुळे त्यांना एकटीने पाणी आणणे ही त्यांच्या सुरक्षेच्या दृष्टीने चिंतेची बाब वाटत होती.

**शैक्षणिक समस्या :**

ग्रामीण भागात दुष्काळामुळे कुटुंबातील मोठ्या महिलांसोबतच शाळकरी मुलींनादेखील पाणी आणण्यासाठी शाळा सोडून घरी राहावे लागत असे. शाळा, अभ्यास व परीक्षेपेक्षाही पाणी आणणे हे या मुलींसाठी महत्त्वाचे काम होते. ज्याचा त्यांच्या शिक्षणावर वाईट परिणाम झाला. दुष्काळ परिस्थितीमुळे मुलींना शाळेत नियमित जाता आले नाही, अभ्यासाकडे दुर्लक्ष झाले व काहींना परीक्षेच्या वेळेस अनुपस्थित राहावे लागले अशी शाळकरी मुलींकडून माहिती मिळाली.

**दूषित पाण्याची समस्या :**

ग्रामीण भागात नळ, विहीर, हापसी व टँकरवर पाणी भरण्यासाठी महिलांची चढाओढ लागायची, भांडणे व आपआपसांतील झटापटी या रोजच्याच बाबी झाल्या होत्या. गाळसदृश्य दूषित पाणी काढण्यासाठी तसेच सरकारी टँकरद्वारे विहिरीत सोडलेले पाणी काढण्यासाठी महिलांनी स्वतःच्या जिवाची पर्वा न करता अवघड विहिरीत उतरण्याचे धाडस दाखविले. बऱ्याच महिलांना अशा विहिरीतून पाणी काढताना मारही लागला.

ग्रामीण भागात दुष्काळामुळे नदी, नाले, तलाव, हापसी व विहिरीतील पाणी आटले आहे. शासनाचे टँकर दोन दिवसांआड,आठवड्यातून दोनदा किंवा आठवड्यातून एकदा या प्रमाणे गावात येत असते. टँकरचे पाणी गावातील सर्व व्यक्तींना लागणाऱ्या पाण्याची गरज पूर्णपणे भागवू शकत नव्हते. टँकरद्वारे मिळालेल्या पाण्याचे एक दोन हंडे महिला पिण्यासाठी साठवत असत घरकामासाठी व जनावरांसाठी विहिरीच्या तळाशी असलेले गाळसदृश्य

पाणी, डबक्यात साचलेले पाणी, नद्यांच्या व तलावांच्या पात्रात खड्डे करुन मिळालेले पाणी व लांबून हापशावरुन आणलेले पाणी वापरले जात होते. असे पाणी मोठ्या प्रमाणात दूषित होते. या पाण्याला कितीही गाळले व तुरटी फिरवली तरी त्याचा गढूळपणा कायम राहत होता. जनावरेसुद्धा हे पाणी पीत नसत. कधी कधी टँकर आले नाही तर आम्हालासुद्धा हेच पाणी प्यावे लागते असे बऱ्याच २५ (५०टक्के) महिलांनी सांगितले. असे दूषित पाणी पिल्यामुळे उलट्या, संडास, पोट दुखणे, अशक्तपणा या स्वरूपाचा त्रास झाला असे महिलांनी सांगितले.

**गर्भवती महिलांच्या समस्या :**

फुलंब्री तालुक्यातील दुष्काळग्रस्त गावातील १० म्हणजे (२०टक्के) गर्भवती महिलांनीदेखील ३ ते ४ किलोमीटर अंतरावरुन पाणी आणल्याचे सांगितले. वैद्यकीयदृष्ट्या गर्भवती महिलेने ओझे उचलू नये व जास्त लांबचे अंतर पायी चालू नये असे म्हटले जाते. परंतु दुष्काळ परिस्थितीत नाईलाजाने गर्भवती स्त्रियांनीदेखील लांबून दोन ते तीन हंडे / बादल्या पाणी आणले आहे. ज्याचा महिला व गर्भातील बाळावर वाईट परिणाम होऊ शकतो आणि गर्भपातासारख्या घटनाही घडू शकतात.

**आरोग्यविषयक समस्या :**

दुष्काळी परिस्थितीमुळे ग्रामीण भागातील महिलांमध्ये निर्माण झालेली समस्या म्हणजे आरोग्याची समस्या होय. महिलांच्या आरोग्याच्या दृष्टीने महत्त्वाची मानली जाणारी बाब म्हणजे वैयक्तिक स्वच्छता होय़ दुष्काळ परिस्थितीत महिलांना वैयक्तिक स्वच्छतेसाठी खूप कमी पाणी उपलब्ध असायचे. मासिक पाळीमध्येसुद्धा महिलांना खूप थोड्याशा पाण्यात स्नान करावे लागत असे. महिलांची अशी बिकट परिस्थितीत दुष्काळग्रस्त गावांत सगळीकडे पहावयास मिळते. जर मासिक पाळीमध्ये महिलांना वैयक्तिक स्वच्छतेसाठी पुरेसे पाणी मिळत नसेल तर विषाणूंचा प्रादुर्भाव होऊन त्या महिलेचे आरोग्य धोक्यात येऊ शकते.

महिलांच्या आरोग्याच्या दृष्टीने दुसरा महत्त्वाचा विषय म्हणजे आहार होय .दुष्काळी परिस्थितीत फुलंब्री तालुक्यातील महिलांचा आहार ज्वारी किंवा बाजरीची भाकर व डाळी प्रामुख्याने तूरदाळ हा आहे. जवळपास ४० टक्के महिलांनी असे असे सांगितले की वारंवार तूरदाळ खाल्यामुळे आम्लपित्ताचा व पोटदुखीचा त्रास त्यांना झाला. दुष्काळामुळे जनावरांना चारा व पाणी मिळाले नाही. परिणामी दूधाचे प्रमाण घटले तसेच शेतीसाठी पाणी नसल्यामुळे भाजीपाला व फळबागांचे उत्पन्न झाले नाही. परिणामी महिलांच्या आहारात दूध, दही, ताक, पालेभाज्या व फळे यांचा अभाव होता. ज्यामुळे महिलांच्या आरोग्यासाठी आवश्यक असलेली जीवनसत्त्वे, प्रथिने व लोह हे पुरेशा प्रमणात न मिळाल्यामुळे महिलांच्या कुपोषणाची समस्या पुढे आलेली दिसते. अशा कुपोषित महिला गर्भवती असतील तर गर्भातील बालकांच्या कुपोषणाची समस्याही निर्माण होऊ शकते.

फुलंब्री गावातील प्राथमिक आरोग्य केंद्रांतील डॉ. निती म्हस्के यांच्याशी दुष्काळजन्य भागातील महिलांच्या आरोग्यविषयक समस्यांविषयी चर्चा केली असता त्यांनी असे सांगितले की, फुलंब्री तालुक्यातील दुष्काळग्रस्त गावांतील महिलांमध्ये अॅनेमिया (रक्ताची कमतरता) व पोषक आहाराची कमतरता हे आजार प्रामुख्याने आढळून आले. आहेत महिलांच्या जेवणात दूध, पालेभाज्या व फळे यांचा अभाव असल्यामुळे अ जीवनसत्त्व, ब जीवनसत्व, ड जीवनसत्व, कॅल्शियम, लोह, इत्यादींची शरीरात कमतरता निर्माण होते. परिणामी महिलांमध्ये अशक्तपणा, चक्कर येणे, थकवा जाणवणे व भूक मंदावणे आदी समस्या दिसतात. ज्या महिला दोन ते तीन हंडे / बादल्या पाणी लांब अंतरावरुन आणतात त्यांना मान दुखणे, पाठ दुखणे, कंबर दुखणे, गुडघा व पाय दुखणे हा त्रास होऊ शकतो. तसेच लांबून पाणी आणण्याची क्रिया वारंवार केल्यामुळे शरीराची झीज होऊन हाडे ठिसूळ होऊ शकतात असे म्हस्के यांनी सांगितले. दुष्काळ परिस्थितीत गाळसदृश्य दूषित पाणी पिल्यामुळे जुलाब, उलट्या व काविळ होऊ शकतो. पाण्यात जर मातीचे प्रमाण अधिक असेल तसेच हापशाचे पाणी ज्यात क्षार अधिक असल्यामुळे किडनी स्टोनचे आजार होऊ शकतात असे त्यांनी सांगितले. यावरुन दुष्काळ परिस्थितीमुळे ग्रामीण भागातील महिलांच्या आरोग्यावर किती गंभीर परिणाम होऊ शकतात याची जाणीव होते.

**निष्कर्ष :**

* दुष्काळामुळे ग्रामीण भागातील महिलांचा पाणी प्रश्न गंभीर बनत आहे.

* ग्रामीण भागातील महिलांना पाण्यशी संबंधित पाणी संकलनाची, सुरक्षेची, आर्थिक, शैक्षणिक व आरोग्यविषयक समस्या भेडसावत आहेत.

या समस्या सोडविण्यासाठी पुढील उपाय योजना करणे आवश्यक आहे.

**उपाययोजना :**

* पाणी व महिलांचा असलेला अत्यंत जवळचा संबंध पाहता महिलांनीच पाणी वापराबाबत व साठवणुकीबाबत जाणीवपूर्वक नियोजन करणे आवश्यक आहे.

* ग्रामीण भागातील महिलांना पाण्याचा वापर योग्य रीतीने कसा करावा यासाठी पाणी व्यवस्थापनाचे प्रशिक्षण दिले जावे.

* पावसाच्या पाण्याची साठवणूक त्याच्या पुनर्वापराच्या तंत्राचे प्रशिक्षणही महिलांना दिले जावे. अशा प्रशिक्षणासाठी गावांतील ग्रामपंचायतीने पुढाकार घ्यावा.

* प्रत्येक गावात, गावाच्या सभोवताली व डोंगरावर वृक्ष लागवड करणे तसेच स्थानिक पातळीवरील जलस्त्रोतांचे (तलाव, विहिरी, हापसे इ. ) जलपुनर्भरण करणे या कार्यात सहभागी होण्याची प्रेरणा महिलांना देण्यासाठी स्वयंयेवी संस्थांनी पुढाकार घ्यावा.

* ग्रामीण भागातील व्यक्तींना पाणी उपलब्ध व्हावे यासाठी ज्या शासकीय योजना राबविल्या जातात. (तलावातील गाळ काढणे, शेततळे बांधणे, बंधारे बांधणे, सार्वजनिक विहिरी व हापासे पाडणे इ. ) त्यांची योग्य रीतीने अंमलबजावणी झाली पाहिजे.

* महिला व पाणी हा संबंध लक्षात घेऊन महिलांना लांब अंतरावरुन पाणी आणावे लागू नये म्हणून गावातच हापसे, विहिरी व नळयोजना असाव्यात. गावाजवळच तलाव बांधले जावेत.

* गावातील शेतकऱ्यांनी पिकांना पाणी देण्यासाठी ठिबक सिंचन पद्धीचा अवलंब करावा. तसेच गावातील नद्यांतील पाणी वाहून जाऊ नये म्हणून वनराई बंधारे बांधणे व शेततळे बांधणे आवश्यक आहे.

* या वर्षी घोषित केलेल्या दुष्काळग्रस्त जिल्हा, तालुका व गावांसाठी शासनाने विशेष आर्थिक तरतूत करुन पाण्याच्या उपलब्धतेसाठी योजना आखाव्यात. जलयुक्त शिवार अभियानाची अंमबजावणी योग्य पद्धतीने व्हावी.

* महिलांच्या आरोग्याच्या दृष्टीने स्वच्छ पाण्याचे व पोषक आहाराचे कसे महत्त्व आहे, दूषित पाण्यामुळे कोणते आजार होतात व लांब अंतरावरुन पाण्याचे ओझे आणल्यामुळे कोणत्या आरोग्यविषयक समस्या निर्माण होतात याची महिलांना जाणीव प्राथमिक आरोग्य केंद्रातील डॉक्टर्स व आशा कार्यकर्तीमार्फत करुन दिली गेली पाहिजे.

* भविष्यात शासनाने नदी जोडणी प्रकल्पाचा विचारही करावा.

* ग्रामीण भागातील महिलांनी आपल्या घरातील सांडपाण्याचा वापर करुन परसबागा फुलवाव्यात. जिथे सर्व प्रकारच्या पालेभाज्या व फळाझाडे लावावीत. ज्यामुळे त्यांना सहजतेने पोषक आहार मिळेल.

* पाण्याची समस्या सोडविण्यासाठी शासनावर अवलंबून न राहता गावातील महिला, पुरुष व सरपंच यांनी पुढाकार घेऊन गावातील पाण्याचे योग्य व्यवस्थापन करावे त्यासाठी पाणी अडवा व पाणी जिरवा ही मोहीम राबवावी.

या उपाय योजनांची योग्यरीतीने अंमलबजावणी झाल्यास भविष्यात पुन्हा दुष्काळ परिस्थितीला सामोरे जावे लागणार नाही. महिलांच्या समस्याही निर्माण होणार नाहीत. खऱ्या अर्थाने प्रत्येक गाव सुजलाम् सुफलाम् सुफलाम् होईल.

**संदर्भसूची :**

१. ऑक्सफर्ड अॅडव्हान्स डिक्शनरी १९५५, जोनॅथन क्राऊथर ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेस

२.प्रियंका काकोडकर – दी टाइम्स ऑफ इंडिया, ऑक्टोबर १७, २०१५

3. More Manoj D. The Indian Exprers 29Des, 2015 indian Express. com/ article/ cities/ mvembai

४.वेंकटेश्वरन एस.१९९५ , एनव्हायरनमेंन्ट डेव्हलपमेंट अॅण्ड जेन्डर गॅप, सागा, न्यू दिल्ली

* * *

# असंघटित क्षेत्रातील कृषी व कृषी संबंधित श्रमिकांचे समाजशास्त्रीय अध्ययन

प्रा.डॉ.भगवान डोंगरे

**प्रस्तावना :**

कृषिप्रधान राष्ट्राबरोबरच असंघटित कामगारांचे राष्ट्र म्हणून जगाच्या नकाशावर भारताचा उदय होत आहे. १९७१ मध्ये एकूण कामगार संख्येत असंघटित क्षेत्रातील कामगारांची संख्या ८९ टक्के होती. सन २००५ मध्ये हे प्रमाण वाढून ९२.४ टक्के इतके झाले आहे.[१] इ.स. २००७-०८ मध्ये हे प्रमाण ९३ टक्के होते तर इ.स. २००९-१० मधील राष्ट्रीय नमुना सर्वेक्षण संस्थेच्या पाहणीनुसार देशातील एकूण कामगारांपैकी ९३.९७ टक्के कामगार असंघटित क्षेत्रात कार्यरत असल्याचे निदर्शनास येते.[२] याचाच अर्थ असंघटित क्षेत्रात श्रम करून उपजीविका करणारा श्रमिकांचा मोठा वर्ग भारतामध्ये आढळून येतो व त्यामध्ये वाढ होतांना आढळून येत आहे. १९९५ च्या नॅशनल अकाऊंटस स्टॅटिस्टिक्स अहवालानुसार देशाच्या एकूण राष्ट्रीय उत्पन्नापैकी ६५टक्के उत्पन्न हे असंघटित क्षेत्रातील कामगारांकडून प्राप्त होते. इ.स.२०१२ मधील भारत सरकारचा सांख्यिकीय आयोग भारताच्या राष्ट्रीय उत्पादनामध्ये प्राथमिक क्षेत्राचा अर्ध्यापेक्षा अधिक वाटा असल्याचे स्पष्ट करतो.[३]

**असंघटित कामगार संकल्पना-**

असंघटित कामगार अथवा क्षेत्र ही एक जटिल संकल्पना आहे. वीणा देवस्थळी यांच्या मते, "असंघटित क्षेत्रामधील आर्थिक व्यवहारांचे, कामगारांचे स्वरूप वैविध्यपूर्ण आहे. या क्षेत्रात सुरक्षा कायद्याचा अभाव, कमी उत्पन्न, उत्पन्नाचे हंगामी व अनियमित स्रोत आणि कमी उत्पादकता असून देखील या क्षेत्रावर ९० टक्क्यांहून जास्त कामगार आपल्या उपजीविकेसाठी अवलंबून आहेत. कृषी व संलग्र व्यवसायांचा असंघटित क्षेत्रात मोठा हिस्सा आहे. परंतु वाढत्या नागरीकरणाबरोबरच नागरी क्षेत्राअंतर्गतही असंघटित क्षेत्राचे प्रमाण वाढते आहे. ग्रामीण भागातील असंघटित क्षेत्रामध्ये कृषी क्षेत्रातील छोटे व सीमांत शेतकरी आणि भूमिहीन शेतमजुर यांचा समावेश आहे."[४]

कामगार संख्या, कामाचे अथवा रोजगाराचे स्वरूप, कामगार संघटन आणि कामगार-मालक संबंध इत्यादी अनुषंगाने असंघटित कामगार संकल्पनेचा विचार केल्यास -

१) विशिष्ट कामाच्या ठिकाणी कामगार संख्या दहापेक्षा कमी असणे.

२) कामगारांच्या कामामध्ये अथवा मजुरीमध्ये अनियमितता व विस्कळीतपणा असणे.

३) कामगार असंघटित असणे.

४) कामगार आणि मालक यांच्या संबंधात अननिश्चिता असणे.

इत्यादी चार प्रकार असंघटित कामगार संकल्पनेत महत्त्वपूर्ण ठरतात.[५]

पहिल्या राष्ट्रीय श्रम आयोगाने (१९६६-६९) 'असंघटित कामगार' ही संकल्पना स्पष्ट करताना म्हटले आहे की, ज्यांना रोजगाराचे तात्पुरते स्वरूप, अज्ञान आणि निरक्षरता, व्यवसाय किंवा कामाचे विस्कळीत व लहान स्वरूप, कामाच्या स्वरूपामुळे मालकवर्गाकडे एकवटलेल्या शक्ती अशा सारख्या समस्यांमुळे सामुदायिक उद्दिष्टे प्राप्त करण्यात अडचणी येतात, व ते संघटित होऊ शकत नाहीत. अशा कामगारांचा उल्लेख असंघटित कामगार म्हणून करता येईल.[६]

**असंघटित कामगारांचे अथवा श्रमिकांचे वर्गीकरण:**

असंघटित श्रमिकांचे साधारणपणे पुढील चार प्रकारात वर्गीकरण करता येईल.

---

समाजशास्त्र विभाग प्रमुख, मोरेश्वर कला,विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, भोकरदन जि.जालना.

**१ ) व्यवसायांनुसार :**

कृषी व कृषीशी संबधित क्षेत्रात काम करणारे (अल्पभूधारक शेतकरी, भूमिहीन शेतमजूर, सालगडी, गुराखी इ.) मत्स्यव्यावसायिक, खाटिक, वीट कामगार, बिडी कामगार, वीट कामगार, दगडकाम करणारे, खाणकाम करणारे व जनावरांच्या चामडीचा व्यवसाय करणारे इत्यादी.

**२ ) कामाच्या अथवा मजुरीच्या स्वरूपानुसार :**

सालगडी, वेठबिगार, ऊसतोड कामगार, कंत्राटी कामगार इत्यादी.

**३) धोकादायक किंवा आपत्तीग्रस्त क्षेत्रात काम करणारे :**

ताडी गोळा करणारे, विहिरीचे खोदकाम करणारे, खाणीमध्ये काम करणारे, हमाल, मैला डोक्यावर वाहून नेणारे, समुद्रामध्ये मासेमारी करणारे इत्यादी.

**४ ) सेवा प्रदान करणारे कामगार :**

मोलकरीण, इस्त्री करणारे, वर्तमानपत्र विकेते, दूध-फळ-भाज्या विक्रेते इत्यादी. याशिवाय गावगाड्यात पारंपरिक स्वरूपाचे काम करणारे व औद्यागिकीकरण, नागरीकरण व आधुनिकीकरणाच्या प्रक्रियेतून निर्माण झालेल्या नवीन व्यवसायांत श्रम करणारे, सेवा पुरविणारे श्रमिक अशा दोन प्रकारांतही असंघटित कामगारांचे वर्गीकरण करता येईल.

ग्रामीण आणि नागरी भागामध्ये असंघटित क्षेत्रात काम करणा-या श्रमिकांचा विचार केल्यास ९६ टक्के पेक्षा अधिक असंघटित कामगार ग्रामीण भागामध्ये तर असंघटित कृषी क्षेत्रात ९८ टक्के श्रमिक कार्य करतात. याचाच अर्थ कृषी व कृषीशी संबंधित अन्य व्यवसायांमध्ये श्रम करणाऱ्या असंघटित श्रमिकांचा एक मोठा वर्ग ग्रामीण भागात कार्यरत आहे. हा असंघटित श्रमिकांचा वर्ग स्वातंत्र्योत्तर भारतातही आर्थिक आणि सामाजिक न्याय यापासून वंचित आढळतो. सदरील शोधनिबंधात कृषी व कृषी संबंधीत व्यवसायात श्रम करणाऱ्या असंघटित श्रमिकांचे आर्थिक व सामाजिक स्थितीचे विश्लेषण केले आहे. या विश्लेषणासाठी असंघटित क्षेत्रावरील राष्ट्रीय आयोगाचा अहवाल २००७ यामधील सांख्यिकीय माहितीचा आधार घेतलेला आहे.

**असंघटित क्षेत्रावरील राष्ट्रीय आयोगाचा अहवाल २००७ :**

असंघटित क्षेत्रातील रोजगार, रोजगाराचे स्वरुप, रोजगारवृध्दी इत्यादींच्या अनुषंगाने डॉ. अर्जुन सेनगुप्ता यांच्या अध्यक्षतेखाली National Commission on Enterprises in Un-Organised Sector (SCEUS) आयोगाची स्थापना करण्यात आली. या आयोगाने राष्ट्रीय नमुना सर्वेक्षण संस्थेची आकडेवारी विचारात घेऊन भारतातील असंघटित क्षेत्रातील श्रमिकांच्या सामाजिक व आर्थिक स्थितीबाबतचा महत्त्वपूर्ण अहवाल ६ ऑगस्ट २००७ रोजी सादर केला.[७] या अहवालातील कृषी व कृषी संबंधीत व्यवसायात श्रम करणाऱ्या असंघटित श्रमिकांच्या आर्थिक व सामाजिक स्थितीची ठळक वैशिष्टे पुढीलप्रमाणे-

**स्वातंत्र्योत्तर कृषी धोरणः**

स्वातंत्र्योत्तर कृषी धोरणातील परिवर्तनाचा आढावा या अहवालात अधोरेखित केला असून स्वातंत्र्यानंतरच्या प्रारंभिक अवस्थेत मोठ्या धरणाच्या आधारे सिंचन प्रकल्प उभारणे, पडीक जमिनीचा विकास व सुधारणा इत्यादीवर भर देण्यात आल्यामुळे कृषी क्षेत्रामध्ये संरचनात्मक परिवर्तनाला गती प्राप्त झाली. दुसऱ्या कालखंडामध्ये हरित क्रांती, कृषी तंत्रज्ञान, पतपुरवठा, विपणन, गरिबी हटाव अशा माध्यमातून शेती क्षेत्राचा व त्यावर अवलंबून असणाऱ्यांच्या विकासासाठी प्रयत्न करण्यात आले, तर तिसऱ्या कालखंडात जागतिकीकरण, खासगीकरण व उदारीकरणाद्वारे कृषी क्षेत्राला बाजाराभिमुख करण्यावर भर दिला जात आहे.

**कृषी क्षेत्रातील श्रमिक व रोजगाराची स्थिती :**

ग्रामीण अर्थव्यवस्थेमध्ये कृषी क्षेत्राची भूमिका महत्त्वपूर्ण असून इ.स. २००४-२००५ मध्ये साधारणः २५९ दशलक्ष श्रमिक शेतीमध्ये कार्यरत होते. त्यापैकी २४९ दशलक्ष श्रमिक ग्रामीण भागात शेतीमध्ये गुंतलेले होते. शेतीक्षेत्रातील काम करणाऱ्यांपैकी ६४ टक्के श्रमिक

शेतकरी तर ३६ टक्के शेतमजूर म्हणून कार्य करतात. शेतमजुरांमध्ये ९८ टक्के श्रमिक रोजंदारीवर विसंबून आहे.

शेती व्यवसाय हंगामी स्वरूपाचा तसेच शेती व्यवसायाचे यश-अपयश निसर्गाशी संबंधित असल्यामुळे शेतीमधील रोजगाराच्या दिवसांतही अनिश्चितता आढळून येते. इ.स. १९९३-९४ ते २००४-०५ या वर्षाचा विचार केल्यास इ.स. १९९३-९४ मध्ये २२४ दिवस मजुरी तर २००४-०५ मध्ये २०९ दिवस मजुरी उपलब्ध झाली. स्त्री मजुरांचीही प्रत्येक वर्षी रोजगाराच्या दिवसांमध्ये घट झालेली आढळते.

कृषी क्षेत्रातील मजुरांची मजुरी इतर क्षेत्रातील मजुरीपेक्षा कमी आढळून येते. ९१ टक्के राष्ट्रीय किमान वेतनापेक्षा कमी तर ६४ टक्के शेतमजुरांना ग्रामीण श्रमिकांसाठीच्या राष्ट्रीय आयोगाने कृषीभागांसाठी निश्चित केलेल्या मजुरीपेक्षा कमी मजुरी मिळते.

कृषी क्षेत्रातील श्रमिकांच्या गरिबीच्या प्रमाणात भिन्नता आढळून येते. कृषी क्षेत्रात कार्यरत असणा-या श्रमिकांमध्ये १९.९ टक्के गरिबीचे प्रमाण तर कृषी मजुरांमध्ये हे प्रमाण २८.९ टक्के आढळते. सामाजिक व धार्मिक गटानुसार गरिबीचा विचार केल्यास सर्वाधिक गरिबीचे प्रमाण हिंदू अनुसूचित जमातींमध्ये ४० टक्के, मुस्लिम शेतमजूर ३१.५ टक्के, हिंदू अनुसूचित जाती ३१ टक्के, हिंदूमधील उच्च जातीमध्ये १६ टक्के तर भूमिहीन अनुसूचित जमातींमध्ये ६९ टक्के आढळते. शेतमजुरांच्या खालोखाल अत्यल्प व अल्पभूधारक, कोरडवाहू शेतकऱ्यांची सर्वाधिक विपन्नावस्था आढळून येते.

**अत्यल्प व अल्पभूधारक:-**

अत्यल्प व अल्पभूधारकांच्या प्रमाणात वाढ होत असल्याचे या अहवालावरुन निदर्शनास येते. इ.स. १९९० च्या दशकात एक हेक्टरपेक्षा कमी जमीन धारण असलेल्या कुटुंबाचे प्रमाण साधारणतः ६२ टक्के, दोन हेक्टरपेक्षा कमी जमीन असणा-या कुटुंबाचे प्रमाण १६ टक्के होते. म्हणजेच दोन हेक्टरपेक्षा कमी जमीन असणा-या शेतकऱ्यांचे प्रमाण ७८ टक्के होते तर त्यांच्याकडे एकूण लागवडीपेक्षा ३४ टक्के जमीन असल्याचे आढळते. इ.स. २००२-२००३ मध्ये ८६ टक्के अत्यल्प व अल्पभूधारकांपाशी ४३ टक्के जमीन, १४ टक्के मध्यम व ३७ टक्के जमीन मोठ्या भू-धारकांकडे होती. लहान, मध्यम व मोठ्या शेतकऱ्यांच्या जमीन धारणेत घट होऊन भूमिहीन व अत्यल्प भूधारक कुटुंबधारकांमध्ये वाढ झाली आहे. जमीनधारणेचे सरासरी प्रमाण इ.स. २००४-०५ मध्ये एक हेक्टरवरुन ०.८ टक्क्यांपर्यंत घसरले आहे.

**स्त्री मजूर व बाल कामगार :**

ग्रामीण भागातील असंघटित क्षेत्रातील स्त्री-पुरुष श्रमशक्तीचा विचार केल्याचा कृषी क्षेत्रातील पुरुष श्रमशक्तीच्या प्रमाणात घट होऊन ते बिगर कृषी व्यवसायांकडे स्थलांतरित होत असल्याचे आढळते. इ.स. २००४-०५ मध्ये ७२.८ टक्के स्त्रिया शेती क्षेत्रात श्रम करीत असल्याचे अहवालावरुन स्पष्ट होते. याचाच अर्थ ग्रामीण असंघटित क्षेत्रात पुरुष श्रमिकांपेक्षा स्त्री श्रमिकांचे प्रमाण अत्याधिक आढळते. निसर्गाचा लहरीपणा, रोजगाराची व वेतनाची अनिश्चितता, शहरी स्थलांतरांकडे वाढता कल इत्यादीमुळे कृषी क्षेत्रातील पुरुष श्रम शक्तीमध्ये घट होत असल्याची वस्तुस्थिती आढळून येते.

कृषी क्षेत्रातील बालमजुरीचा विचार केल्यास एकूण श्रमिकांपैकी १.९ टक्के बालमजूर कृषि संबंधित व्यवसायांत मजुरी करतांना आढळतात. इ.स.१९९३-९४ पेक्षा हे प्रमाण कमी असले तरी कृषी व्यवसायात बालमजुरीची ही स्थिती चिंताजनक आहे. असंघटित क्षेत्रातील कामगारांच्या या अहवालावर भाष्य करताना सुजाता गोठोस्कर यांनी कृषी क्षेत्रात कार्य करणाऱ्या महिला व बालक यांना आर्थिक व सामाजिक पिळवणुकीचा सामना करावा लागतो. त्यांचे वेतन व कामाच्या तासांमध्ये अनिश्चिता आढळते.[८]

## असंघटित क्षेत्रातील श्रमिकांची आरोग्यविषयक स्थिती :

असंघटित क्षेत्रातील आणि विशेषतः कृषी व कृषी संबंधित क्षेत्रात कार्य करणाऱ्या श्रमिकांना नेहमीच जोखमीचे काम करावे लागते. नैसर्गिक संकटांबरोबरच ट्रॅक्टर,मळणीयंत्र, विहीर खोदकाम, फवारणी यंत्र, विद्युत मोटारी अशा धोकादायक बाबींशी त्यांचा नेहमीच संपर्क येतो. रासायनिक खते, कीटकनाशके इत्यादी विषारी घटकांचा तो शेतामध्ये वापर करीत असतो. धोकादायक बाबीमधून अपघाताची शक्यता बळावते तर विषारी द्रव्यातून विषबाधा, त्वचारोग होण्याची शक्यता असते. आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेनुसार दर वर्षी १,७०,००० कृषी श्रमिक अपघातांमुळे मृत्युमुखी पडतात.[९] शेती क्षेत्रात काम करणाऱ्या कामगारांचा मृत्युदर हा इतर क्षेत्रांत काम करणाऱ्या मृत्युदरापेक्षा अधिक आढळून येतो.

## असंघटित कृषी क्षेत्रातील श्रमिकांसाठीच्या सामाजिक सुरक्षा योजना:-

शेतीत काम करणाऱ्या श्रमिकांसाठी, त्यांच्या सुरेक्षेसाठी काही महत्त्वपूर्ण उपाययोजना राबविल्या जातात. श्रम मंत्रालय भारत सरकार यांनी भारतीय जीवन आयुर्विमा महामंडळाद्वारे शेतमजुरांच्या सामाजिक सुरक्षेसाठी कृषी श्रमिक सामाजिक सुरक्षा योजना २००९ मध्ये सुरू करण्यात आली. याशिवाय रोजगार हमी योजना, स्वर्णजयंती ग्राम स्वयंरोजगार योजना, अवर्षणग्रस्त भाग विकास कार्यक्रम, प्रधानमंत्री ग्रामसडक योजना, जवाहर ग्राम समृध्दी योजना, वृध्द निवृत्ति वेतन योजना, राष्ट्रीय मातृत्व लाभ योजना इत्यादी योजना प्रत्यक्ष अप्रत्यक्षपणे शेतकरी व श्रमिकांसाठी महत्त्वपूर्ण आहेत.

भारतामध्ये कृषी व कृषी संबंधित क्षेत्रात कार्य करणाऱ्या श्रमिकांची सामाजिक, आर्थिक व आरोग्यविषयक स्थिती हलाखीची आढळून येते. तसेच निरक्षरता, अल्पशिक्षितपणा, संघटनेचा अभाव इत्यादींमुळे सामाजिक सुरक्षा, न्याय व मानवी हक्कांपासून हे श्रमिक वंचित असल्याची निरीक्षणे इला भट यांनी नोंदविली आहेत.[१०]

## निष्कर्ष:

१) संघटित क्षेत्रापेक्षा असंघटित क्षेत्रात व असंघटित क्षेत्रातील कृषी संबंधित व्यवसायांमध्ये श्रमिकांचे प्रमाण अधिक आहे.

२) शेतीचे हंगामी स्वरूप, शेत लागवडीसाठी वाढत जाणारा खर्च, खर्चांच्या तुलनेत शेतमालाला मिळणारा अत्यल्प भाव, निसर्गाचा लहरीपणा, शेतीचे घटत जाणारे सरासरी आकारमान इत्यादीमुळे शेती क्षेत्रातील श्रमिकांच्या संख्येत घट होत आहे.

३) औद्योगिकीकरण, नागरीकरण तसेच बिगर कृषी व्यवसायांत होणाऱ्या वाढीमुळे पुरुष श्रमिकांचे बिगर कृषी व्यवसायात स्थलांतर होत आहे.

४) कृषी व कृषी संबंधित व्यवसायांत रोजगार व वेतनामध्ये अनिश्चितता आढळून येत असल्यामुळे शेतमजूर व अत्यल्प भूधारकांमध्ये गरिबाचे प्रमाण सर्वाधिक आढळते. सामाजिक व धार्मिक गटानुसार गरिबीचा विचार केल्यास सर्वाधिक प्रमाण हिंदू अनुसूचित जमातींमध्ये आढळून येते.

५) लहान, मध्यम व मोठ्या भूधारक कुटुंबांच्या प्रमाणात घट होऊन भूमिहीन व अत्यल्प भूधारकांच्या प्रमाणात वाढ होत आहे. सरासरी हेक्टरी जमीन धारणा घटत चालली आहे.

६) कृषी व कृषी संबंधित व्यवसायांतील बालमजुरीच्या प्रमाणात घट होताना आढळून येत असली तरी असंघटित क्षेत्रामधील बालमजुरांचा विचार केल्यास कृषी व कृषी संबंधित व्यवसायांतील बालमजुरांचे हे प्रमाण चिंताजनक ठरते.

७) कृषी व कृषी संबंधित व्यवसायांमध्ये श्रम करणाऱ्या श्रमिकांची आरोग्यविषयक स्थिती चिंताजनक आहे. या व्यवसायात श्रमिकांमध्ये निरक्षरता व संघटनेचा अभाव असल्यामुळे शासकीय योजना व सोयी सुविधांपासून हा वर्ग वंचित असल्याचे आढळून येते.

## संदर्भ :

१) सेनगुप्ता, अर्जुन (२००७);नॅशनल कमिशन ऑन एन्टरप्रायझेस इन अनऑरगनाईज्ड सेक्टर.

२) Kalyani, Muna (2015); Unorganised Workers: A Core Strenght of Indian Labour Force. Sryahna Publications.
३) National Statistical Commission Government of India (Feb-2012); Report On the Committee On Unorganised Sector Statistics.
४) देवस्थळी, वीणा (२००८);असंघटित क्षेत्रावरील राष्ट्रीय आयोगाचा अहवाल, समाज प्रबोधन पत्रिका एप्रिल-जून २००८.
५) सिरसाठ सतीश (२०१०); असंघटित कामगार, पुणे विद्यापीठ मुद्रणालय, पुणे.
६) http://labour nic.in.
७) केरकर,भालचंद्र (२००८);असंघटित क्षेत्रावरील राष्ट्रीय आयोगाचा अहवाल, समाज प्रबोधन पत्रिका एप्रिल-जुन २००८.
८) गोठोस्कर, सुजाता (२००८);असंघटित क्षेत्रावरील राष्ट्रीय आयोगाचा अहवाल,समाज प्रबोधन पत्रिका एप्रिल-जून २००८.
९) http://labour nic.in.
१०) भट्ट इला (२००१);द अनऑर्गनाईज्ड सेक्टर, वर्क सिक्युरिटी अॅण्ड सोशल प्रोटेक्शन, सेज पब्लिकेशन, दिल्ली.
११) N.S.S.O. (2005);National Sample Servey Organization Governmaent of India
१२) N.S.S.O. (2003);Report No.498(59/33/1), Situation, Assesnment Survey of Farmer's : Indebtedess of Farmer Households, N.S.S.O 59th Round

* * *

## आवाहन...

मराठी समाजशास्त्र पत्रिकेच्या प्रकाशनासाठी ज्यांना देणगी द्यायची असेल, त्यांनी 'सचिव, मराठी समाजशास्त्र परिषद' या नावाने डिमांड ड्राफ्ट / चेक अथवा रोखीने डॉ. स्मिता अवचार, अध्यक्ष, मराठी समाजशास्त्र परिषद, द्वारा - समाजशास्त्र विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद येथे जमा करावे.

संपादक

# आदिवासी जीवनाचा वेध घेणारे पुस्तक

## ( कै. जय जोशी संदर्भ/क्रमिक ग्रंथ पुरस्कार प्राप्त ( २०१४ ) पुस्तकाचे परीक्षण )

**परीक्षक : राजेंद्र फकीरराव बगाटे**

पुस्तक परिक्षण

**भारतीय** समाजाचा विचार करतांना आपल्याला ग्रामीण, आदिवासी आणि नागरी समाजाचा प्रामुख्याने विचार करावा लागतो. यापैकीच एक म्हणजे आदिवासी समाज होय. भारतातील आदिवासी समाजाच्या अनेक समस्या आहेत. त्यांच्या समस्यांविषयी अनेक अभ्यासकांनी अभ्यास केलेला आहे. तसाच प्रयत्न प्रस्तुत 'भारतातील आदिवासी समाज' या ग्रंथामध्ये डॉ. सुधाकर जाधव यांनी केला आहे.

डॉ. सुधाकर जाधव यांनी या ग्रंथांची मांडणी एकूण १० प्रकरणांमध्ये आणि २०८ पानांमध्ये सविस्तरपणे केलेली आहे. या ग्रंथात प्रामुख्याने आदिवासींचे मूलभूत प्रश्न आणि कल्याणकारी योजनांवर भर देण्यात आला आहे. यामध्ये प्रामुख्याने त्याचे शिक्षण आणि आरोग्यविषयक स्थिती जाणून घेण्याचा प्रयत्न लेखकाने केलेला आहे. बहुतेक सर्व आदिवासी भागांमध्ये वर्षांनुवर्षें कुपोषण, बालमृत्यू, बेरोजगारी, पिळवणूक, स्थलांतर निरक्षरता यांचा सामना आदिवासींना करावा लागत आहे असे लेखकाने या ग्रंथामध्ये नोंदवले आहे.

अविकसित आदिवासी समाज आज आपणास क्वचितच आढळून येत आहे व वर्तमान काळातील आदिवासी हा साक्षर, सुशिक्षित, वैज्ञानिक स्वरूपाचा असून एक तार्किक क्रिया करणारा एकक म्हणून ओळखला जातो. असे असले तरी ठाणे जिल्ह्यातील वारली, नाशिक जिल्ह्यातील कोकण, जळगांव जिल्ह्यातील तडवी, नंदूरबार जिल्हयातील पारवा, धुळे जिल्ह्यातील भिल्ल, नांदेड जिल्ह्यातील गोंड, अमरावतीतील कोरकू, गोंड या जमाती आजही हलाखीचे जीवन जगतांना दिसून येतात असे निरीक्षण लेखकाने या ग्रंथामध्ये नोंदवलेले आहे.

भारतीय आदिवासींचे वर्गीकरण, लोकसंख्या, भौगोलिक प्रदेश, वांशिक ठेवण, भाषा, व्यवसाय व सांस्कृतिक जीवन पध्दतीच्या आधारे भारतीय आदिवासींमधील वेगळेपणा चटकन लक्षात येतो असे लेखकाचे मत आहे. लेखकाच्या मते, भारतामध्ये इतर देशांपेक्षा आदिवासींचे प्रमाण आधिक असून भारतात ४१४ जमातींचे आस्तित्व आढळून येते असे ते नोंदवतात. तसेच त्यांनी भारतातील आदिवासींचे प्रदेशनिहाय अस्तित्व मांडलेले आहे. त्याच प्रमाणे आदिवासींचे भौगोलिक, भाषिक व आर्थिक वर्गीकरण केलेले आहे. तसेच महाराष्ट्रातील आदिवासींचे लोकसंख्यात्मक विभाजन करुन १९८१ व २००१ च्या जनगणनेनुसार महाराष्ट्रातील आदिवासींचे प्रमाण आणि जिल्हानिहाय स्वरूप व अस्तित्व स्पष्ट करण्याचा प्रयत्न केलेला आहे. तसेच भारतातील आदिवासी स्त्री जीवन अभ्यासले असून त्यामध्ये आदिवासी स्त्रियांचा दर्जा व भूमिका हा इतर समाजातील स्त्रियांपेक्षा कसा वेगळा

पीएच. डी. संशोधक विद्यार्थी, समाजशास्त्र विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.
ईमेल: bagate.rajendra3@gmail.com

आहे, तसेच मातृवंश, पितृवंश आणि आर्थिक बाबतीत आदिवासी स्त्रियांचा दर्जा कसा आहे हे स्पष्ट केलेले आहे. यासोबतच आदिवासींच्या सांस्कृतिक परंपरा यामध्ये आदिवासी कला, नृत्यकला, पावरा भिल्लांचे गेरनृत्य, कोकणी नंदी नृत्य, वारली तारपा नृत्य, महादेव कोळी, कहाळ्यांचा नाच, ठाकरांचे गोफ नृत्य, मांडियांचे रे....लॉ नृत्य, कोलामांचे दंडार नृत्य, तसेच आदिवासी हस्तकला व कलात्मकता, युवागृह अथवा शयनगृह व्यवस्था या बाबतची माहिती सविस्तर नोंदवलेली आहे.

आदिवासी विवाहाची वैशिष्टये, जोडीदार निवडीवरील बंधने, यामध्ये आंतर्विवाहाचे, बहिर्विवाहाचे, अधिमान्य किंवा समाजमान्य विवाहाचे बंधन तसेच आदिवासी विवाहांचे प्रकार, यामध्ये वधू प्राप्तीनुसार विवाह प्रकार, विवाह पध्दती, पती पत्नीच्या संख्येनुसार विवाह प्रकार, तसेच आदिवासी समाजातील घटस्फोटांच्या पध्दती हया वेगवेगळ्या जमातीत वेगवेगळ्या असतात व त्यांच्यात घटस्फोटाचे प्रमाण हे अत्यल्प आहे असे निरीक्षण लेखकाने नोंदवले आहे.

खानदेशातील आदिवासी हे प्रकरण या पुस्तकाचे वेगळेपण आहे. या प्रकरणामध्ये खानदेशाची माहिती देऊन या भागात जास्त प्रमाणात असलेल्या भिल्ल जमातीची सविस्तर माहिती दिलेली आहे. भिल्ल म्हणजे काय? खानदेशातील भिल्लांचे भौगोलिक वर्गीकरण, त्यांची बोलीभाषा, भिल्लांच्या उपजमाती, तसेच खानदेशातील आदिवासींचे सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक जीवन, खानदेशातील आदिवांसीवरील धार्मिक प्रभाव आणि खानदेशातील आदिवासींच्या प्रमुख समस्या म्हणजेच विस्थापनाची आणि कुपोषाच्या समस्येंवर लेखकाने मत व्यक्त केलेले आहे.

प्रस्तुत पुस्तक छापताना काही पाने ही छापली गेलेली नाहीत, यामुळे हा ग्रंथ वाचताना सलगतेला अडथळा निर्माण होतो. त्यामुळे छपाईमध्ये व्यवस्थितपणा आणणे आवश्यक आहे. या बरोबरच हा ग्रंथ भारतीय आदिवासी समाज या नावाने असल्यामुळे भारतातील आदिवासी समाजाच्या लोकसंख्यात्मक विभाजनाची या ग्रंथामध्ये नोंद केली असती तर चांगले झाले असते, परंतु लेखकाने फक्त महाराष्ट्रातील आदिवासी जमातीविषयीच माहिती दिलेली आहे. ही एक मर्यादा या ग्रंथामध्ये असू शकते. यासोबतच शुध्दलेखन व वाक्यरचना पुन्हा बघणे आवश्यक आहे, आणि नवीन आवृत्ती काढताना लेखकाने यामध्ये असलेल्या चुका सुधारण्याचा प्रयत्न करावा.

ग्रंथाचे/पुस्तकाचे नावः भारतातील आदिवासी समाज
लेखकाचे नावः डॉ. सुधाकर एल. जाधव
प्रकाशकः चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद. (मे २०१२),
ISBN - ९७८-९३-८१९४८-२६-२
किंमत : १८०/-

* * *

## समाजशास्त्र संशोधन पत्रिका या वार्षिक नियतकालिकाचे स्वामित्व व इतर बाबींविषयी निवेदन
### ( नियतकालिकांच्या नोंदणीविषयी निथम ८ प्रमाणे )

| | | | |
|---|---|---|---|
| १) | प्रकाशन स्थळ | : | मराठी समाजशास्त्र परिषद,<br>द्वारा – समाजशास्त्र विभाग,<br>डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,<br>औरंगाबाद ४३१००४ |
| २) | नियतकाल | : | वार्षिक |
| ३) | मुद्रकाचे नाव | : | रुद्रायणी ऑफसेट, औरंगाबाद |
| | राष्ट्रीयत्व | : | भारतीय |
| | पत्ता | : | एम.आय.डी.सी. एरियाँ, चिकलठाणा परिसर, औरंगाबाद |
| ४) | मुद्रण स्थळ | : | रुद्रायणी ऑफसेट, औरंगाबाद |
| ५) | प्रकाशकाचे नाव | : | डॉ. स्मिता अवचार |
| | राष्ट्रीयत्व | : | भारतीय |
| | पत्ता | : | समाजशास्त्र विभाग,<br>डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,<br>औरंगाबाद ४३१ ००४ |
| ६) | संपादकाचे नाव | : | डॉ. स्मिता अवचार |
| | राष्ट्रीयत्व | : | भारतीय |
| | पत्ता | : | स्तंभ ५ प्रमाणे |
| ७) | मालकाचे नाव | : | मराठी समाजशास्त्र परिषद |
| | पत्ता | : | वरीलप्रमाणे |

मी डॉ. स्मिता अवचार असे जाहीर करते की, वर दिलेला तपशील माझ्या माहिती व समजुतीप्रमाणे खरा आहे.

**डॉ. स्मिता अवचार**
प्रकाशक व संपादक